म. ग्रं. सं. ठाणें

विषय किरकोळ

सग्रहालय क्रमांक 83

लेखक प्रो. - बापू सदाशिव नेटर

सन १८५७

पुस्तकाचें नांव अथ वृद्धचाणाक्य प्रारंभ

मराठी ग्रंथसंग्रहालय.

ठाणें.

83 -

किरकोळ

खन ७८५८
आनु
मराठी ग्रंथ संग्रहालय
अनु
-३

स्वच्छ प्रत
[illegible]

मराठी ग्रंथ

॥ श्री ॥

# अथ वृद्धचाणाख्य प्रारंभः

बापुसदाशिवशेठशेट्ये या
चे छापखान्यांत छापिलें
शके १७७९ सन १८५७


श्रीविष्णु
राजा

१७१३२२८८

श्रीगणेशायनमः॥ ॥अथवृद्धचाणाख्यप्रारंभः॥ ॥श्लोक
॥वृद्धचाणाख्यग्रंथस्यटीकांकुर्वेसुबोधनीं॥सर्वलोकोपकाराय
भाषयामाहराष्ट्रया॥१॥ ॥प्रारंभीं या ग्रंथाची प्राकृत टीका कर
णारा सूज्ञजनास विनयपूर्वक असें सुचवितो कीं या संस्कृत ग्रंथकर्त्यानें
लोक हिताकडे दृष्टि देऊन केवळ नीति आणि चातुर्याच्या ज्या युक्ति त्याच
या ग्रंथांत संग्रह केल्या आहेत परंतु प्राकृतजनास संस्कृत भाषेचा विशे
षात्कारें परिपाठ नाहीं याजकरितां त्या ग्रंथाची प्राकृत टीका करून हा सटी
क ग्रंथ आह्मी लोकोपकारार्थ छापिला आहे याचा संग्रह सूज्ञजन करोत्
असें आह्मी इच्छितों.

ग्रंथासप्रारंभ

प्रणम्यशिरसाविष्णुंत्रैलोक्याधिपतिंप्रभुं॥नानाशा
स्त्रोद्धृतंवक्ष्येराजनीतिसमुच्चयम्॥१॥

त्रैलोक्यपालक समर्थ विष्णु जो त्यातें नमस्कार करून अनेक शास्त्रांपा
सून काढिला राजनीति संग्रह बोलतो.॥१॥

अधीत्येदंयथाशास्त्रंनरोजानातिसत्तमः॥धर्मोपदे
शाविख्यातंकार्याकार्यंशुभाशुभम्॥२॥

जो पुरुष अध्ययन करून धर्माचा उपदेशा विषयीं प्रसिद्ध करावयास
योग्य अयोग्य चांगलें वाईट इत्यादि शास्त्राप्रमाणें जाणतो तो श्रेष्ठ होतो.२

तदहंसंप्रवक्ष्यामिलोकानांहितकाम्यया॥येनविज्ञा
नमात्रेणसर्वज्ञत्वंप्रपद्यते॥३॥

तें मी लोकाचा हितेच्छेनें सांगतों ज्या ज्ञानमात्रें करून मनुष्य सर्वज्ञ
ता पावतो.॥३॥

मूर्खशिष्योपदेशेनदुष्टस्त्रीभरणेनच॥दुःखितैःसं

प्रयोगेनपंडितोप्यवसीदति ॥ ४ ॥

मूर्ख शिष्यास उपदेश केल्यानें आणि दुष्टस्त्रीचें पोषण केल्यानें तसें च दुःखितजनाशीं अतिसहवासानें विद्वान हि दुःख पावतो. ॥ ४ ॥

दुष्टाभार्याशठंमित्रंभृत्यश्चोत्तरदायकः ॥ ससर्पेचगृहेवासोमृत्युरेवनसंशयः ॥ ५ ॥

ज्याची स्त्री दुष्ट आणि मित्र ते हि वंचक तसाच प्रत्युत्तर देणारा भृत्य सर्पयुक्त गृहीं वास त्यास मृत्यूच प्राप्त संशय नाहीं. ॥ ५ ॥

आपदर्थेधनंरक्षेद्दारान्रक्षेद्धनैरपि ॥ आत्मानंसततंरक्षेद्दारैरपिधनैरपि ॥ ६ ॥

पुढें आपत्ति प्राप्त होईल या साठीं धनाचें संरक्षण करावें जर स्त्री नाश होत आहे तर लोभ नकरितां धनें करून हि स्त्रिया रक्षाव्या आणि जर आपला नाश होत आहे तर द्रव्य आणि स्त्रियाहि देऊन आत्मरक्षण करावें. ॥ ६

आपदर्थेधनंरक्षेत्श्रीमतश्चकिमापदः ॥ कदाचिच्चलतेलक्ष्मीःसंचितोपिविनश्यति ॥ ७ ॥

आपत्ति प्राप्त होईल ह्मणोन द्रव्य संग्रह करावा असें नीतिशास्त्र बोलतें परंतु श्रीमंतास आपत्ति काय करणार आहेत असें जर ह्मणावें तर कोणेक समयीं लक्ष्मी हि नाश पावत्ये आणि धनसंग्रह ही नाश पावतो यास्तव दान भोगादि सद्व्यय करावा हाच आपदार्थ धनसंग्रह असे नीतिशास्त्र बोलतें. ॥ ७

यस्मिन्देशेनसन्मानोनवृत्तिर्नचबांधवः ॥ नचविद्यागमोप्यस्तिवासंतत्रनकारयेत् ॥ ८ ॥

ज्यादेशीं सत्कार नाहीं आणि जीवनोपाय हि नाहीं व कोणी आपले बांधव हि माहित असणखीं विद्या प्राप्ति हि नाहीं त्यादेशीं क्षणमात्र हि राहूं नये. ८

धनिकःश्रोत्रियोराजानदीवैद्यस्तुपंचमः ॥ पंचयत्रनविद्यंतेनतत्रदिवसंवसेत् ॥ ९ ॥

ज्या गावांत धनवान् श्रोत्रियब्राह्मण राजा नदी वैद्य हे पांच नाहीत तेथें एक दिवसहि राहूं नये अशास्थळीं जो राहील तो सुख पावणार नाहीं. ९

लोकयात्राभयंलज्जादाक्षिण्यंत्यागशीलता पंचयत्र
नविद्यंतेनकुर्यात्तत्रसंगतिं ॥ १० ॥

ज्या देशीं जनाचा देह निर्वाहा विषयीं कोणता हि उपाय नसेंच कोणाचें हि भय लज्जा दक्षपणा औरवीं दानस्वभाव हीं पांच नाहींत तेथें ज्ञात्यानें कदापिहि राहूं नये. ॥१०॥

जानीयात्प्रेषणेभृत्यान्बांधवान्व्यसनागमे मि
त्रंचापत्तिकालेषुभार्यांचविभवक्षये ॥११॥

जावत्काल पर्यंत कोणते हि कामा विषयीं सेवकास आज्ञा केली नाहीं ताव त्कालपर्यंत सेवकाची परिक्षा होत नाहीं आज्ञासमयी ते कसे आहेत तें जाणावें, काहीं दुःखप्राप्तिकाळीं आपले बांधव आपणास अनुकूल आहे त किंवा नाहींत तें त्या वेळेस जाणावें, जे आपले पूर्वीचे मित्र होते ते को णे एक आपत्तिकाळीं कसे आहेत ते जाणावे, जेथ पर्यंत ऐश्वर्य असतें तेथपर्यंत स्त्री पुरुषाचे आज्ञेंत राहातेच परंतु ऐश्वर्यक्षय झालें ह्म णजे त्याकाळीं तिची परिक्षा जाणावी. ॥११॥

आतुरेव्यसनेप्राप्तेदुर्भिक्षेशत्रुसंकटे राजद्वारे
स्मशानेचयस्तिष्ठतिसबांधवः ॥ १२ ॥

रोगग्रस्तकाळीं आणि दुःखसमयीं तसांच धान्यापत्ति वेळेस आणि शत्रुसंकटकाळीं राजाचे गृहीं आणि स्मशानांत इतक्या ठिकाणीं जो आपणास न सोडितां राहातो तोच बांधव जाणावा. ॥१२॥

योध्रुवाणिपरित्यज्यअध्रुवंपरिसेवते॥ध्रुवाणि
तस्यनश्यंतिअध्रुवंनष्टमेवच ॥ १३ ॥

अविनाशी वस्तूचा त्यागकरून नाशवंत वस्तू सेवितो त्यास प्राप्त जा

हा केलीं अविनाशी फळें नाश पावतात आणि सत्यबुद्धीनें ज्यातें से
वितो तो नर मुळचाच नाशवंत तो नाश पावल्यानंतर सेवा करणा
रा उभयभ्रष्ट होतो. ॥१३॥

वरयेत्कुलजांप्राज्ञोविरूपामपिकन्यकाम् रूपशी
लांननीचस्य विवाहे सदृशेकुले ॥१४॥

बुद्धिमंत पुरुषानें कन्या वरावयाची ती रूपादिहीन जरी असली तरी
उत्तमकुळींची वरावी उत्तम रूप स्वभावादि संपन्न जरी असली तथा
पि नीचकुळींची वरूंनये विवाहादि संबंध करणें तो आपले बरोब
रीच्या कुळीं करावा ॥१४॥

नदीनांचनखीनांचशृंगिणांशस्त्रपाणिनां विश्वा
सोनैवकर्तव्यःस्त्रीषुराजकुलेषुच ॥१५॥

नदी आणखीं श्वानादि नखाचीं जनावरें तसेच निरंतर शस्त्र हातीं
धरणारे यांचा आणि स्त्रियांचा तसाच राजकुलाचा विश्वास क
दापि धरूंनये. ॥१५॥

विषादप्यमृतंग्राह्यममेध्यादपिकांचनं नीचाद
प्युत्तमांविद्यांस्त्रीरत्नंदुष्कुलादपि ॥१६॥

विषापासून हि शोधून अमृत घ्यावें अमंगळांत सुवर्ण पडलें अ
सतां तेंही क्षालनादि करून घ्यावें उत्तम विद्या नीचापासूनही घ्या
वी तशीच कन्या सर्व गुणसंपन्न आहे तर दुष्ट कुळा पासून ही वरावी
आपण अमंगळातील वस्तू किंवा दुष्टकुळांतील कन्या हें पाहूंनये. १६

स्त्रीणांद्विगुणआहारोलज्जाचापिचतुर्गुणा साह
संषड्गुणंचैवकामश्चाष्टगुणःस्मृतः ॥१७॥

पुरुषापेक्षां स्त्रियांचा आहार द्विगुणित तशी लज्जाहि चतुर्गुणित
तसेंच साहस कर्म ह्मणजे अविचारें करून करणें तेंही षड्गुण अधि

 ~~संपं..~~ सं १३३२७

क तसा कामहि अष्टगुणीत अधिक जाणावा ॥१७॥

॥इतिवृद्धचाणाख्येप्रथमोध्यायः॥१

---

अनृतंसाहसंमायामूर्खत्वमतिलोभता अशौच
त्वंनिर्दयत्वंस्त्रीणांदोषाःस्वभावजाः॥१॥

मिथ्याभाषण, अविचारें करून कर्मकरणें, कपट, मूर्खपणा, फारलोभ, अमंगळपणा, तसाच निर्दयपणा हे सात स्त्रियांचे स्वाभाविक दोष जाणावे. ॥१॥

भोज्यभोजनशक्तिश्चरतिशक्तिर्वरांगना विभवोदा
नशक्तिश्चनाल्पस्यतपसःफलम्॥२॥

भोजनीय पदार्थ अनकूलअसतां भोजनाची शक्ती असणें ऐश्वर्य प्राप्तअसतां दानशक्ति असणें हें मोटें पुण्याचें फळ पुण्यावाचून हीं प्राप्त व्हावयाचीं नाहीं. ॥२॥

यस्यपुत्रोवशीभूतोभार्याछंदानुगामिनी विभवेय
श्चसंतुष्टस्तस्यस्वर्गइहैवहि॥३॥

पुत्रज्याचा स्वाधीन आणि स्त्री इछेप्रमाणें वर्तणारी आणि ऐश्वर्याचे ठायीं जो सदा संतुष्ठ त्याला इहलोकींच स्वर्गीचें सूख आहे. ॥३॥

तेपुत्रायेपितुर्भक्ताःसपितायस्तुपोषकाः तन्मित्रं
यत्रविश्वासःसाभार्यायत्रनिर्वृतिः॥४॥

जे पित्याचे भक्त ह्मणजे त्याचे इछे प्रमाणें सेवाकरणारे तेच पुत्र ह्मणावे आणि आपणांस यांपासून पुढें सूख होईल अशी इछा नधरितां पुत्रांचें पोषण जो करितो तोच पिता ज्यावर निःकपट विश्वास तोच मित्र आणि जिचासंगें सूखहोतें तीच भार्या॥४॥

परोक्षेकार्यहंतारंप्रत्यक्षेप्रियवादिनं वर्जयेतादृशं
मित्रंविषकुंभंपयोमुखं ॥५॥

कुमित्राचें लक्षण समक्ष प्रिय हितकर बोलून पाठिमागें नाश करणा
रा असा जो मित्र तो जसा विषानें भरलेला घट असून मुखींमात्र ज्या
चा दुग्ध अशा घटासारिखा कुमित्र वर्ज करावा.॥५॥

नविश्वसेत्कुमित्रेच मित्रेचापिनविश्वसेत् कदाचि
त्कुपितंमित्रंसर्वगुह्यंप्रकाशयेत् ॥६॥

कुमित्राचेठायीं विश्वास ठेउंनये आणि मित्रावरहि ठेउंनये कोणेए
केसमयीं मित्र कोपला तर आपलें सर्व गुह्य लोकांमध्यें प्रसिद्ध क
रण्यास चुकणार नाहीं.॥६॥

मनसाचिंतितंकार्यंवाचानैवप्रकाशयेत् मंत्रेणर
क्षयेद्गूढंकार्यंचापिनियोजयेत् ॥७॥

मनेंकरून निश्चित केलें जें कार्य तें वाणीकरून प्रसिद्ध करूंनये मसल
तीनें कार्य रक्षावें आणि त्याची योजना गुप्तपणें करावी प्रसिद्ध करणेतें
जाहाल्यानंतर करावें पूर्वी केलें असतां कार्य सिद्ध होत नाही.॥७॥

कष्टंचखलुमूर्खत्वंकष्टंचखलुयौवनम् कष्टात्कष्ट
तरंचैवपरगेहनिवासनं ॥८॥

मूर्खपणा महादुःख दायक होय तारुण्यही तसेंच दुःखकारक आहे
कांकीं तें रक्षावयाचें परम दुर्घट या दोंहीपेक्षां दुसऱ्याचे घरीं राहाणें
हें तर फारच दुःखदायक होय.॥८॥

शैलेशैलेनमाणिक्यंमौक्तिकंनगजेगजे साधवो
नहिसर्वत्रचंदनंनवनेवने ॥९॥

माणिक्य रत्न पर्वताचे ठायीं असतें खरें परंतु सर्वपर्वतीं मिळतनाहीं
हत्तीचेठायीं मोत्यें असतात परंतु सर्व गजाचे ठायीं असत नाहींत त

सेच साधू आहेत परंतु सर्वत्र आहेत असें नाहीं चंदनाचे वृक्ष व नांत असतात परंतु प्रतिवनीं आहेत असें नाहीं. ॥९॥

पुत्राश्चविविधैःशीलैर्नियोज्याःसततंबुधैः नीतिज्ञाः
शीलसंपन्नाभवंतिकुलपूजिताः ॥१०॥

ज्ञात्याहीं आपले पुत्र अनेक उत्तम स्वभावें करून संपन्न होत असें करावें ह्मणजे ते सत्स्वभावयुक्त नीती जाणणारे स्वकुलपूजित होतात.॥१०

मातावैरीपिताशत्रुर्बालोयेननपाठ्यते सभामध्ये
नशोभंतेहंसमध्येबकायथा ॥११॥

ज्या मातापितराहीं आपले पुत्र पढिवले नाहीत ती माता वैरी आणि तो बाप शत्रू हंसामध्यें जसे बक शोभत नाहींत तसे ते अविद्वान् विद्वानाचे सभेंत सन्मान पावत नाहीत. ॥११॥

लालनात्बहवोदोषास्ताडनात्बहवोगुणाः तस्मा
त्पुत्रंचशिष्यंचताडयेन्नतुलालयेत् ॥१२॥

गोड भाषण आलिंगनादि लालनें करून मुलाचें लालन करणें येणे करून मातापितरांस फार दोष आहे यास्तव विद्येविषयीं पुत्राचें अथवा शिष्याचें लालन नकरितां ताडणच करावें. ॥१२॥

श्लोकेनवातदर्धेनतदर्धार्धाक्षरेणच अवंध्यंदि
वसंकुर्यात्दानाध्ययनकर्मभिः ॥१३॥

एक श्लोक किंवा अर्धा श्लोक अथवा एकपाद शेवटीं एक अक्षर तरी प्रतिदिवशीं पढावें तशी दान अध्ययनादि कर्में करित जावीं दिवसव्यर्थ घालउंनये ज्या दिवशीं कोणताच चांगला उद्योग केला नाहीं तो दिवस वंध्य या करितां काहींतरी चांगला उद्योग करावा. ॥१३॥

कांतावियोगःस्वजनापमानोरणस्यशेषंकुनृपस्यसे
वा दरिद्रभावोविषमासभाचविनाग्निनैतेचदहंति

कायं॥१४॥

स्त्रीवियोग स्वजनापासून अपमान युद्धामध्यें राहिलेला योध्दा दुष्ट राजाची सेवा दरिद्रपणा विषमसभा ह्मणजे ज्या सभेंत लहान थोर ही व्यवस्था नाहीं ती सभा अशीं हीं साहाप्रकारचीं दुःखें पुरुषास प्राप्त झालीं असतां अग्निवांचून देहातें जाळितात-॥१४॥

नदीतीरेचयेवृक्षाःपरगेहेषुकामिनी मंत्रीहीना
श्चराजानोशीघ्रंनश्यंत्यसंशयं ॥१५॥

नदीचा तीरीचे वृक्ष आणि परगृहीं जाणारी तरुण स्त्री प्रधानावांचून राजे हे लवकर नाश पावतात यांत संशय नाहीं-॥१५॥

बलंविद्याचविप्राणांराज्ञांसैन्यंबलंतथा बलंवि
त्तंचवैश्यानांशूद्राणांचकनिष्ठिका॥१६॥

ब्राह्मणाचें बळ विद्या, राजाचें बळ सैन्य, वैश्याचें बळ द्रव्य, शूद्राचें बळ सेवा, त्या बळें करून हीन ते शोभत नाहींत-॥१६॥

निर्धनंपुरुषंवेश्याप्रजाभग्नंनृपंत्यजेत् खगावी
तफलंवृक्षंभुक्त्वाचाभ्यागतागृहम्॥१७॥

द्रव्यहीन पुरुषातें वेश्या त्यागित्ये, पालनादि शक्तिहीन राजातें प्रजा सोडित्ये, फलहीन वृक्षातें पक्षी सोडितात, ज्यागृहीं भोजन केलें त्याचा अभ्यागत त्याग करून जातात- ॥१७॥

गृहीत्वादक्षिणांविप्रास्त्यजंतियजमानकम् प्राप्त
विद्यागुरुंशिष्यादग्धारण्यंमृगास्तथा॥१८॥

ऋत्विज ब्राह्मण दक्षिणा घेऊन यजमानातें सोडितात, शिष्य विद्याप्राप्त जाहाल्यावर गुरूतें सोडून जातात, दग्धवन सोडून मृग अन्यत्र जातात, या श्लोकाचें तात्पर्य ज्या पासून जें आपणास मिळावयाचें असतें तोंपर्यंत त्यांचे आज्ञांकित असतात आणि मिळाल्यावर त्यांचा

सं. पै... अनु. ३२७

त्याग करून अन्यत्र जातात. ॥१८॥

दुराचारीदुराद्दृष्टिर्दुरावासीचदुर्जनः यन्मैत्री
क्रियतेपुंसानरःशीघ्रंविनश्यति ॥१९॥

ज्याचें आचरण दुष्ट ज्याची दृष्टी पापी आणि अमंगळ स्थानीं राहा णारा सर्वजनांस दुष्ट अशांची मैत्री जो करितो तो लवकरच नाशा तें पावतो. ॥१९

समानेशोभतेप्रीतीराज्ञिसेवाचशोभते वाणिज्यं
व्यवहारेषुस्त्रीदिव्याशोभतेगृहे ॥२०॥

आपल्या सारिख्यावर प्रीति केली असतां ती शोभते, सेवा राजाचेठा- यीं शोभते व्यवहारामध्यें वाणिज्य शोभते, सुंदर स्त्री गृहाचेठायीं शोभते. ॥२०॥

॥ इति वृद्धचाणाख्ये द्वितीयोऽध्यायः ॥२॥

---

कस्यदोषकुलेनास्तिव्याधिनाकेनपीडितः व्यसनं
केननप्राप्तंकस्यसौख्यंनिरंतरं ॥१॥

या लोकीं दोषरहित कोणाचें कुळ आहे, व्याधीनें पीडित नाहींत असे कोण आहेत, संकट प्राप्त जाहालें नाहीं असा कोण आहे, निरंतर सुख कोणास आहे, दोष व्याधि संकट रहित निरंतर सुखी एक आत्मा आहे.

आचारःकुलमाख्यातिर्देशमाख्यातिभाषणं संभ्र
मस्नेहमाख्यातिर्वपुराख्यातिभोजनं ॥२॥

कुळातें प्रसिद्ध करणारा एक कुळाचार होय, देशामध्यें प्रसिद्धि हो ण्यास कारण एक उत्तम भाषण, स्नेहातें प्रसिद्ध करणारा मोह, दे हातें पुष्ट करणारें भोजन. ॥२॥

सत्कुलेयोजयेत्कन्यांपुत्रंविद्यासुयोजयेत् व्य
सनेयोजयेच्छत्रुमिष्टंधर्मेणयोजयेत् ॥ ३ ॥

कन्या देणें ती उत्तम कूल पाहून द्यावी, पुत्रास विद्याभ्यासाचे ठायीं निरंतर लावावा, शत्रूतें संकटामध्येंच सदैव पाडावा, आपणासजी प्रियवस्तू असेल ती पूर्वी धर्माचे ठायीं योजावी. ॥ ३ ॥

दुर्जनस्यचसर्पस्यवरंसर्पोनदुर्जनः सर्पोदंशा
तिकालेनदुर्जनस्तुपदेपदे ॥ ४ ॥

दुर्जन, आणि दीर्घद्वेषी सर्प, या उभयतां मध्यें सर्प बरा कांकीं सर्प कदाचित् कालेंकरून दंश करितो दुर्जन पदोपदीं मर्मच्छेद करितो.

एतदर्थंकुलीनानांनृपाःकुर्वंतिसंग्रहं आदिम
ध्येवसानेषुनत्यजंतिचतेनृपं ॥ ५ ॥

दुर्जन फार घातक याजकरितां राजे कुलीनाचा संग्रह करितात कां कीं ते काळत्रयीं हि संग्रह करणाऱ्यांचा त्याग करीत नाहींत धन्यास संकटापासून रक्षितात. ॥ ५ ॥

प्रलयेभिन्नमर्यादाभवंतिकिलसागराः सागरा
भेदमिच्छंतिप्रलयेपिनसाधवः ॥ ६ ॥

प्रलयाचे पूर्वी समुद्र शांत अक्षोभ्य असतात तेच प्रलयकाळीं मर्यादा भेद करितात आणि भेदातें हि इच्छितात तसे साधू सर्वत्र अभेद पाहणारे प्रलय काळींहि भिन्न मर्याद होत नाहींत. ॥ ६ ॥

मूर्खस्तुपरिहर्तव्यःप्रत्यक्षोद्विपदःपशुः भिद्यते
वाक्यशल्येनअदृशंकंटकोयथा ॥ ७ ॥

मूर्ख आपणा पासून दूर करावा त्याशीं सहवास करूंनये कांकीं तो दोनपायांचा पशूच होय जसा कंटक अंधातें वेधितो तसा तोही वाक्बाणेंकरून सर्वांतें भेदितो. ॥ ७ ॥

ग्रं. सं. २९ १३

रूपयौवनसंपन्नाविद्यालकुलसंभवाः विद्याही
नानशोभंते निर्गंधाइवकिंशुकः ॥८॥

रूपानें आणि तारुण्यानें संपन्न आहेत तसे श्रेष्ठ कुलोत्पन्न आहेत तथापि ते जर विद्याहीन आहेत तर पुष्पादि संपत्ति युक्त सुगंध रहित पळसाचे वृक्षासारिखे शोभत नाहीत. ॥८॥

कोकिलानांस्वरंरूपंस्त्रीणांरूपंपतिव्रता. विद्यारू
पंकुरूपाणांक्षमारूपंतपस्विनां ॥९॥

कोकिळांचें रूप स्वर, त्या स्वरेंकरून सर्वांतें मोहित करतात स्त्रियांचें रूप एक पातिव्रत्यच होय, कुरूप पुरुषांचें रूप एक विद्या तेत्या विद्येनेंच शोभतात, तपस्व्यांचें रूप क्षमा तेक्षमेनें सर्व जिंकितात. ॥९॥

त्यजेदेकंकुलस्यार्थेग्रामस्यार्थेकुलंत्यजेत् ग्रामं
जनपदस्यार्थेआत्मार्थेपृथिवींत्यजेत् ॥१०॥

एक पुरुषाचा संग्रहें करून जर कुळाचा नाश होत आहे तर त्याचा त्याग करून कुळाचें रक्षण करावें, एका कुळाचा योगें करून जर ग्राम नाश पावतो तर ते कूळ ग्रामांतून काढून लावावें आणि ग्राम रक्षावा एका ग्रामामुळें जर देश उच्छिन्न होतो तर तो ग्राम मोडून टाकावा जर आत्मा नाश होत आहे तर पृथ्वी सोडून जावें आणि आत्मरक्षण करावें. ॥१०॥

उद्योगंनास्तिदारिद्र्यंजपतोनास्ति पातकं ॥ मौनेच
कलहोनास्तिनास्तिजागरतोभयं ॥ ११ ॥

उद्योग करणाऱ्यास दारिद्र्य प्राप्त होत नाहीं, निरंतर भगवन्नामजप करणाऱ्यास पातकाची बहूकता होत नाहीं, मौन धारण करणारास कलहाची बाधा होत नाही, जागरण करणारास कधींहि भीति प्राप्त होत नाहीं.

अतिरूपेणवैसीताअतिगर्वेणरावणः ॥ अतिदानं
बलिर्दत्वाअतिसर्वत्रवर्जयेत् ॥१२॥

सीता अति रूपवती होती यास्तव ती रावणानें नेली, रावणासहि गर्व ब हूत झाला तेणेंकरून तो नाश पावला, बळीनें गुरुवचन उल्लंघनकरून लोकोत्तर दान करिता झाला ह्मणोनच तो स्थानभ्रष्ट झाला याकरितां कोणतेंही कर्म फार करूंनये करील तो नाशपावेल. ॥१२॥

को हि भारः समर्थानां किं दूरं व्यवसायिनां को विदे
शः सुविद्यानां कः परः प्रियवादिनाम् ॥१३॥

समर्थास काहिं एक काम करायास अशक्य काय आहे, व्यवहार कर णारास कोणती वस्तू दूर आहे, विद्वान् पुरुषास कोणता परदेश आहे, आणि प्रियबोलणारास कोणता शत्रु आहे. ॥१३॥

एकेनापि सुवृक्षेण पुष्पितेन सुगंधिना वासितं त
द्वनं सर्वं सुपुत्रेण कुलं यथा ॥१४॥

वन मोटें विस्तीर्ण बहु व्याप्त आहे तथापि पुष्पित सुगंधयुक्त एका वृ क्षें करून हि तें सर्व वन सुशोभीत सुगंधयुक्त होतें, जसें सुपुत्राचे यो गें करून सर्व कुळ शोभा पावतें. ॥१४॥

एकेन शुष्कवृक्षेण दह्यमानेन वह्निना दह्यते त
द्वनं सर्वं कुपुत्रेण कुलं यथा ॥१५॥

अरण्य मोटें विशाल कोमल पल्लवादिकें करून अनेक वृक्ष संपन्न विराजित असें जरि आहे तथापि त्या वनांत एक शुष्क वृक्ष अग्नि नें जळत आहे तर त्याचा योगें करून तें सर्व वन कुपुत्रानें जसें सर्व कुळ दग्ध होतें तसें तें जळून जातें. ॥१५॥

एकेनापि सुपुत्रेण विद्यायुक्तेन साधुना आल्हादि
तं कुलं सर्वं यथा चंद्रेण शर्वरी ॥१६॥

विद्वान् असून साधू अशा एका सुपुत्रें करून संपूर्ण कुळ आनंदयुक्त होतें जशी रात्री चंद्रेंकरून सर्वांला आनंद कारक शोभायमान होत्ये. १६

किंजातैर्बहुभिःपुत्रैःशोकसंतापकारकैः वरमे
कःकुलालंबीयत्रविश्राम्यतेकुलम् ॥१७॥

शोक संताप करणारे बहूत पुत्र होऊन त्यांचा उपयोग काय संपूर्ण कुलाचा अविलंबी ह्मणजे धारण पोषण करणारा राजाचे आश्रयें करून सर्वकूल सुख पावतें असा एक असला तर तो सर्वांपेक्षां श्रेष्ठ जाणावा. ॥१७॥

लालयेत्पंचवर्षाणिदशवर्षाणिताडयेत् प्राप्तेतु
षोडशेवर्षेपुत्रेमित्रसमाचरेत् ॥१८॥

पुत्राचें लालन त्याचे जन्म दिवसा पासून पांच वर्षे पर्यंत करावें नंतर दाहावर्षे त्यास शिक्षेविषयीं ताडण करावें सोळावें वर्ष प्राप्त झालें असतां पुत्राविषयीं मित्रा प्रमाणें वागावें. ॥१८॥

उपसर्गेन्यचक्रेचदुर्भिक्षेचभयावहे असाधुजन
संपर्केयःपलायसजीवति ॥१९॥

उपसर्ग ह्मणजे पीडा प्राप्त झाली असतां, परचक्र ह्मणजे शत्रुची सेना आपणावर आली असतां, भयंकर दुर्भिक्ष प्राप्त झालें असतां, दुष्ट जनांचा संग प्राप्त झाला असतां, इतके समयीं जो पलायन करितो तो वांचतो.

धर्मार्थकाममोक्षेषुयस्यकोपिनविद्यते जन्मज
न्मनिमर्त्येषुमरणंतस्यकेवलं ॥२०॥

जन्म जन्माचे ठायीं धर्म अर्थ काम मोक्ष यांतून एकही पुरुषार्थ ज्यास घडला नाहीं त्याचें मरण मनुष्या मध्यें व्यर्थ जाणावें जन्मास येऊन ज्याणें त्याचें सार्थक केलें त्याचें मरण सफल होय. ॥२०॥

मूर्खायत्रनपूज्यंतेधान्यंयत्रसुसंचितं दंपत्यक
लहोनास्तितत्रश्रीःस्वयमागता ॥२१॥

ज्या गृहीं मूर्खाचा सत्कार होत नाहीं आणि ज्याच्या गृहीं धान्य संग्रह

निरंतर असतो अणखीं स्त्रीपुरुषांचा कलह नाहीं त्यागृहीं लक्ष्मी आपणच येऊन स्थीर राहात्ये. ॥२१॥

॥ इतिवृद्धचाणाख्ये तृतीयोध्यायः॥३॥

---

आयुःकर्मच वित्तंच विद्यानिधनमेवच पंचैता निहिसृज्यंतेगर्भस्थस्यैवदेहिनः॥१॥

आयुष्य, कर्म, द्रव्यसंग्रह, विद्या, आणि मरण हीं पांच प्राणी गर्भी असतांच त्याचे ललाटीं ब्रह्मदेव लिहित असतो. ॥१॥

* साधुभ्यस्तेनिवर्तंतेपुत्रामित्राणिबांधवाः येचतैः सहगंतारस्तद्धर्मात्सुकृतंकुलं॥२॥

ज्याचा अंकित जे पूर्वी पुत्रादिक असतात ते साधू जाहाल्यावर ते त्याचे पुत्र मित्रादिक त्या पासून दूर होतात जे त्यास अनुसरोन त्यासहवर्तमान जातात त्यांच्या सद्धर्मे करून त्यांचें सर्वकुल पुण्यवंत होतें.॥२॥

दर्शनध्यानसंस्पर्शैर्मत्सीकूर्मीचपक्षिणी शिशुंपालयतेनित्यंतथासज्जनसंगतिः॥३॥

दर्शन ध्यान स्पर्श इहीं करून मत्सी आणि कांसवीण तशीच पक्षिणी ह्या आपल्या अपत्यातें पाळितात तसे साधूहि दर्शनादिकें करून दीन जनातें रक्षितात. ॥३॥

यावत्स्वस्थोह्ययंदेहो यावन्मृत्युश्चदूरतः तावदात्महितंकुर्यात्प्राणांतेकिंकरिष्यति॥४॥

जावत्कालपर्यंत हा देह निरोगी असून स्वाधीन आहे अणखीं मृत्यु दूर आहे तावत्काल पर्यंत मनुष्यानें आत्महित करावें अंतकाळ समीप आल्यावर मग हीत कसें होईल. ॥४॥

कामधेनुगुणाविद्याअकालेफलदायिनी प्रवासे मातृसदृशीविद्यागुप्तंधनंस्मृतं ॥५॥

विद्येचेगुण कामधेनु सारिखे आहेत. विद्या अकस्मात फळातें देत्ये प्रवासीं विद्या माते सारिखी पोषण करिते. तस्मात् विद्या गुप्त धन होय. ५

एकोपिगुणवान्पुत्रो निर्गुणैश्चशतैरपि एकश्चंद्रस्तमोहंतिनचताराःसहस्रशः ॥६॥

गुणवान् एकच पुत्र जरी असला तरि तो बहुतापेक्षां अधिक जाणावा, निर्गुण शतपुत्र जरि झाले असले तरिते व्यर्थ त्यांचा काहीं उपयोग नाहीं, याविषयीं दृष्टांत एकचंद्र सर्व अंधकार दूर करितो सहस्रशः नक्षत्रें अल्पहि अंधकार दूर कर्ण्यास समर्थ नाहींत तेव्हां तीं असून काय उपयोग. ॥६॥

मूर्खश्चिरायुर्जातोपि तस्माज्जातोमृतोवरः मृतः सचाल्पदुःखाय यावज्जीवंजडोदहेत् ॥७॥

मूर्खपुत्र चिरायू जरी झाला तरी त्यापेक्षां मृतच जन्मास येतो तो बरा कांकीं तो क्षणमात्र दुःखदायक होतो आणि जो जड चिरंजिवी तो जन्मपर्यंत देहातें जाळीत असतो यास्तव पुत्रास विद्वान् करावें. ॥७॥

कुग्रामवासःकुलहीनसेवा कुभोजनंक्रोधमुखी चभार्या पुत्रश्चमूर्खोविधवाचकन्या विनाग्निना षट्प्रदहंतिकायां ॥८॥

कुग्रामीं राहाणें, कुलहीनाची सेवा, कदन्नभक्षण, सर्वकाळ क्रोधयुक्त जीचें मुख अशी स्त्री, पुत्र मूर्ख, आणि कन्या गतभर्तृका हीं साहा अग्निवांचून देहातें जाळितात. ॥८॥

किंतयाक्रियतेधेन्वायानदोग्धीनगुर्विणी कोर्थःपुत्रेणजातेनयोनविद्वान्नभक्तिमान् ॥९॥

जी दूध देत नाहीं आणि गर्भिणीहि नाहीं अशा धेनूचा काय उपयोग, जो विद्वान् नाही आणि भक्तिमान् हि नाहीं अशा पुत्राचा काय उपयोग, यांपासून दुःखमात्र उत्पन्न होईल.॥९॥

संसारतापदग्धानांत्रयोविश्रांतिहेतवः अपत्यं चकलत्रंचसतांसंगतिरेवच॥१०॥

संसाराचे तापेंकरून दग्ध झालेल्या जनास सूख होण्याविषयीं कारणें तीनच आहेत.एक सुंदर आपत्य, हास्यमुखी सुंदर स्त्री, आणि साधूची संगती हीं तीन यामध्यें सत्संगतीच श्रेष्ठ कांकीं तिचा संगेंकरून इहलोकीं सुख प्राप्त होऊन मुक्तीहि प्राप्त होते. ॥१०॥

सकृज्जल्पंतिराजानःसकृज्जल्पंतिपंडिताः सकृत्कन्याप्रदीयंतेत्रीण्येतानिसकृत्सकृत् ११॥

राजे आणि पंडीत हे उभयतां जें भाषण बोलावयाचें तें पूर्वीं विचार करून एकवेळ बोलतात.जर ते बोलिलेलें आपलें भाषण अन्यथा करतील तर मिथ्याभाषण करणाऱ्यास शिक्षा करणें आणि चांगला उपदेश करणें हें त्यांस कसें संभवेल कन्या देणे ती कुलशीलादि गुण विचार पूर्वीच करून द्यावी विवाहानंतर गुणदोष विचारकरून उपयोग नाहीं कारणकीं तिचें पुनर्दान होत नाहीं. राजभाषण आणि पंडिताचेंभाषण अणखी कन्यादान हीं एकवेळच होतात.॥११॥

एकाकिनातपोद्वाभ्यांपठनंगायनंत्रिभिः चतुर्भिर्गमनंक्षेत्रंपंचभिर्बहुभीरणः॥१२॥

तप करणें तें एकानेंच करावें, अध्ययन दोघांहीं करावें, गायन तिघांहीं करावे, कोठेंहि गमन करणें तें चवघांहीं करावें, कृषिकर्म पांचाही करावें आणि युध्दकरण्यास फार समुदाय असावा. ॥१२॥

साभार्यायाशुचिर्दक्षासाभार्यायापतिव्रता साभा

यायापतिप्रीतासाभार्यासत्यवादिनी ॥१३॥

जी पवित्र कर्माचे ठायीं सावध चतुर आणि पतीव्रता पतीचे ठायीं अखंड जीची प्रीति, आणि सत्यभाषण करणारी तीच भार्या ह्मणजे पोषण करावयास योग्य होय. ॥१३॥

अपुत्रस्यगृहंशून्यंदिशाःशून्यास्त्वबांधवाः मूर्ख स्यहृदयंशून्यंसर्वशून्यंदरिद्रता ॥१४॥

अपुत्राचें गृह शोभत नाहीं, बांधवहीन दिशा शोभत नाहींत, मूर्खाचे हृदय शून्य होय कारण कीं हृदय ज्ञानोत्पत्तीचें स्थळ तें ज्ञान ज्या हृदयांत नाहीं तें हृदय शोभत नाहीं, दरिद्रपणा हा सर्वशून्य जाणावा तात्पर्य जो धनवान तो निर्गुण जरी असला तरी लोक त्यास मोटा गुणज्ञ चतुर सुंदर इत्यादि बोलतात सर्व गुण धनाचे आश्रयें करून राहातात ह्मणून दरिद्री गुणज्ञ आणि चतुर असतांही तो दरिद्रामुळें शोभत नाहीं ह्मणून तो सर्वशून्य जाणावा. ॥१४॥

अनभ्यासेविषंशास्त्रमजीर्णेभोजनंविषं दरिद्र स्यविषंगोष्टीवृद्धस्यतरुणीविषं ॥१५॥

ज्याला अभ्यास नाहीं त्याला शास्त्र सुलभ असतां विषासारिखें दुस्तर वाटतें, पूर्वी भोजन केलेले अन्न पचन न झालें असतां त्यावर पुनर्भोजन विषासारिखें मारक होय, दारिद्र्यास गोष्टी विषासारिख्या रूचत नाहींत तो दरिद्रपणामुळें सर्वकाळ चिंताग्रस्त असतो, जो धनवान् त्यालाच अनेक विषय गोष्टी रूचतात, वृद्धपुरुषाला तरुण स्त्री विषा सारिखी दिसते ह्मणजे ज्याला ज्या विषयाची इच्छा होत नाहीं त्याला तो विषय विषा सारिखा दुःस्पर्श वाटतो. ॥१५॥

त्यजेद्धर्मंदयाहीनंविद्याहीनंगुरुंत्यजेत् त्यजेत्क्रो धमुखींभार्यांनिस्नेहान्बांधवांस्त्यजेत् ॥१६॥

जो धर्मेंकरून दयेकरून हीन त्याचा त्याग करावा, विद्याहीन गुरूचा त्याग करावा, सार्वकाळ क्रोधयुक्त जीचें मुख त्या स्त्रीचा त्याग करावा, ज्यानां स्नेह नाहीं त्या बांधवांचा त्याग करावा. ॥१६॥

अध्वाजरामनुष्याणांवाजिनांबंधनंजरा अमैथु
नंजरास्त्रीणांवस्त्राणामातपोजरा ॥१७॥

सार्वकाळ मार्ग चालण्याचा योगेंकरून मनुष्यास जरा प्राप्त होत्ये, मैथुनावांचून स्त्रियानां जरा लवकर प्राप्त होते, वस्त्रें उष्णामध्यें निरंतर वाळविलीं असतां तीं लवकर जीर्ण होतात. ॥१७॥

कःकालःकानि मित्राणि कोदेशःकोव्ययागमौ क
स्याहंकाचमेशक्तिरिति चिंत्यमुहुर्मुहुः ॥१८॥

काल कोणता जो कर्मविषयीं प्रशस्त प्रातरादिक तो काल जाणावा, मित्रें कोणती जीं निरपेक्ष कार्य करणारीं तीं, देश कोणता ज्या देशीं भय नाहीं तो, व्यय म्हणजे खर्च किती आणि आगम म्हणजे प्राप्ती किती, मी कोणाचा, माझी शक्ति किती याप्रकारें वारंवार विचार करावा. ॥१८॥

जनिताचोपनीताच यस्तुविद्यांप्रयच्छति अन्नदा
ताभयत्रातापंचैतेपितरःस्मृताः ॥१९॥

जनिता म्हणजे उत्पन्न करणारा, उपनीता म्हणजे मुंजीबंधन करणारा, आणि जो विद्या पढवितो तो, जो अन्न देतो तो, व भयापासून रक्षितो तो हे पांच पितृसम जाणावे ॥१९॥

राजपत्नीगुरोःपत्नीमित्रपत्नीतथैवच पत्नीमा
तास्वमाताच पंचैतामातरःस्मृताः ॥२०॥

राजाची स्त्री, तशीच गुरूची, मित्राची, आपल्या स्त्रीची माता, आणि आपली माता ह्या पांच मातृसम जाणाव्या. ॥२०॥

अग्निर्देवो द्विजातीनां मुनीनां हृदि दैवतम् प्रतिमा
स्वल्पबुद्धीनां सर्वत्र समदर्शिनः ॥२१॥

द्विजाती ह्मणजे ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य यांस अग्निदेव उपास्य जाणावा, मुनीचें दैवत हृदयाचे ठायींच जाणावें कांकीं ध्यान धरणें हाच त्यांचा मुख्य धर्म होय तस्मात् ध्यान करण्याचें स्थान हृदय जाणावें, अल्पबुद्धीजे यांस प्रतिमाच दैवत कारणकीं ते स्थूळबुद्धी त्यांस ईश्वर स्वरूपाचें ज्ञान नाहीं तेव्हां ते प्रतिमेचे ठायीं ईश्वराची भावना करून पूजन करितात, जे समदर्शी ज्ञानी आत्म्यातें सर्वत्र पाहाणारे त्यांस सर्वत्र देवच आहे. ॥२१॥

॥इतिवृद्धचाणाक्येचतुर्थोध्यायः॥४॥

---

गुरुरग्निर्द्विजातीनां वर्णानां ब्राह्मणो गुरुः पतिरेवगुरुस्त्रीणां सर्वस्याभ्यागतो गुरुः ॥१॥

ब्राह्मणादि तीन वर्णांस अग्नीच गुरु ह्मणजे उपासना करावयास योग्य जाणावा, सर्ववर्णांस ब्राह्मण गुरू जाणावा, स्त्रियांस पतीच गुरू ह्मणजे पूज्य आणि तारक होय, आणि सर्व जनास अभ्यागत ह्मणजे अनाहूत माध्याह्नकाळीं आलेला अन्नार्थी गुरुसारिखा पूज्य जाणावा. ॥१॥

यथाचतुर्भिः कनकं परीक्ष्यते निघर्षणच्छेदनतापताडनैः तथाचतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते त्यागेन शीलेन गुणेन कर्मणा ॥२॥

घर्षण, छेदन, तापविणे, आणि ताडन अशा चार उपायाहीं करून जशी सुवर्णाची परीक्षा करतात तशी दान, स्वभाव, गुण आणि

कर्म ह्मणजे आचरण ह्या चार उपायांहीं करून पुरुषाची परीक्षा करावी. ॥ २॥

तावद्भयेषुभेतव्यंयावद्भयमनागतं आगतंतु भयंदृष्ट्वाप्रहर्तव्यमशंकया॥३॥

जावत्काल पर्यंत भय प्राप्त झालें नाहीं तावत्काल पर्यंत त्याची भीति धरावी आणि तें प्राप्त झाल्यावर त्याची भीति नधरितां युक्तीनें परिहार करावें तसें नकेलें तर आपला नाश होईल. ॥३॥

एकोदरसमुद्भूताएकनक्षत्रजातकाः नभवंतिस माःशीलेयथाबदरिकंटकाः॥४॥

एका मातेचा उदरा पासून उत्पन्न झाले, अथवा एकनक्षत्रीं जन्मले असतां हि ते स्वभावा विषयीं सारखे होत नाहीत, जसे बदरीचे कंटक ह्मणजे बोरीचे कांटे. ॥४॥

निस्पृहोनाधिकारीस्यान्नाकामीमंडनप्रियः नाविदग्धःप्रियंब्रूयात्स्पष्टवक्तानवंचकः॥५॥

ज्याला कशाचीहि इच्छा नाहीं तो कोणत्याहि कर्मा विषयीं अधिकारी नाहीं, ज्याला कामना नाहीं तो अलंकार प्रिय होत नाहीं, जो अविदग्ध ह्मणजे मूर्ख त्याला प्रियभाषण बोलतां येत नाही, जो कोणतीही मनांत शंका नधरितां स्पष्ट भाषण करितो तो वंचक ह्मणजे दुसऱ्याला ठकविता होत नाहीं. ॥५॥

मूर्खाणांपंडिताद्वेष्याअधनानांमहाधनाः परांगनाकुलस्त्रीणांसुभगानांचदुर्भगाः॥६॥

मूर्ख पंडिताचा, दरिद्री धनवंताचा, व्यभिचारिणी पतीव्रतेचा, सुभगा ह्मणजे सौभाग्यादिकें संपन्न स्त्रियांचा. दुर्भगा ह्मणजे गतभर्तृकादि स्त्रिया द्वेष करितात. ॥६॥

आलस्योपहता विद्या परहस्तगतास्त्रियः अल्प
बीजंहतंक्षेत्रंहतंसैन्यमनायकं॥७॥

आलस्यें करून विद्या नाश पावते, स्त्रिया अन्य पुरुषाचा हस्तगत झाल्या असतां त्या भ्रष्ट होतात, ज्या शेतांत बीज अल्प ह्मणजे दळदारपणा नाहीं तें क्षेत्र लवकरच नाश पावतें, ज्या सैन्यांत नायक ह्मणजे त्यांचा निर्वाहक नाहीं तें सैन्य नाश पावतें. ॥७॥

अभ्यासाद्धार्यतेविद्याकुलंशीलेनधार्यते गुणैर्मि
त्राणिधार्यंतेअक्ष्णाक्रोधश्चधार्यते॥८॥

अभ्यासें करून विद्येचें धारण ह्मणजे संरक्षण करतात, उत्तमस्वभावें करून कुळाचें संरक्षण होतें, गुणांहीं करून मित्रें रक्षावीं, नेत्रें करून क्रोध धारण करावा. ॥८॥

वित्तेनरक्ष्यतेधर्मोविद्यायोगेनरक्ष्यते मृदुनार
क्ष्यतेभूपःसत्स्त्रियारक्ष्यतेगृहम्॥९॥

द्रव्येंकरून धर्माचें रक्षण करावें, यमाद्यष्टांग युक्त योगें करून ज्ञानाचें रक्षण करावें, मृदुपणें करून राजानें चिरकाळ आपणास रक्षावें, उत्तम स्त्रियेनें आपले उत्तमगुणें करून दक्षता धरून गृहाचें रक्षण करावें.

अन्यथावेदपांडित्यंशास्त्रमाचारमन्यथा अन्य
थायत्वदन्शांतंलोकाःक्लिश्यंतिचान्यथा॥१०॥

वेदाचे ठायीं पांडित्य करणें हें व्यर्थ कांकीं त्याचा सिद्धांत समजत नाहीं, आचाराभत शास्त्रवाद करणें व्यर्थ कांकीं यथाशास्त्र आचार कोणासही घडत नाहीं तेव्हां वादमात्र करणें काय उपयोग, शांत पुरुषाप्रत क्षोभक भाषण करणें व्यर्थ कांकीं त्याचे वचनें करून त्याला अल्प हि क्षोभ होणे नाहीं तस्मात् ज्ञात्यानें हीं तिनी वर्ज करावीं. ॥१०॥

दरिद्रनाशनंदानंशीलंदुर्गतिनाशनं अज्ञानना

शिनीप्रज्ञाभावनाभयनाशिनी ॥११॥

दान दरिद्राचा नाश करितें, शील ह्मणजे धन्यानें आपलें शेत कापून नेल्यानंतर त्या शेतांत पडलेलीं कणसें आणून तें धान्य भक्षिलें असतां शुद्धत्वाम्तव दुर्गतीचा नाश करितें, सद्बुद्धी अज्ञानाचा नाश करिते, भावना ह्मणजे भक्ती संसारभयाचा नाश करिते. ॥११॥

नास्तिकामसमोव्याधिर्नास्तिमोहसमोरिपुः नास्ति
क्रोधसमोवह्निर्नास्तिज्ञानात्परंसुखम् ॥१२॥

कामा सारिखा दुसरा व्याधि नाहीं, मोहा सारिखा सर्वघातक दुसरा शत्रु नाहीं, क्रोधा सारिखा दाहक इतर अग्नि नाहीं, ज्ञाना सारिखें सुखकारक इतर काहींच नाहीं. ॥१२॥

जन्ममृत्युर्हियात्येकोभुंजत्येकःशुभाशुभं नरके
षुपतत्येकोएकोयातिपरांगतिम् ॥१३॥

जन्म एकच पावतो, मृत्युही एकच पावतो, पुण्यफलातें अथवा पापफलातें एकच भोगितो, नरकाचेठायीं एकच पतन पावतो, मोक्षाप्रतहि एकलाच गमन करितो, तस्मात् कोणत्याहि कर्माविषयीं कोणीच कोणाला सहाय नाहीं जो जें करितो तोच त्याचें फळ भोगितो. ॥१३॥

तृणंब्रह्मविदःस्वर्गोतृणंशूरस्यजीवितं जिताक्षस्य
तृणंनारीनिस्पृहस्यतृणंजगत् ॥१४॥

ब्रह्मवेत्यास स्वर्ग तृणाप्रमाणें वाटतो, शूरास आपले प्राण तृणा प्रमाणें वाटतात, ज्याणें इंद्रियें जिंकिलीं त्यास स्त्रिया तृणा सारिख्या भासतात, जो निस्पृह ह्मणजे निरिच्छ त्याला सर्वजग तृणा सारखें तुच्छ वाटतें कारण त्याला कोणाचेंच अपत्य नाहीं. ॥१४॥

विद्यामित्रंप्रवासेषुभार्यामित्रंगृहेषुच व्याधित
स्यौषधंमित्रंधर्मोमित्रंमृतस्यच ॥१५॥

प्रवासाचेठायीं विद्या मित्र ह्मणजे हित कारणी जाणावी, घरामध्यें मित्र स्त्रीच होय कारणकीं गृहजन्य सुख स्त्री वांचून होत नाहीं, जो व्याधिग्रस्त झाला त्याला औषध मित्रापरि सुखदायक होतें, जो मृत्युपावला त्याणें पूर्वी जो धर्म केला असेल तो त्याला परलोकीं मित्रासारिखा सुख देतो. ॥१५॥

वृथावृष्टिःसमुद्रेषुवृथातृप्तेषुभोजनं वृथादानं धनाढ्येषुवृथादीपोदिवापिच ॥१६॥

समुद्रामध्यें पर्जन्यवृष्टी व्यर्थ कांकीं तेथें तिचा उपयोग नाहीं; जे तृप्त दुसऱ्याचें अन्नाची इच्छा करित नाहींत त्यांस भोजन देणें व्यर्थ जाणावें, जे धनाढ्य त्यांस दान देणें हें व्यर्थ कारणकीं त्यांस द्रव्याची आर्त नाहीं, दिवसाचे ठायीं दीप निरूपयोगी कांकीं तो आपला प्रकाश करण्यास सूर्याचे तेजापुढे समर्थ होत नाहीं. ॥१६॥

नास्तिमेघसमंतोयंनास्तिचात्मसमंबलं नास्ति चक्षुःसमंतेजोनास्तिधान्यसमंप्रियं ॥१७॥

मेघाचे उदका सारिखें दुसरें उदक निर्दोष निरोगी नाहीं, आपल्या बळाचे परि अन्य कोणतेंहि बळ नाहीं, नेत्रासारिखें दुसरें तेज नाहीं, धान्यासारिखें दुसरें काहींच प्रिय नाहीं जरी सर्व वस्तू अथवा अनेक विषय असले तथापि अन्नाखेरिज ते काय तृप्ती देणार आहेत ह्मणोन धान्यच प्रिय आहे ॥१७॥

अधनाधनमिच्छंतिवाचंचैवचतुष्पदः मानवाः स्वर्गमिच्छंतिमोक्षमिच्छंतिदेवताः ॥१८॥

जे द्रव्यहीन ते द्रव्याची इच्छा करितात, ज्यांस वाचा नाहीं ते वाणीची इच्छा करितात, मनुष्य स्वर्गाची इच्छा करितात, देव मोक्ष इच्छितात, तात्पर्य जी वस्तू ज्याला अप्राप्य असते त्याची तो इच्छा करतो १८

सत्येनधार्यतेपृथ्वीसत्येनतपतेरविः सत्येनवा
तिवायुश्चसर्वंसत्येप्रतिष्ठितं ॥१९॥

सत्येंकरून पृथ्वीचें धारण ह्मणजे स्थिती होत्ये, सूर्यही सत्येंकरूनच प्रकाश करितो, तसाच वायूहि सत्येंकरूनच वाहातो, सर्व विश्व सत्ये करून व्यवहार चालवितें, तस्मात् सत्व सर्वांचें धारक आहे हें ज्यास मर्यी नाशपावेल त्यासमयीं प्रळयच होईल. ॥१९॥

चलालक्ष्मीश्चलाःप्राणाश्चलेजीवितमंदिरे चला
चलेचसंसारेधर्मएकोहिनिश्चलः ॥२०॥

स्थावर जंगमात्मक जन्म मरण रूप संसाराचे ठायीं लक्ष्मी ह्मणजे संपत्ती तसेच प्राण आणि आयुष्य अणखीं गृह हीं सर्व चंचल क्षणिक आहेत एक धर्ममात्र निश्चल अविनाशी आहे यास्तव धनादिकें करून धर्माचाच संग्रह करावा. ॥२०॥

नराणांनापिकोधूर्तःपक्षीणांचैववायसः चतुष्प
दांशृगालस्तुस्त्रियांधूर्ताचमालिनी ॥२१॥

मनुष्यामध्यें नापीक चतुर, पक्ष्यामध्यें काक धूर्त, चतुष्पदामध्यें कोल्हा महा धूर्त, आणि स्त्रियांमध्यें माळीण धूर्त जाणावी. ॥२१॥

॥ इतिवृद्धचाणाक्ये पंचमोऽध्यायः ॥५॥

---

श्रुत्वाधर्मंविजानातिश्रुत्वात्यजतिदुर्मतिं श्रुत्वा
ज्ञानमवाप्नोतिश्रुत्वामोक्षमवाप्नुयात् ॥१॥

आपला धर्म कसा आहे तो शास्त्र श्रवणें करून जाणतो, दुर्बुद्धीतें शास्त्र श्रवणें करून टाकितो, ज्ञान शास्त्र श्रवणें करूनच पावतो, मोक्ष ही शास्त्र श्रवणें करूनच होतो. ॥१॥

पक्षिणांकाकश्चांडालःपशूनांचैवकुक्कुटः मुनी
नांकोपश्चांडालःसर्वचांडालनिंदकः ॥२॥

सर्व पक्ष्यामध्यें काकपक्षी चांडाळ ह्मणजे महा तीव्र होय, पशूमध्यें कुक्कुट चांडाळ जाणावा, ऋषींमध्यें क्रोध हा महा तीव्र सर्वघातकी चांडाळ जाणावा, सर्वांमध्यें निंदा करणार तो महाचांडाळ जाणावा ॥२

भस्मनाशुध्यतेकांस्यंताम्रमाम्लेनशुध्यति रज
साशुध्यतेनारीनदीवेगेनशुध्यति ॥३॥

कांस्यपात्र ग्रहणाविषयीं अयोग्य झालें असतां तें भस्में करून शुध होतें, तसेंच ताम्र आम्लें करून शुध होतें, स्त्रीनें काहीं अल्प दोष केले असतां ती रजेंकरून शुधता पावल्ये तशीच आठ मास पर्यंत नदी मळादिकें करून अपवित्र होल्ये ती उदकाच्या ओघेंकरून निर्मळहोल्ये.

भ्रमन्संपूज्यतेराजाभ्रमन्संपूज्यतेद्विजः भ्रमन्सं
पूज्यतेयोगीस्त्रीभ्रमंतीविनश्यति ॥४॥

जो राजा फिरतो तो निरंतर सत्कार पावतो, तसाच विद्वान् ब्राह्मणहि देशांप्रत फिरत असतां तोहि पूजा पावतो, त्याचप्रकारें योगीहि पावतो, ह्मणून सत्कारा करितां स्त्री आपलें घर सोडून दुसऱ्यांच्या घरास फिरूंलागेल तर ती नाश पावेल यास्तव स्त्रीनें स्वगृह सोडून अन्यत्र कोठेंच जाऊनये. ॥४॥

यस्यार्थस्तस्यमित्राणियस्यार्थस्तस्यबांधवाः यस्या
र्थःसपुमान्लोकेयस्यार्थःसचपंडितः ॥५॥

ज्याजवळ द्रव्य आहे त्याला मित्रें बहुत मिळतात. तसेंच बांधवहि त्याला अनुकूल होतात. तोच पुरुष लोकांत ख्यातिमान् होतो अणखीं तसाच तो पुरुष जनामध्यें मोटापंडित ह्मणजे ज्ञानी अशी प्रसिधी पावतो.

तादृशीजायतेबुद्धिर्व्यवसायोपितादृशः सहाया

स्तादृशाएवयादृशीभवितव्यता ॥६॥

जशी ज्याची भवितव्यता म्हणजे दैवेंकरून पुढें होणारी दशा असत्ये तदनुरूप त्याची बुद्धी पूर्वीच होत्ये त्याचा बुद्धीचा निश्चय हि तदनुसारच होतो त्यास सहायहि त्या प्रमाणेच मिळतात दैवेंकरून जें होणार असतें त्या सारिखें त्याला सर्व अनुकूल होतें. दैवास अन्यथा करणें असा समर्थ कोणीच नाहीं. ॥६॥

कालःपचतिभूतानिकालःसंहरतेप्रजाः कालः सुप्तेषुजागर्तिकालोहिदुरतिक्रमः॥७॥

आयुष्य हरण करून सकळ भूतांतें पक्कतेप्रत काळच नेतो पुढें प्रजांचा संहार तोच करितो सर्व प्राणी लय पावले असतां त्यासमयीं काळच जागृत असतो काल फार दुस्तर आहे तस्मात् सर्वकारण काळच होय. ॥७॥

नपश्यतिचजन्मांधःकामांधोनैवपश्यति नपश्यतिमदोन्मत्तोअर्थीदोषान्नपश्यति ॥८॥

जन्मा पासून जो अंध तो काहींच पाहात नाहीं. जो कामेंकरून अंध झाला म्हणजे मदनाचे वेगानें व्यापला तो हि तसाच पाहात नाही अणखीं मद्यादिकांचा मदेंकरून जो उन्मत्त झाला तोही पाहात नाहीं तसाच अर्थी म्हणजे याचक तोही लोभानें कोणत्याच दोषातें पाहात नाहीं. ८

स्वयंकर्मकरोत्यात्मास्वयंतत्फलमश्नुते स्वयंभ्रमतिसंसारेस्वयंतस्माद्विमुच्यते ॥९॥

आत्मा आपणच कर्म करितो त्या कर्माचें फळ आपणच पावतो संसाराचेठायीं आपणच भ्रमण पावतो अणखीं त्या पासून आपणच मुक्तही होतो. ॥९॥

राजाराष्ट्रकृतंपापंराज्ञःपापपुरोहितः भर्ताच

स्त्रीकृतंपापंशिष्यपापंगुरुस्तथा ॥१०॥

राज्यांत प्रजेनें केलेलें पातक राजानें धर्मेंकरून पालन न केलें असतां तो पावतो, राजानें केलेलें पातक पुरोहित भोगितो कारणकीं त्याणें राजाला चांगला उपदेश करून नीतिनें वर्तवावा तो नवर्तविला ह्मणून त्याचे पापाचा अधिकारी तो होतो, स्त्रीनें केलेलें पाप पती पावतो त्याणें तिचें पालन पोषण नकेलें ह्मणून, गुरूनें शिष्यास उत्तमप्रकारें शिक्षा केली नाहीं. यास्तव शिष्यानें जें दुरिताचरण केलें तें गुरु भोगितो.

ऋणकर्ता पिताशत्रुर्मोताचव्यभिचारिणी भार्या रूपवतीशत्रुःपुत्रःशत्रुरपंडितः ॥११॥

जो पिता पुत्रास ऋण करून ठेवितो तो शत्रुजाणावा, माता पुत्राचें परमदैवत असून जर ती व्यभिचारिणी आहे तर शत्रु जाणावी, जी स्त्री परमसुंदर रूपवती ती शत्रु सारिखीच समजावी कांकीं सौंदर्यामुळें तिजवर सर्व पुरुष सकाम अवलोकन करून मोहित करितात नंतर ती कुलदूषणीय होते ह्मणोन ती शत्रु, जो अविद्वान् तो पुत्र पित्यानें आपला शत्रु समजावा कांकीं तो अविद्वत्तेमुळें आपणास दुषण लावितो.

लुब्धमर्थेनगृह्णीयात्स्तब्धमंजलिकर्मणा मूर्खं छंदानुवृत्याचयथार्थत्वेनपंडितं ॥१२॥

आपला शत्रू जर बलवान् लोभी आहे तर त्याला द्रव्यानें वश करावा, जो स्तब्ध ह्मणजे अहंकारें करून मोठा गर्विष्ठ त्याला कर जोडून नम्रतेनें वश करावा, जो मूर्ख त्याला वश करणेंतर त्याचे मर्जीप्रमाणें वर्तोन आपलासा करावा, जो पंडित आहे त्याला वश करणे तो यथार्थ भाषणें करून करावा, कांकीं ज्ञात्याला मिथ्या भाषण रुचत नाहीं. ॥१२॥

वरंनराज्यंनकुराजराज्यं वरंनमित्रंनकुमित्रमित्रं वरंनशिष्योनकुशिष्यशिष्यो वरंनदारानकुदा

रदारा ॥१३॥

राजा अधर्मी प्रजेस पीडा करणारा राज्यांत असेल तर त्यापेक्षा मुळीं च नसलेला बरा, मित्र असतील तर सन्मित्र असावे कुत्सित मित्र उप योगीं नाहींत, शिष्य सुबुद्धि भक्तिमान् असावा कुशिष्य नसावा हें बरें, स्त्री पतिव्रता सुरूप असेल तर बरी कर्कशा वढाळ जारिणी नसावी.१३.

कुराजराज्येनकुतःप्रजासुखंकुमित्रमित्रेणकुतोस्ति निर्वृतिः कुदारदारैश्चकुतोगृहेरतिःकुशिष्यमध्या पयतःकुतोयशः ॥१४॥

दुष्ट राजाचे योगानें प्रजेला सुख कोठून होईल, कुत्सित मित्राच्या संबं धानें आनंद कसा होईल, दुष्ट स्त्रियेचे संबंधानें गृहाचेठायीं प्रीति कशी असेल, दुष्ट शिष्यास अध्ययन सांगणाऱ्या गुरूस कीर्ती प्राप्त कोठून हो ईल. ॥१४॥

सिंहादेकंबकादेकं शिक्षेच्चत्वारिकुक्कुटात् वायसा त्पंचशिक्षेच्च षट्शुनस्त्रीणिगर्दभात् ॥१५॥

सिंहा पासून एक गुण शिकावा, बका पासून हि एक शिकावा, कुक्कुटा पासून चार शिकावे, कावळ्या पासून पांच शिकावे, श्वाना पासून सा हा आणि गर्दभा पासून तीन गुण शिकावे. ॥१५॥

प्रभूतंकार्यमल्पंवा योनरःकर्तुमिच्छति सर्वारं भेणतत्कार्यं सिंहादेकंप्रचक्षते ॥१६॥

मोटें किंवा अल्प कार्य करावयास जो इच्छितो त्याणें तें कार्य सर्व प्रय त्नें करून करावें हा एक गुण सिंहा पासून शिकावा असें शास्त्र आहे.

इंद्रियाणिचसंयम्य बकवत्पंडितोनरः देशकाल बलंज्ञात्वासर्वकार्याणिसाधयेत् ॥१७॥

बका सारिखें ज्ञात्यानें सर्व इंद्रियांचें नियमन करून देश कालाचें

बलाबल पाहून सर्व कार्ये साधावीं हा गूण बकापासून घ्यावा. १७

प्रत्युत्थानंचयुद्धंचसंविभागंचबंधुषु स्वयमा
क्रम्यभुंजीतशिक्षेच्चत्वारिकुक्कुटात् ॥१८॥

प्रत्युत्थान ह्मणजे काळीं जागृत होणें, युद्ध करणें, आपण कणादिक धान्य संपादन करून, त्याचा भाग बंधूंला देउन नंतर स्वयें भक्षण करणें हे चार गूण कोंबड्या पासून ग्रहण करावे. ॥१८॥

गूढमैथुनधारिष्टंकालेकालेचसंग्रहं अप्रमत्त
मविश्वासःपंचशिक्षेच्चवायसात् ॥१९॥

मैथुन गुप्त, धैर्य, समयासमयाचे ठायीं संग्रह करणें, सावधपणें राहाणें, कोणाचाहि विश्वास न धरणें, हे कावळ्याचे गुण घ्यावे. ॥१९॥

बह्वाशीस्वल्पसंतुष्टःसुनिद्रोलघुचेतनः स्वामिभ
क्तश्चशूरश्चषडेतेश्वानतोगुणाः ॥२०॥

प्रसंगी बहूत भोजन करणें, आणि अल्पानेंही संतुष्ट राहाणें, निद्रा गाढ, असून त्वरित जागृत होणें, स्वामीची सेवा करणें, आणि शूरपणा हे सा हा गूण श्वानापासून शिकावे. ॥२०॥

सुश्रांतोपिवहेत्भारंशीतोष्णंनचपश्यति संतुष्ट
श्चरतेनित्यंत्रीणिशिक्षेच्चगर्दभात् ॥२१॥

अत्यंत श्रमला असतांहि भार घेणें, शीत उष्णहि नपाहाणें, निरंतर संतुष्टपणानें फिरणें हे तीन गूण गाढवाचे ग्रहण करावे. ॥२१॥

यएतान्विंशतिगुणानाचरिष्यतिमानवः कार्या
वस्थासुसर्वासुअजेयःसभविष्यति ॥२२॥

हे पूर्वोक्त वीस गूण यांतें जो आचरण करील तो मानव सर्व कार्याचे ठायीं अजिंक होईल. ॥२२॥

॥इतिवृद्धचाणाक्येषष्ठोध्यायः॥६॥

अर्थनाशंमनस्तापंगृहिणीचरितानिच नीचवा
क्यंचापमानंमतिमान्नप्रकाशयेत् ॥१॥

द्रव्याचा नाश, मनातील संताप, आपल्या स्त्रीचे आचरण, नीच जर दुष्टभाषण आपणास बोलिला तर, कोणी अपमान केला तर, बुद्धिमंतानें लोकांत प्रसिद्धीस आणूंनये. ॥१॥

धनधान्यप्रयोगेषुविद्यासंग्रहणेषुच आहारेव्य
वहारेचत्यक्तलज्जःसुखीभवेत् ॥२॥

धनधान्य संपादन करण्याचा उपाया विषयीं, विद्याभ्यास करण्यास, भोजनाचेठायीं, आणि व्यवहाराचे ठिकाणीं जो पुरुष लज्जा त्यागील तो सुखी होईल. ॥२॥

संतोषामृततृप्तानांयत्सुखंशांतिरेवच नचतद्ध
नलुब्धानामितश्चेतश्चधावतां ॥३॥

संतोष हेंच कोणेक अमृत त्याणेंकरून जे तृप्ती पावले त्यांस जें सूख आणि शांति आहे तशी धनाच्या लोभानें जे सर्वत्र संचार करणारे त्यांस कधींही सुखाचा किंवा शांतीचा लवलेश प्राप्त व्हावयाचा नाहीं. ॥३

संतोषस्त्रिषुकर्तव्यःस्वदारेभोजनेधने त्रिषुचैव
नकर्तव्योध्ययनेतपदानयोः ॥ ४ ॥

स्त्री, आणि भोजन, तसेंच द्रव्य, या तिहींचे ठायीं निरंतर संतोष असावा,, दान, अध्ययन आणि तप यांचेठायीं कधींहि तृप्ती नसावी. ॥४

विप्रयोर्विप्रवन्ह्योश्चदंपत्योःस्वामिभृत्ययोः अंत
रेणवगंतव्यंहरस्यवृषभस्यच ॥५॥

दोनब्राह्मण, विप्रआणिअग्नी, स्त्रीआणि पती, स्वामी आणि सेवक, शिव आणि नंदी यांचा मधून जाऊंनये गेलें तर पुण्याचा नाश होतो. ॥५

पदाभ्यांनस्पृशेदग्निंगुरुंब्राह्मणमेवच ॥ नैवगां नकुमारींचनवृद्धंचशिशुंतथा ॥ ६ ॥

अग्नी, गुरू, ब्राह्मण, गायी, कन्या, वृद्ध आणि शिशु या सातांस चरणस्पर्श करूंनये. अज्ञानें करून स्पर्श झाला असतां नमस्कार करावा बुध्या पदस्पर्श करील तो नरकाप्रत गमन करील. ॥ ६ ॥

शकटंपंचहस्तेनदशहस्तेनवाजिनं हस्तीहस्तस हस्त्रेणदेशत्यागेनदुर्जनं ॥ ७ ॥

शकट ह्मणजे गाडा या पासून पांच हात दूर असावें, अश्वा पासून दाहा हाता वरून, हत्तीपासून एक हजार हाताचे अंतरानें जावें आणि दुर्जन ज्या देशीं असेल तो देश टाकून दुसरे देशांतून जावें. ॥ ७ ॥

हस्तीअंकुशमात्रेणवाजीहस्तेनताड्यते शृंगील कुटहस्तेनखड्गहस्तेनदुर्जनः ॥ ८ ॥

हत्तीला ताडण करणें तर अंकुशें करून करावें, अश्वाला हस्तेंच करून, गाई महिषी इत्यादिकांस काष्ठ हस्तानें आणि दुर्जनाला खड्गयुक्त हस्तें करून ताडन करावें कांकीं या ताडनावांचून तो सरळ होणार नाहीं. ॥ ८

तुष्यतिभोजनेविप्रामयूराघनगर्जिते साधवः परसंपत्तौखलाःपरविपत्तिषु ॥ ९ ॥

ब्राह्मण भोजनाचे ठायीं संतोष पावतात, मयूर मेघाची गर्जना श्रवण करून आनंद पावतात, अन्याची संपत्ति पाहून साधू संतुष्ट होतात, दुसऱ्याची विपत्ति पाहून दुर्जनांस अति हर्ष होतो. ॥ ९ ॥

अनुलोमेनबलिनंप्रतिलोमेनदुर्जनं आत्मतुल्य बलंशत्रुंविनयेनबलेनवा ॥ १० ॥

बलवंतास अनुकूल होऊन जिंकावा, दुर्जनास प्रतिकूल होऊन जिंकावा, आपल्या समान ज्याचें बळ त्या शत्रूस विनयेंकरून किंवा बळें करू

न जिंकावा. ॥ १० ॥

बाहुर्वीर्यंबलंराज्ञोब्राह्मणोब्रह्मविद्बली रूपयौ
वनमाधुर्यंस्त्रीणांबलमनुत्तमं ॥ ११ ॥

बाहु पराक्रमच राजाचें बळ जाणावें, ब्राह्मण ब्रह्मवेत्ता जो तोच बल वान् जाणावा, रूप आणि तारुण्य तसेंच मधुर भाषण हेंच स्त्रियांचें उत्तम बळ होय, या तिहीं बलें करून तिघे सर्वजनास जिंकितात. ॥ ११ ॥

नात्यंत सरलैर्भाव्यं गत्वापश्यवनस्थली छिद्यंते
सरलास्तत्र कुब्जास्तिष्ठंतिपादपाः ॥ १२ ॥

अत्यंत सरलपणा धरूंनये पुरुषाहीं कांहीं क्रोधयुक्त असावें जे फारच सरळ असतात त्यांची अवस्था कशी होते ती वनांत जाऊन पहातें काय तर वनांत जे सरळ वृक्ष असतात त्यांतें सर्वलोक तोडितात आणि जे वांकडे ते तसेच राहातात यास्तव लोकांमध्यें कांहीं काळ आपली स्थिती असावी अशी इच्छा असल्यास त्याहीं किंचित क्रोध जरधरिला तरच त्यांची लोकामध्यें स्थिती होईल. ॥ १२ ॥

यत्रोदकंतत्रवसंति हंसास्तथैवशुष्कंपरिवर्जयंति
नहंसतुल्येननरेणभाव्यंपुनस्त्यजंतेपुनराश्रयंते ॥ १३

ज्या स्थानीं उदक असतें तेथें हंस राहातात आणि जें शुष्क जाहालें त्याचा त्याग करितात जसे शुष्क तटाकाचा त्याग करून हंसपक्षी जलयुक्ताचा आश्रय करितात पुनः कालांतरीं त्याचाही त्याग करितात याप्रमाणें मनुष्यानें होऊंनये ज्याचा एकवार आश्रय केला त्याला संपत्तिसमयीं जसा सोडित नाहीं तसा आपत्तिसमयींहि सोडून अन्यत्र जाऊंनये सोडून जाणें हें कुलीन पुरुषास योग्य नाहीं. ॥ १३ ॥

उपार्जितानांवित्तानांत्यागएवहिरक्षणम् तटाको
दरसंस्थानांपरिस्त्रवइवांभसां ॥ १४ ॥

श्रमें करून संपादन केले जे अर्थ त्यांचा त्याग ह्मणजे सत्पात्रीं दान दे णे हेंच संरक्षणहोय जसें तळाकांत उदकें असतात त्यांचे पाझर बाहे र निघाले तर तीं उदकें निर्मळ होऊन वृद्धी पावतात त्या प्रकारें करून दानानें द्रव्यें शुद्धी पावोन वृद्धीही पावतात तस्मात् अर्थाचें रक्षण आ णि वृद्धिकरणारे सत्पात्र दानच होय.॥१४॥

यस्यार्थस्तस्य मित्राणि यस्यार्थस्तस्य बांधवाः य
स्यार्थः स पुमान्लोके यस्यार्थः स च जीवति॥१५॥

ज्याला द्रव्य अनुकूल आहे त्यास मित्रें आणि बांधवहि हितकारक प्राप्त होतात, आणि तोच लोकामध्यें ख्याती पावोन जीवनहि पावतो तस्मात् लोकामध्यें अर्थासारिखी अन्य वस्तू श्रेष्ठ नाहीं यास्तव प्रय त्नें करून द्रव्य संग्रह करावा ह्मणजे सर्व अनुकूल होतें.॥१५॥

स्वर्गस्थितानामिह जीवलोके चत्वारि चिन्हानि वसं
ति देहे दानप्रसंगो मधुरा च वाणी देवार्चनं ब्राह्मण
तर्पणं च॥१६॥

निरंतर दानप्रसंग, गोड भाषण करणें, देवाचें पूजन, ब्राह्मणभोजन, हीं चार लक्षणें या मनुष्य लोकीं ज्याचा देहीं सतत राहातात ते स्वर्गींच आहेत असें समजावें.॥१६॥

अत्यंतकोपः कटुरा च वाणी दरिद्रता च स्वजनेषु वै
रं नीचप्रसंगः कुलहीनसेवा चिन्हानि देहे नरकस्थि
तानां॥१७॥

फार क्रोध, कठोर भाषण, दरिद्रपणा, स्वजनासीं वैर, नीचाचा प्रसं ग आणि कुलहीन सेवा हीं साहा नरकाचीं चिन्हें ज्याचे देहीं निरंत र वसतात ते नरकांतच आहेत असें जाणावें.॥१७॥

गम्यते यदि मृगेंद्रमंदिरं लभ्यते करिकपोलमौक्ति

कं जंबुकालयगतेचप्राप्यतेवत्सपुच्छखरचर्म खंडनम्॥१८॥

सिंहाचा गृहाप्रत जर गेलें तर हत्तींचे गंडस्थळींचें मोती प्राप्त होतें, आणि कोल्ह्याचा गृहास जर गेलें तर वत्साचें पुच्छ अथवा गर्दभा चे चर्माचा तुकडा मिळतो, तस्मात् याचकानें जर याचकवृत्तीस जा णें तर थोराचे घरीं जावें गरीब दरिद्र्याचे जाऊंनये कांकीं तेथें फ ळप्राप्त होणार नाहीं.॥१८॥

श्चुनःपुच्छमिवव्यर्थंजीवितंविद्ययाविना नगु ह्यगोपनेशक्तंनचदंशनिवारणे॥ १९॥

श्वानाचें पुच्छ जसें आपलें गुद आच्छादन करावयास आणि आप ले देहावरील मक्षिका निवारण करावयास समर्थ नाहीं तें असून जसें व्यर्थ, तसें विद्याहीन पुरुषाचें जीवित्व व्यर्थ जाणावें कांकीं वि द्येवांचून आपलें आणि कुटुंबाचेंहि संरक्षण करावयास समर्थ ना हीं यास्तव अविद्वान् पुरुषाचे जीवित्व व्यर्थ.॥१९॥

वाचाशौचंचमनसःशौचमिंद्रियनिग्रहः सर्व भूतदयाशौचमेतच्छौचंपरार्थिनां॥२०॥

कठोर शब्दें करून दुसऱ्याचेंमनास दुःख न देणे, आणि दुसऱ्याचें मर्म उच्चारण न करणें हें वाणीचें शुध्दत्व,, सर्व वासनांचा त्याग करून इं द्रियांचा निग्रह करणें आणि स्थिरपणें ईश्वरीं राहाणें हें मनाचें निर्मलत्व, मोक्षार्थी जे यांस सर्वभूतीं दया हेंच त्यांचें शौच याणेच करून ते मो क्षाप्रति पावतील.॥२०॥

पुष्पेगंधंतिलेतैलंकाष्ठेवह्निपयोघृतम् इक्षौगु डंतथादेहेपश्यात्मानंविवेकतः॥२१॥

पुष्पामध्यें गंध अदृश्य रूपें आहे तो अवघ्राणें करून जसा जा

णतात, तिळामध्यें तैल अदृश्यपणें करून आहे तें जसें यंत्रानें त्याचें मर्दन करून प्रत्यक्ष करितात, काष्ठामध्यें अग्नि अगोचर आहे तो मंथनें करून गोचर करितात, दुग्धांत घृत गुप्तरूपें करून आहे तें भिन्न करतात, उसांत गुळ अदृश्य आहे तोही उपायें करून वेगळा करितात, तसा देहीं जो आत्मा देहरूप दिसतो तो विवेकरूप उपायें करून भिन्न अविनाशी पाहावा. ॥२१॥

॥ इति वृद्धचाणाक्ये सप्तमोध्यायः ॥७॥

---

अधमा धनमिच्छंति धनमानं च मध्यमाः उत्तमा मानमिच्छंति मानो हि महतां धनम् ॥१॥

अधम लोक द्रव्यातें इच्छितात्. धनातें आणि मानातें मध्यमजन इच्छितात्. उत्तमजन मानाचीच इच्छा करितात. त्यांस तेंच धन होय. ॥१॥

इक्षुरापः पयो मूलं तांबूलं फलमौषधम् भक्षयित्वापि कर्तव्याः स्नानदानादिकाः क्रियाः ॥२॥

ऊस. उदक. दुग्ध. मूल ह्मणजे कणगरादिक. फल. तांबूल आणि औषध हे पदार्थ भक्षण करून हि स्नानदानादि कर्में केल्यास दोष नाहीं. २

दीपो भक्षयते ध्वांतं कज्जलं च प्रसूयते यदन्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा ॥३॥

दीप अंधकारातें भक्षितो आणि कज्जलरूप प्रजेतें प्रसवतो तस्मात् जो जें अन्न भक्षितो तदनुरूप गुण बलादि संतति त्याला होत्ये. ॥३

वित्तं देहि गुणान्वितेषु मतिमान् नान्यत्र देहि क्वचित् प्राप्तं वारिनिधेर्जलं घनमुखे माधुर्ययुक्तं सदा जीवा

स्थावरजंगमांश्चसकलान्संजीव्यभूमंडलंभूयः
पश्यतदेवकोटिगुणितंगच्छेत्तमंभोनिधिम् ॥ ४ ॥

हे बुद्धिमंता दान देणें तर गुणवंतासच दे निर्गुणास कधींहि देऊंनको. गुणिजनास दिल्याचें फळ जसें क्षारोदक मेघाचे मुखीं प्राप्त झालें अ सतां निरंतर मधुर होऊन स्थावर जगमादि सर्व जीवातें आणि भूमंड लातें संजीवन करून पुनः पहा तेंच उदक कोटिगुण अधिक होऊन स मुद्रास पावतें असेंच सत्पात्रीं दान केलें असतां त्याप्रत अनेक गुणित प्राप्त होतें. ॥ ४ ॥

चांडालानांसहस्रैश्चसूरिभिस्तत्वदर्शिभिः एको
हियवनःप्रोक्तोननीचोयवनात्परः ॥ ५ ॥

यथार्थ पाहाणारे ज्ञाते याहीं अनेक सहस्र चांडालांच्या साम्यतेस एक यवन कथिला आहे तस्मात् यवनाहून नीच कोणीच नाहीं. ॥ ५

तैलाभ्यंगेचिताधूमेमैथुनेक्षौरकर्मणि तावद्भव
तिचांडालोयावत्स्नानंसमाचरेत् ॥ ६ ॥

तैलाभ्यंग केला असतां. चिताधूम घेतला असतां. मैथुनकेल्यावर. आणि क्षौरकर्म केल्यावर जावत्काल स्नान केला नाहीं तावत्काल पर्यं त तो चांडाळा सारिखा होय स्नानानंतर शुद्ध होतो. ॥ ६ ॥

अजीर्णेभेषजंवारिजीर्णेवारिबलप्रदम् भोज
नेचामृतंवारिभोजनांतेविषप्रदम् ॥ ७ ॥

अजीर्णावर उदक प्राशन केलें असतां तें औषधरूप होऊन अजी र्ण नाश करितें, अन्न जिरल्या नंतर उदक प्राशन केलें असतां तें बल प्रद होतें, भोजनकाळीं उदक प्राशन केले असतां तें अमृता सारिखें आ रोग्य करितें, भोजन झाल्यावर जलपान केलें असतां तें विषा सारिखें होतें. ॥ ७ ॥

हतंज्ञानंक्रियाहीनंहतश्चाज्ञानतोनरः हतंनिर्ना
यकंसैन्यंस्त्रियोनष्टाह्यभर्तृकाः॥८॥

ज्ञान असतां जो कर्म करित नाहीं त्याचें ज्ञानव्यर्थ.ज्याला ज्ञान नाहीं तो मानव असोन नाहींच असा जाणावा.ज्या सैन्यांत नायक ह्मणजे रक्षणकर्त्ता नाहीं तें सैन्य असोन व्यर्थ कांकीं त्याचे हातून काहींच पराक्रम व्हावयाचा नाहीं.ज्या स्त्रियांचे पती नाहीत त्या जीवंत असून मृतच जाणाव्या.॥८॥

वृद्धकालेमृताभार्याबंधुहस्तगतंधनं भोजनंच
पराधीनंतिस्रःपुंसांविडंबनाः॥९॥

वार्द्धक्य काळीं स्त्री मृत्य पावली असतां.द्रव्य बंधूचा हस्तगत झालें असतां.आणि भोजन दुसऱ्याचे हातीं ह्या तीन प्रकारच्या पुरुषास विडंबना होत.॥९॥

अग्निहोत्रंविनावेदानचदानंविनाक्रिया नभावे
नविनासिद्धिस्तस्माद्भावोहिकारणम्॥१०॥

अग्निहोत्रा वांचून वेद शिकलेला सफळ होत नाहीं.दाना वांचून कर्मे फळप्रद होत नाहीत.आणि कोणतीहि सिद्धि भक्ति वांचून नाहीं.यास्तव भक्तीच कारण मुख्य होय.॥१०॥

काष्ठपाषाणधातूनांकृत्वाभावेनसेवनं श्रद्धया
चतथासिद्धिस्तस्यविष्णुप्रसादतः॥११॥

काष्ट.पाषाण.आणि धातू यांच्या मूर्तिचे ठायीं ईश्वर रूप भावना धरून सेवाकेली असतां ईश्वर रूपेने निश्चयें करून सिद्धिप्राप्त होते.११

नदेवोविद्यतेकाष्ठेनपाषाणेनमृन्मये भावेहि
विद्यतेदेवस्तस्माद्भावोहिकारणम्॥१२॥

काष्ठ पाषाण आणि मृत्तिका यांचे प्रतिमेचेठायीं देव राहातो असें

हि नाहीं तर एक भक्तिचे ठायीं देव राहातो तस्मात् ईश्वर प्राप्ती वि षयीं एक भक्तीच असली पाहिजे.॥१२॥

शांतितुल्यंतपोनास्तिनसंतोषात्परंसुखम् नतृ
ष्णायाःपरोव्याधिर्नचधर्मोदयापरः॥१३॥

शांति सारिखें दुसरें तप नाहीं. संतोषाहून इतर सूख नाहीं. तृष्णे सारिखा कोणताच व्याधी दुसरा नाहीं. दयेहून श्रेष्ठ दुसरा कोणता हि धर्म नाहीं.॥१३॥.

क्रोधोवैवस्वतोराजातृष्णावैतरणीनदी विद्याका
मदुघाधेनुःसंतोषोनंदनंवनम्॥१४॥

क्रोधच यम राजा. तृष्णा हीच वैतरणी नदी. विद्या ह्मणजे ज्ञान तीच इच्छित मनोरथ पूर्ण करणारी कामधेनु. आणि संतोष हाच स्वर्ग जें स्वर्गी सूख तेंच संतोषानें प्राप्त होत असतें.॥१४॥

गुणोभूषयतेरूपंशीलंभूषयतेकुलम् सिद्धिर्भूष
यतेविद्यांभोगोभूषयतेधनम्॥१५॥

गुणच स्वरूपातें शोभवितो. उत्तम स्वभाव कुळातें अलंकृत करितो. सिद्धि विद्येतें शोभायमान करिते. भोगच द्रव्यानें भूषित करतो.

निर्गुणस्यहतंरूपंदुःशीलस्यहतंकुलं असिद्ध
स्यहताविद्याअभोगेनहतंधनम्॥१६॥

ज्याला कोणताच उत्तम गुण नाहीं तो स्वरूप असतांहि शोभत नाहीं. ज्याचा स्वभाव चांगला नाहीं त्याचें कुळ जनामध्यें निंद्य होतें. ज्याला कोणतीहि सिद्धि नाहीं त्याची विद्या विशोभित दिसते. जो द्रव्याचा उपभोग करित नाहीं त्याचें द्रव्य व्यर्थ नाश पावतें.॥१६॥

शुद्धभूमिगतंतोयंशुद्धानारीपतिव्रता शुचिःक्षे
मकरोराजासंतोषीब्राह्मणःशुचिः॥१७॥

भूमीतील उदक शुद्ध. आणि जी स्त्री पतिव्रता ती शुद्ध जाणावी. प्रजेचें कल्याण करणार जो राजा तो पवित्र असा समजावा. आणि ब्राह्मण सदा संतोषयुक्त असणारा तो पवित्र जाणावा. ॥१७॥

असंतुष्टाद्विजानष्टाः संतुष्टाश्चमहीभृतः सलज्जा
गणिकानष्टानिर्लज्जाश्चकुलांगनाः ॥१८॥

ज्याला कधींही किती द्रव्य मिळालें असतां संतोष मानीत नाहीं तो ब्राह्मण. अल्पद्रव्यानें संतोष पावणारा राजा. आणि लग्न झालेली स्त्री जी अमर्याद भाषण करणारी अशी हीं नष्टच जाणावीं. ॥१८॥

किंकुलेनविशालेन विद्याहीनेनदेहिनां दुष्कुली
नोपि विदुषोदेवैरपिसपूज्यते ॥१९॥

मनुष्याचें कूल जरी बहुत विस्तीर्ण आहे तथापीं जरतें विद्याहीन आहे तर त्याचा काहीं उपयोग नाहीं दुष्टकुलांतील असतांहि जर तो विद्वान् आहे तर त्याची पूजा देवहि करितात. ॥१९॥

विद्वान्प्रशस्यतेलोकेविद्वान्सर्वत्रगौरवम् विद्य
यालभतेसर्वंविद्यासर्वत्रपूज्यते ॥२०॥

विद्वान् सर्वत्र लोकामध्यें प्रशंसेतें पावतो. आणि जनांत महत्वही पावतो विद्येनें ज्या दुर्लभ वस्तू त्या सुलभ होतात तस्मात् विद्याच सर्वत्र पूज्य होय तेणें करून पुरुष शोभा पावतो. ॥२०॥

रूपयौवनसंपन्ना विशालकुलसंभवाः विद्याही
नानशोभंते निर्गंधाइव किंशुकाः ॥२१॥

स्वरूपें करून, तारुण्यें करून संपन्न, तसेच थोरकुळीं उत्पन्न झालेले जरी आहेत तथापि ते जर विद्याहीन आहेत तर शोभत नाहींत पत्र पुष्पादिकें करून संपन्न सुशोभित असतांही सुगंधावांचून जसे पळसाचे वृक्ष शोभत नाहींत तसेच ते जाणावे. ॥२१॥

मांसभक्षाःसुरापाना मूर्खाश्चाक्षरवर्जिताः पशु
भिःपुरुषाकारैर्भाराक्रांताचमेदिनी॥२२॥

मांस भक्षण करणारे, मद्यपान करणारे आणि ज्यांला एकही अक्षर येत नाहीं ह्मणजे केवळ अविद्वान् हे मनुष्याकार पशूच होत अशां चे भारानें पृथ्वी आक्रांत मात्र होते त्यांचा कांहींच उपयोग नाहीं ते जन्मास येऊन व्यर्थ होत.॥२२॥

अन्नहीनोदहेद्राष्ट्रंमंत्रहीनश्चऋत्विजः यजमा
नंदानहीनोनास्तियज्ञसमोरिपुः॥२३॥

यज्ञ करावा हें फार श्रेष्ठ खरें परंतु तो जर अन्न दान हीन झालातर राज्यातें दग्ध करितो, मंत्र हीन झाला असतां ऋत्विजब्राह्मणास जा ळितो, आणि दक्षिणाहीन झाला असतां यजमानाचें दहन करितो या करितां यज्ञासारिखा दुसरा शत्रु नाहीं असें सिद्ध आहे परंतु तो यज्ञ यथासांग झाला असतां त्यासारिखा दुसरा हितकर्ताच नाहीं.॥२३॥

॥इतिवृद्धचाणाख्ये अष्टमोध्यायः॥८॥

---

मुक्तिमिच्छसिचेत्तातविषयान्विषवत्त्यज क्षमा
र्जवदमानशौचंसत्यंपीयुषवत्पिब॥१॥

हे बापा तूं जर मुक्तितें इच्छितोस तर विषयांचा विषासारिखा त्याग कर. आणि सहनता, सरळपणा, इंद्रियनिग्रहता, निर्मळपणा, तसेंच सत्य यांचें सेवन अमृतासारिखें कर ह्मणजे मुक्ती पावशील.॥१॥

परस्परस्यमर्माणियेभाषंतेनराधमाः तएववि
लयंयांतिवल्मिकोदरसर्पवत्॥२॥

जे पुरुष अधम असतात ते परस्पर एकमेकांची मर्मे जनांत प्र

सिद्धीस आणितात ते आपला नाशकरून घेतात जसा वारुळांतील सर्प आंतचे आंत वेष्टित होऊन मृत्य पावतो त्याच प्रकारें द्वेष कर्ते आपला नाश आपण करितात.॥२॥

गंधः स्वर्णे फलमिक्षुदंडे नाकारि पुष्पं खलु चंदनस्य विद्वान् धनी को नृप दीर्घजीवी धातुः पुरा कोपि न बुद्धिदोभूत् ॥३॥

स्वर्णाचे ठायीं सुगंध उसाला फळ. चंदनाचे वृक्षास पुष्प. विद्वान् पुरूष धनाढ्य. राजा चिरजीवी. असे या सृष्टीचे ठायीं ब्रह्मदेवानें गुण कोणासच दिल्हे नाहीत कां कीं यांस उत्पन्न केलें त्याकाळीं ब्रह्मदेवास बुद्धि शिकविणारा दुसरा कोणी संनिध नवता.॥३॥

सर्वौषधीनाममृता प्रधाना सर्वेषु सौख्येष्वशनं प्रधानं सर्वेंद्रियाणां नयनं प्रधानं सर्वेषु गात्रेषु सिरः प्रधानं ॥४॥

सकल औषधीं मध्यें अमृता ह्मणजे दूर्वा श्रेष्ठ, सर्व सौख्यामध्यें भोजन सौख्य मुख्य जाणावें, सकळ इंद्रियांमध्यें नयनेंद्रिय प्रधान, त्या वांचून सर्व इंद्रियें व्यर्थ होत, सर्व गात्रां मध्यें मस्तक श्रेष्ठ जाणावें.॥४॥

दूतो न संचरति खे न चलेच्च वार्ता पूर्वं न जल्पितमिदं न च संगमोस्ति व्योम्नि स्थितं रविशशिग्रहणं प्रशस्तं जानाति यो द्विजवरः स कथं न विद्वान् ॥५॥

ज्या स्थानीं दूतांची गती नाहीं. आणि जेथें वार्ताहि चालत नाहीं. जें पूर्वीं कोणीं कथिलें नाहीं. ज्याचा कधींहि समागम व्हावयाचा नाहीं अशा आकाशा मध्यें राहाणारे चंद्र सूर्य त्यांचें ग्रहण प्रशस्तपणें जो ब्राह्मण श्रेष्ठ जाणतो तो ज्ञाता कसा न ह्मणावा.॥५॥

विद्यार्थी सेवकः पांथः क्षुधार्तो भयकातरः भां

डारीप्रतिहारीचसप्तसुप्तान्प्रबोधयेत्॥६॥

विद्यार्थी. चाकर. मार्गस्थ. क्षुधार्त. भयभीत. धनादिकांचा रक्षक. भां
डारी आणि द्वारपाळ हे सात निद्रा केले असतां जागृत करावे.॥६॥

अहिंनृपचशार्दूलंवृंटिंचबालकंतथा परश्वानं
चमूर्खंचसप्तसुप्तान्नबोधयेत्॥७॥

सर्प. राजा. व्याघ्र. वृंटीनामाचा जीव विशेष. बाळक. दुसऱ्याचें श्वान
आणि मूर्ख हे सात निद्रा केले असतां यांतें जागृत करूंनये.॥७॥

अर्थाधीताश्चयैर्वेदास्तथाशूद्रान्नभोजनाः तेद्वि
जाःकिंकरिष्यंतिनिर्विषाइवपन्नगाः॥८॥

द्रव्य संपादना करितां ज्यांहि वेदाध्ययन केलें ते आणि निरंतर शूद्रा
न्न भक्षण करून पुष्ट झालेले ब्राह्मण ह्मणजे ते निर्विष सर्पाचे परि
काहींच करायास शकत नाहींत.॥८॥

यस्मिन्रुष्टेभयंनास्तितुष्टेनैवधनागमः निग्रहा
नुग्रहोनास्तिसरुष्टःकिंकरिष्यति॥९॥

जो कोणेक मनुष्य कोपला असतां भय नाहीं आणि संतुष्ट झाला
असतां कोणताहि लाभ नाहीं ज्याला निग्रह किंवा अनुग्रह करण्या
विषयीं सामर्थ्य नाहीं तो कोपला असतां काय करील.॥९॥

निर्विषेणापिसर्पेणकर्तव्यामहतीफणा विषम
स्तुनचाप्यस्तुखटाटोपोभयंकरः॥१०॥

निर्विषसर्पानेंहि लोकांस भयप्रदर्शना करितांच विस्तीर्ण फणा
करावी विष असो किंवा नसो खटाटोप मात्र भयंकर दिसतो पु
रुषानें काहींच विद्या नसतां लोकामध्यें मोटी विद्वत्ता दाखवणें
हें मूर्खाचें लक्षण होय.॥१०॥

प्रातर्द्यूतप्रसंगेनमध्यान्हेस्त्रीप्रसंगतः रात्रौचो

रप्रसंगेनकालोगच्छतिधीमतां॥११॥

प्रातःकाळीं द्यूतप्रसंगेंकरून ह्मणजे भारत श्रवणेंकरून बुद्धिमंताचा काळक्षेप होतो, मध्यान्ह समयीं स्त्री प्रसंगेंकरून ह्मणजे श्रीरामायण श्रवणें करून मनिषिजनाचा काळ जातो, रात्रीचे ठायीं चोरप्रसंगें करून ह्मणजे श्रीमद्भागवत श्रवणें करून काळ जातो, तस्मात् बुद्धिमंताचा काळ क्षणमात्रहि व्यर्थ जात नाहीं.॥११॥

स्वहस्तग्रथितामालास्वहस्तघृष्टचंदनं स्वहस्त
लिखितंस्तोत्रंशक्रस्यापिश्रियंहरेत्॥१२॥

स्वहस्तानें गुंफिलेली माळा धारण केली असतां, आपले हस्तानें घर्षिलेला चंदन लेपन केलें असतां, आणि स्वहस्तें करून लिहिलेलें पुस्तक त्याचा पाठ केला असतां इंद्राचीहि संपत्ती जाईल मग अन्य सामान्य मनुष्याची जाईल तर आश्चर्य कोणतें.॥१२॥

इक्षुदंडास्तिलाःशूद्राःकांताकांचनमेदिनी चंदनं
दधितांबूलंमर्दनंगुणवर्धनं॥१३॥

ऊस, तीळ, शूद्र, स्त्री, सुवर्ण, पृथ्वी, चंदन, दधी आणि तांबूल यांचें जसजसें अधिकाधिक मर्दन करील तसतसे यांचे गुण विशेषविशेष वाढतील.॥१३॥

दरिद्रताधीरतयाविराजतेकुवस्त्रताशुभ्रतयावि
राजते कदन्नताचोष्णतयाविराजतेकुरूपताशी
लतयाविराजते॥१४॥

दरिद्रपणा धैर्येंकरून शोभला जातो, वस्त्र अल्पमोलाचें जरि असलें तथापि तें शुभ्रपणानें सुशोभित दिसतें, कदन्न जरी असलें तथापि तें जर उष्ण असेल तर तें शोभतें, स्वरूप कुत्सित असतांहि जर स्वभाव चांगला असेल तर त्याणें तें शोभलें जातें.॥१४॥

इतिवृद्धचाणाक्येनवमोध्यायः॥९॥
॥पूर्वार्द्धःसमाप्तः॥

## अथउत्तरार्धप्रारंभः

धनहीनोनहीनश्चधनिकःसस्कनिश्चयः विद्यार
त्नेनयोहीनःसहीनःसर्ववस्तुषु ॥१॥

द्रव्यें करून जो हीन तो हीन नव्हे जो धनवान तोच हीन होय, विद्या रूपरत्नें करून जो पुरुष हीन तो सर्व वस्तुमात्रीं हीन जाणावा. ॥१॥

दृष्टिपूतंन्यसेत्पादंवस्त्रपूतंपिबेज्जलं शास्त्रपूतं
वदेद्वाक्यंमनःपूतंसमाचरेत् ॥२॥

दृष्टीनें पवित्र स्थळ पाहून तेथें चरण ठेवावा, वस्त्रानें गाळलेलें उदक प्राशन करावें, शास्त्रानें जें पवित्र सांगीतलें तेंच वाक्य बोलावें, मनानें पवित्र अपवित्राचा विचार करून जें पवित्र असेल तेंच आचरावें. ॥२॥

सुखार्थीचित्यजेद्विद्यांविद्यार्थीचित्यजेत्सुखं सुखा
र्थिनःकुतोविद्याविद्यार्थिनःकुतःसुखम् ॥३॥

जो देहाला किमपीं श्रम होऊंनये अशी इच्छा करितो तो विद्येनें टाकितो, जो विद्येतें इच्छितो तो सुखातें त्यागितो, सुखाची इच्छा करणारास विद्या कोठून प्राप्त होईल आणि विद्या इच्छिणारास सुख कोठून प्राप्त असेल. ॥३॥

कवयःकिंनपश्यंतिकिंनकुर्वंतियोषितः मद्यपाः
किंनजल्पंतिकिंनभक्ष्यंतिवायसाः ॥४॥

कवि ज्ञानें करून काय पाहात नाहींत सर्व पाहातात, स्त्रिया काय न करितील असें आहे त्या साहसपणानें सर्व काहीं करितील, मद्यपान करणारे नबोलतील असें भाषण कोणतेंच नाहीं सर्व बोलतील, तसेंच काक भक्षण नकरतील असा पदार्थ कोणताच नाहीं ते अमंगळादिक भक्षितात. ॥४॥

रंकंकरोतिराजानंराजानंरंकमेवच धनिनंनि
धनंचैवनिर्धनंधनिनंतथा॥५॥

ईश्वर जर कृपा करील तर दरिद्यास राज्य देईल आणि तो जर को
पेल तर राजास दरिद्री करील तसाच क्षणांत धनवंतास निर्धन
करील आणि निर्धनास धनाढ्य करील सर्वकाही ईश्वरी सत्ताआहे-

लुब्धानांयाचकःशत्रुर्मुर्खाणांबोधकोरिपुः जार
स्त्रीणांपतिःशत्रुश्चोराणांचंद्रमारिपुः॥६॥

लोभीजनास याचक शत्रुसारिखा दिसतो, मुर्खास हितोपदेश क
रणारा शत्रुसारिखा दिसतो, व्यभिचारिणी स्त्रियांस भ्रतार शत्रुसा
रिखा भासतो आणि चोरास चंद्रमा शत्रुच दिसतो.॥६॥

येषांनविद्यानतपोनदानंनचापिशीलंनगुणोन
धर्मः तेमृत्यलोकेभुविभारभूतामनुष्यरूपेण
मृगाश्चरंति॥७॥

विद्या, तप, दान, उत्तमस्वभाव, गुण आणि धर्म या सहांतुन एकही
जास नाहीं ते मृत्यलोकीं भूमिचेठायीं केवळ भार रूप मनुष्यदेहा
नें मृगच फिरतात.॥७॥

अंतःसारविहीनानांउपदेशोनजायते मलया
चलसंसर्गात्नवेणुश्चंदनायते॥८॥

ज्याचा हृदयांत बुद्धिचा लेश हि नाहीं त्यांस उपदेश केलाअसतां हो
त नाहीं. मलयाचलाचा संसर्गे करून अंतःसार हीन वेणू चंदनाचेप
रि ह्मणजे चंदना सारिखे होतनाहींत.॥८॥

यस्यनास्तिस्वयंप्रज्ञाशास्त्रंतस्यकरोतिकिं लोच
नाभ्यांविहीनस्यदर्पणंकिंकरिष्यति॥९॥

ज्याला स्वतः बुद्धीच नाहीं त्याला शास्त्र काय करील, जो नेत्रहीन

त्याला उत्तम दर्पण जसें व्यर्थ काहींच आपला गुण करूं शकत नाहीं तसें बुद्धिहीनाला शास्त्र कोणताहि गुण उत्पन्न करण्याविषयास समर्थ होत नाहीं. ॥९॥

दुर्जनं सज्जनं कर्तुमुपायो नहि भूतले अपानं शतधा धौतं न श्रेष्ठमिंद्रियं भवेत् ॥१०॥

दुर्जनातें सज्जन करावयास उपाय या भूमिचे ठायीं एकही योग्य दिसत नाहीं. जें नीच अपानेंद्रिय तें शतवेळ प्रक्षाळिलें असतां श्रेष्ठ इंद्रियाची साम्यता पावावयाचें नाहीं. ॥१०॥

आप्तद्वेषाद्भवेन्मृत्युः परद्वेषाद्धनक्षयः राजद्वेषाद्भवेन्नाशो ब्रह्मद्वेषात्कुलक्षयः ॥११॥

स्वकीय जनाचा द्वेष केला असतां तेणें करून मृत्यु प्राप्त होतो, अन्य लोकांचा द्वेष केल्यानें धनाचा नाश होतो, राजाचा द्वेष केला असतां सर्व नाश होतो आणि ब्राह्मणाचा द्वेषें करून कुलाचा क्षय होतो. ११

वरं वने व्याघ्रगजेंद्रसेविते द्रुमालये पत्रफलांबुसेवनं तृणेषु शय्या शतजीर्णवल्कलं न बंधुमध्ये धनहीनजीवितं ॥१२॥

व्याघ्रादि भयंकर श्वापदाहीं सेवीत वृक्षाचें गृह अशा वनाचे ठायीं पत्रें फलें उदक यांचें सेवन तृणावर शयन आणि शतस्थळीं जीर्ण झालेलीं वल्कलें परिधान करून वास करणें हें श्रेष्ठ परंतु आपले बंधुवर्गामध्यें द्रव्यावांचून असणें हें अगदीं वाईट आहे. ॥१२॥

विप्रो वृक्षस्तस्य मूलं च संध्या वेदः शाखा धर्मकर्माणि पत्रे तस्मात् मूलं यत्नतो रक्षणीयं छिन्ने मूले नैव शाखा न पत्रे ॥१३॥

ब्राह्मण हाच कोणेक वृक्ष त्याचें मूळ संध्या, शाखा वेद, धर्म आणि

कर्में हीं त्याचीं पर्णे होत. यास्तव तें त्याचें मूळ यत्नें करून रक्षावें ह्मण जे यथाकाळीं संध्या करावी मुळाचा नाश झाला असतां शाखा आणि प त्रें उत्पन्न व्हावयाचीं नाहींत. ॥१३॥

माताचकमलादेवीपितादेवोजनार्दनः बांधवावि ष्णुभक्ताश्चस्वदेशोभुवनत्रयं ॥१४॥

लक्ष्मी ज्याची माता ह्मणजे मातृवत् जो सेवितो, आणि पिता ज्याचा भगवान् विष्णु ह्मणजे पित्या सारिखा त्यातें भजतो, भगवद्भक्त ज्याचे बांधव ह्मणजे बंधुसारिखे जो मानितो त्यास स्वदेशच त्रिभुवन हो य त्याला आपला देश सोडून तीर्थादिका विषयीं अन्यत्र कोठेंच जा वयाचें कारण नाहीं. ॥१४॥

एकवृक्षासमारूढानानावर्णाविहंगमाः प्रभातेदि क्षुदशस्रुकातत्रपरिवेदना ॥१५॥

एका वृक्षाचे ठायीं नाना रंगाचे अनेक पक्षी राहातात प्रातःकाळीं उठू न दश दिशाचे ठायीं जातात या प्रकारें एका संसारामध्यें अनेक जीव कर्मानुसार वास करितात तेच पुनः दैवें करून वियुक्त होऊन अनेक दिशांप्रत पावतात किंवा कित्येक मृत्यूहि पावतात त्या विषयीं दुःख का य करावें अल्पहि करूं नये. ॥१५॥

बुद्धिर्यस्यबलंतस्यनिर्बुद्धेश्चकुतोबलं वनेसिंहो मदोन्मत्तोजंबुकेननिपातितः ॥१६॥

ज्याला बुद्धि आहे तोच बलवान् ज्याला बुद्धि नाहीं त्यास बल कोठून प्राप्त होणार वनामध्यें सिंह मदोन्मत्त असतां बुद्धिबळें करून कोल्या नें मारिला. ॥१६॥

काचिंताममजीवनेयदिहरिर्विश्वंभरोगीयते नोचे दर्भकजीवनायजननीस्तन्यंकथंनिर्ममेत् इत्या

लोच्यमुकुंदमुकुंदयदुपतेलक्ष्मीपतेकेवलंत्वत्पादां
बुजसेवनेनसततंकालोमयानीयते ॥१७॥

जो हरि विश्वंभर या नामें करून जर सतत गाइजे तर मला जीवना विषयीं चिंता करणें कशास पाहिजे तो जर विश्वंभर नव्हे तर अर्भकाच्या जीवना कारणें मातेचा स्तनीं दुग्ध कसें निर्मिता, ज्यापेक्षां निर्मितो तेव्हां हरीच विश्वंभर असें जाणून हे कृष्णा लक्ष्मीपते वारं वार केवल तुझा पाद कमल सेवनें करून निरंतर काल हरण करितों.१७

गीर्वाणवाणिषुविशिष्टबुद्धिस्तथापिभाषांतरलो
लुपोहं यथासुराणांसुधयांचसत्यांस्वर्गांगना
नामधरासवेरुचिः ॥१८॥

संस्कृत वाणी हेच श्रेष्ठ अशी जरि बुद्धि आहे तरी भाषांतररसा विषयीं मी लोभी आहें, जसें देवांस अमृत प्राप्त असतां स्वर्गस्त्रियांचे अधरोष्ठ चुंबना विषयीं त्यांस अभिरुची प्राप्त होत्ये त्याच प्रकारें अन्यभाषा रसाविषयीं मलाहि उत्कंठा आहे. ॥१८

अन्नाद्दशगुणंपिष्टंपिष्टाद्दशगुणंपयः पयसोष्ट
गुणंमांसंमांसाद्दशगुणंघृतम् ॥१९॥

अन्नापेक्षां पिष्ट दशगुणें विशिष्ट, पिष्टाहून दशगुणें पय अधीक, पयाहून अष्टगुणित मांस विशेष, मांसाहून दशगुण घृत अधिक जाणावें. ॥१९॥

शाकेनरोगावर्धंतेपयसावर्धतेतनुः घृतेनव
र्धतेवीर्यंमांसान्मांसंप्रवर्धते ॥२०॥

शाक भक्षणानें रोग वृद्धि पावतात, दुग्धपानें करून शरीर पुष्ट होतें, घृताचे सेवनानें वीर्याची वृद्धि होत्ये, मांस सेवनानें मांस वाढतें, अशाप्रकारें पदार्था पदार्थांचे ठायीं गूण आहेत. ॥२० ॥

॥इतिवृद्धचाणाख्येदशमोध्यायः॥

दातृत्वंप्रियवक्तृत्वंधीरत्वमुचितज्ञता अभ्या
सेननलभ्यंतेचत्वारःसहजागुणाः ॥१॥

दानशक्ति, प्रियभाषण बोलणें, धैर्य, समयोचित जाणणें, हे चार गूण अभ्यास केल्यानें प्राप्त होतात असें नाहीं तर हे स्वाभाविक होत ॥१॥

आत्मवर्गपरित्यज्यपरवर्गंसमाश्रयेत् स्वयमे
वलयंयातियथाराजान्यधर्मतः॥२॥

आपुल्या समुदायातें त्यागून जो परकीय समुदायातें आश्रय करितो तो आपणाच नाशातें पावतो जसा परधर्माचरणें करून राजा नाशातें पावतो. ॥२॥

हस्तीस्थूलतनुःसचांकुशवशःकिंहस्तिमात्रांकु
शोदीपेप्रज्वलितेप्रनश्यतितमःकिंदीपमात्रंत
मः वज्रेणापिहताःपतंतिगिरयःकिंवज्रमात्रंनगा
स्तेजोयस्यविराजतेसबलवान्स्थूलेषुकःप्रत्ययः॥३

हस्ती स्थूल देह असून तोहि अंकुशाचे स्वाधीन असतो परंतु अंकुश काय हस्तिमात्र आहे, दीप प्रज्वलित केला असतां अंधकार नाशातें पावतो ह्मणून तम काय दीपाएवढाच आहे, वज्रानें पर्वत हत होत्सा ते पडतात ह्मणून पर्वत काय वज्रासारखेच अल्प आहेत, नाहीं तर ज्याचें विशिष्ट तेज तो बलवान् स्थूलत्वावर मोटेपणाचा अनुभव नाहीं.

कलौदशसहस्रेषुहरिस्त्यजतिमेदिनीं तदर्धं
जान्हवीतोयंतदर्धंग्रामदेवताः॥४॥

कलियुगाचे ठायीं दाहासहस्र वर्षे गेलीं असतां विष्णू पृथ्वीतें त्यागी

ल पांच सहस्त्र वर्षांनी जान्हवी भूमीतें सोडील, अडीच सहस्त्र वर्षांहीं ग्राम देवता पृथ्वीतें सांडून जातील, ॥४॥

**गृहासक्तस्यनोविद्यानोदयामांसहारिणः द्रव्यलुब्धस्यनोसत्यंस्त्रैणस्यनपवित्रतः॥५॥**

गृहाचेठायीं जो सक्त त्याला विद्या प्राप्त होतनाहीं, जो निरंतर मांसाहार करितो त्याला दया प्राप्त होत नाहीं, जोद्रव्यलोभी त्याला सत्य नाहीं, जो स्त्रैण ह्मणजे विषयी त्याला निर्मळपणा कधींच नाहीं.॥५॥

**दुर्जनःखलुसाधुतामुपैतिबहुप्रकारैःपरिसेव्यमानः आमूलसिक्तःपयसाघृतेननिंबवृक्षोमधुरत्वमेति॥६॥**

दुर्जन बहू प्रकाराहीं उपदेशिला असतां साधुत्वातें पावतो परंतु निंब वृक्ष मूळापासून अग्र पर्यंत निरंतर दुग्धानें किंवा घृतानें शिंपिला असतां काळत्रयींहि मधुरता पावत नाहीं.॥६॥

**अंतर्गतमलोदुष्टस्तीर्थस्नानशतैरपि नशुध्यति यथाभांडंसुरायादाहितंचसत्॥७॥**

ज्याचे हृदयांत पाप तो दुष्ट शतशः तीर्थस्नानाहीं शुद्ध होत नाहीं, जसें मद्याचें भांडें अग्नींत जाळिलें असतांहि शुधी पावत नाहीं तसा.॥७

**नवेत्तियोयस्यगुणप्रकर्षंसतंसदानिंदतिनात्रचित्रं यथाकिरातीकरिकुंभलब्धंमुक्ताफलंत्यज्यबिभर्तिगुंजां॥८॥**

जो ज्याचे गुणोत्कर्षातें जाणत नाहीं तो त्याला निरंतर निंदितो याविषयीं आश्चर्य मानूंनये, एतद्विषयीं दृष्टांत.जंगली वनांतील कोळ्याची स्त्री अज्ञानामुळें हत्तीच्या गंडस्थळ संबंधीं प्राप्त झालेलें मुक्ताफळ त्यागून गुंजेनें धारण करित्ये.॥८॥

यस्तु संवत्सरं पूर्णं नित्यं मौनेन भुंजति युगकोटि सहस्रं तु स्वर्गलोके महीयते ॥९॥

जो पुरुष समग्र एक वर्ष पर्यंत नित्य मौनें करून भोजन करितो तो सहस्त्र कोटि युगें पर्यंत स्वर्गलोकीं सत्कार पावतो देव त्याची पूजा करितात. ॥९॥

कामं क्रोधं तथा लोभं स्वादु शृंगार कौतुके अतिनिद्राति सेवा च विद्यार्थी ह्यष्ट वर्जयेत् ॥१०॥

काम, क्रोध, लोभ, स्वादु ह्मणजे गोड, शृंगार, कौतुक ह्मणजे चमत्कार, निद्रा, सेवा, या आठ विषयांचें अतिसेवन विद्यार्थ्यानें वर्ज करावें देह निर्वाह मात्र होई इतकें सेवावें. ॥१०॥

अकृष्ट फल मूलानि वनवास रतः सदा कुरुतेहरहः श्राद्धं ऋषि विप्रः स उच्यते ॥११॥

कर्षणा वांचून उत्पन्न झालेलीं फळें आणि मूळें भक्षून सार्वकाळ वनांतच राहातो आणि त्याहीनें नित्य श्राद्धादि करितो तो ब्राह्मण ऋषी ह्मणावा. ॥११॥

एकाहारेण संतुष्टः षट्कर्म निरतः सदा ऋतु कालाभिगामी च स विप्रो द्विज उच्यते ॥१२॥

एकवार भोजन करून निरंतर संतुष्ट, यजनादि षट्कर्मी रत, ऋतु कालींच स्त्रीसंग करणारा असा जो विप्र तो द्विज ह्मणावा. ॥१२॥

लौकिके कर्मणि रतः पशूनां परिपालकः वाणिज्य कृषि कर्माणि स विप्रो वैश्य उच्यते ॥१३॥

कर्माचे ठायीं लौकिक रक्षण करून जो रत आणि पशूंचें पालन करणारा तसाच वाणिज्य कृष्यादि कर्में करणारा असो जो तो वैश्य ब्राह्मण जाणावा. ॥१३॥

लाक्षादितैलनीलीनां कौसुंभमधुसर्पिषां वि
क्रीतामद्यमांसानां सविप्रः शूद्र उच्यते ॥१४॥

लाक्षादि पदार्थ तैल नीली पीतांबर मध घृत मद्य मांस याचा वि
क्रय करणारा जो तो शूद्र ब्राह्मण ह्मणावा. ॥१४॥

परकार्यविहंताच दांभिकः स्वार्थसाधकः छल
द्वेषीमृदुःक्रूरोविप्रोमार्जारउच्यते ॥१५॥

दुसऱ्याचें कार्य नाश करणारा, दांभीक, आपला अर्थ साधणारा, क
पटानें द्वेष करणारा, बाहेर मृदु, अंतरीं क्रूर, जो तो मार्जारब्राह्मण
समजावा. ॥१५॥

वापीकूपतडागानामारामस्फरवेश्मनां उच्छेद
नेनिराशंकःसविप्रोम्लेछउच्यते ॥१६॥

वापी, कूप, तडाग, बाग, देवालय, यांचा नाश करावयास जो शंका पा
वत नाहीं तो ब्राह्मण म्लेछ जाणावा. ॥१६॥

देवद्रव्यंगुरुद्रव्यंपरदाराभिमर्शनं निर्वाहःसर्व
भूतेषुविप्रश्चांडालउच्यते ॥१७॥

देवाचें द्रव्य, गुरूचें द्रव्य, हरणकरणारा आणि परस्त्रीचें मर्दन कर
णारा, सर्वभूतीं विधिनिषेध सोडून देहाचा निर्वाह करणारा ब्राह्म
ण जो तो चांडाळ जाणावा. ॥१७॥

देयंभोजधनंधनंस्कृतिभिर्नोसंचितव्यंकदा
श्रीकर्णस्यबलेश्चविक्रमपतेरद्यापिकीर्तिःस्थि
ता अस्माकंमधुदानभोगरहितंनष्टंचिरात्संचितं नि
र्वाणादपिपाणिपादयुगुलंघर्षंत्यहोमक्षिकाः ॥१८॥

हे जन हो पुण्यवंतांहीं तुच्छ द्रव्य दीनाला द्यावें कदापि संग्रह करून
ये जाहीं संग्रह केल्या वांचून दानच केलें असे जे कर्ण बली आणि

विक्रम यांची कीर्त्ती अद्यापि आहे दान भोग केल्यावांचून बहुकाळ संग्रह करून ठेवलेलें आमुचें मधु पहा नाश पावलें यास्तवच केवढें आश्चर्य पहा या आमुच्या मक्षिका अद्यापी हस्त पाद युगुलातें घर्षितात. ॥१८॥

॥ इतिवृद्धचाणाख्येएकादशोध्यायः॥११॥

सानंदसदनंसुताश्चसुधियःकांतामृदूभाषिणी
इच्छापूर्णधनंस्वयोषितिरतिःस्वाज्ञापराःसेवकाः॥
आतिथ्यंशिवपूजनंप्रतिदिनंमिष्टान्नपानेगृहेसाधोः
संगमुपासतेचसततंधन्योगृहस्थाश्रमः॥१॥

या लोकीं ज्याचें गृह सदां आनंदयुक्त, पुत्र ज्याचे बुद्धिमंत, स्त्री मधुर भाषण करणारी, इच्छेतें पूर्ण करणारें धन ज्याला अनुकूल, स्वस्त्रीचे ठायीं ज्याची प्रीती, सेवक जन ज्याचे आज्ञेंत, ज्याचे गृहीं प्रतिदिनीं अतिथीचें पूजन, शिवपूजन आणि मिष्टान्नपान निरंतर ज्याला प्राप्त असून साधुसंगातें जो सदैव सेवितो त्याचा गृहस्थाश्रम धन्य जाणावा. ॥१॥

आर्त्तेषुविप्रेषुदयान्वितश्चयःश्रद्धयास्वल्पमुपैत्तिदानं॥अनंतपारंसमुपेतिराजन्यद्दीयतेतन्नलभेद्द्विजेभ्यः॥२॥

ब्राह्मण दरिद्राने पीडित झाले असतां जो भक्तिने अल्प द्रव्य त्याला देतो तें दिलेलें द्रव्य अनंत दात्याप्रत पावतें तस्मात् हे राजा सत्पात्र ब्राह्मणाकारणें जितकें दिल्हें तितकेंच प्राप्त होत नाहीं तर अनंतपार प्राप्त होतें. ॥२॥

दाक्षिण्यंस्वजनेदयापरजनेशाठ्यंसदादुर्जने प्री-
तिःसाधुजनेस्मयःखलजनेविद्वज्जनेचार्जवम्॥
शौर्यंशत्रुजनेक्षमागुरुजनेनारीजनेधूर्तता इत्थंये
पुरुषाःकलासुकुशलास्तेष्वेवलोकस्थितिः॥३॥

स्वकीय जनाचेठायीं दक्षपणा, परजनीं दया, दुर्जनाचेठायीं शठपणा, साधुजनांचेठायीं प्रीति, खलजनाचे ठायीं गर्व, विद्वज्जनाचे ठायीं अवक्रता, शत्रूचेठायीं शौर्य, गुरूचेठायीं सहनता धरणें, स्त्रियांचेठायीं धूर्तपणा ठेवणें याप्रकारें करून जे पुरुष दक्षता ठेवतात ते यांजगांत उत्तम स्थितीप्रत पावतात.॥३॥

हस्तौदानविवर्जितौश्रुतिपुटौसारस्वतद्रोहिणौ ने-
त्रेसाधुविलोकनेनरहितेपादौनतीर्थंगतौ अन्याया-
र्जितवित्तपूर्णमुदरंगर्वेणतुंगःशिरो रेरेजंबुकमुं-
चमुंचसहसानीचस्यनिंद्यंवपुः॥४॥

रे रे जंबुका ज्या पुरुषाचा हस्ताहिं कधींच दान केलें नाहीं, ज्याचे कर्ण विद्येचे द्रोही ह्मणजे कधींहि विद्या ज्याहीं श्रवणच केली नाहीं, ज्याचे नेत्रांहि कधींच साधुदर्शन केलें नाहीं, ज्याचे पाय कधीहि तीर्थयात्रेस गेले नाहींत केवळ अन्यायानेंच संपादिलेल्या द्रव्यें करून ज्याचें उदर निरंतर भरित आणि गर्वेकरून ज्याचें मस्तक निरंतर उन्नत अशा नीच पुरुषाचें निंद्य शरीर लवकर सोडसोड भक्षूं नको भक्षिशील तर तुलाहि दोष प्राप्त होईल.॥४॥

येषांश्रीमद्यशोदासुतपदकमलेनास्तिभक्तिर्नरा-
णां येषामाभीरकन्याप्रियगुणकथनेनानुरक्तारस-
ज्ञा॥येषांश्रीकृष्णलीलाललितरसकथासादरंनैव
कर्णौधिक्तान्धिकतान्धिगेतांकथयतिसततंकी-

र्तनस्थोमृदंगः॥५॥

श्रीयशोदा पुत्राचे चरणकमळीं ज्या मनुष्याची भक्ति नाहीं गोपकन्येंस प्रिय जो श्रीकृष्ण त्याचे गुणवर्णनीं ज्यांची जिव्हा आसक्त नाहीं, श्रीकृष्णाचे लीलारसें करून मनोहर कथा श्रवणा विषयीं ज्यांचे कर्ण आदरयुक्त नाहींत. अशा या जनांतें धिक्धिक् असो ह्मणून निरंतर हरिकीर्तनस्थ मृदंग बोलतो. ॥५॥

पत्रंनैवयदाकरीरविटपेदोषोवसंतस्यकिं नोलूकोप्यवलोकतेयदिदिवासूर्यस्यकिंदूषणम्॥वर्षानैवपतंतिचातकमुखेमेघस्यकिंदूषणं यत्पूर्वविधिनाललाटलिखितंजन्मार्जितंकःक्षमः॥६॥

करीर वृक्षाचे ठायीं पत्रें नाहींत हा वसंताचा काय दोष, उलूक जर दिवसाला पाहात नाहीं तर सूर्याचें काय दूषण, चातकपक्ष्याचे मुखीं पर्जन्योदक प्राप्त होत नाहीं तर मेघाचें काय दूषण, नव्हे तर जें पूर्वी आपल्या ललाटीं ब्रह्मदेवानें लिहिलें तें अन्यथा करावयास कोण समर्थ आहे कोणीच नाहीं जें कर्म केलें तें अवश्य भोगणें आपणासच पडतें. ॥६॥

सत्संगाद्भवति हि साधुताखलानां साधूनांनहिखलसंगमात्खलत्वम्॥आमोदंकुसुमभवंमृदेव धत्ते मृद्गंधिंनहिकुसुमानिधारयंति॥७॥

खलजनांस साधूचा संगानें साधुत्व प्राप्त होतें, साधूंस खलांचे संगानें खलत्व प्राप्त होत नाहीं जसें पुष्प भूमीवर पडलें असतां त्याचा सुगंधातें मृत्तिकाच धारण करित्ये मृत्तिकेचा गंधातें पुष्पें धारण करीत नाहीत तसें साधू खलांचे संगानें आपले गुणाचा त्याग करीत नाहीं. ॥७॥

साधूनांदर्शनंपुण्यंतीर्थभूताहिसाधवः॥ कालेन

फलतेतीर्थंसद्यःसाधुसमागमः॥८॥

साधूचें दर्शनच पुण्यकारक होय कांकीं साधू तीर्थरूपच आहेत, तीर्थ पुण्यदायक खरें परंतु कालें करून फलदेतें आणि साधुसमागम तत्काल आपले समागमाचें उत्तम फलातें देतो. ॥८॥

विप्रास्मिन्नगरेमहान्कथयतांतालद्रुमाणांगणःको दातारजकोददातिवसनंप्रातर्गृहीत्वानिशि॥कोद क्षःपरदारवित्तहरणेसर्वोपिदक्षोजनःकस्माज्जीव सिहेसखेविषकृमिन्यायेनजीवाम्यहं॥९॥

कोणेक पांथस्त नगरांतील ब्राह्मणास प्रश्न करितो कीं हे ब्राह्मणा या नगरामध्यें थोर कोण आहे तो सांग त्यासमयीं विप्र सांगतो यानगरांत तालवृक्षांचा गण थोर आहे, तें श्रवण करून पुनः बोलतोकीं दाता कोण आहे तेव्हां ब्राह्मण बोलला प्रातःकाळीं वस्त्रें घेऊन सायंकाळीं देतो असा दाता रजक आहे, पुनः प्रश्न करतोकीं या नगरांत दक्ष कोण आहे त्याकाळीं ब्राह्मण सांगतो दुसऱ्याची स्त्री आणि द्रव्य यांचें हरण करण्या विषयीं सर्व जन दक्षच आहेत, असें त्याचें वाक्य श्रवण करून ब्राह्मणास विचारितो कीं तूं अशा पुरांत कसा वांचला आहेस तें सांग तेव्हां विप्र सांगतो जसा विषांतील किडा विषांतच जीवन पावतो त्याच न्यायें करून मी जीविका करीत असतो. ॥९॥

नविप्रपादोदककर्दमानिनवेदशास्त्रध्वनिग र्जितानि॥स्वाहास्वधाकारविवर्जितानिश्मशा नतुल्यानिगृहाणितानि॥१०॥

ब्राह्मणचरणोदकाचा कर्दम ज्याचे ठायीं नाहीं, वेदशास्त्र ध्वनी गर्जना ज्यांत नाहीं, पितृकर्में ह्मणजे श्राद्ध पक्ष तर्पणादि आणि यज्ञ नैवेद्य वैश्वदेवादि कर्में ज्यां घरामध्यें होत नाहींत ती घरें केवळ स्मशानरू

पच जाणावीं ॥१०॥

सत्यंमातापिताज्ञानंधर्मोभ्रातादयासखी॥शां
तिपत्नीक्षमापुत्रोषडेतेममबांधवाः॥११॥

संसारी जन आपल्या सारिखाच ज्ञानी असेल असें समजून ज्ञान्या स विचारितो तुझीं मातृ पित्रादिक प्रपंचांतील मनुष्यें कोणतीं तीं सांग तेव्हां ज्ञानी सांगतो सत्य ह्मणजे यथार्थ भाषणच माझी माता, ज्ञान ह्मणजे परमार्थ तोच माझा पिता, धर्महाच भ्राता, दया हीच बहीण, शांती पत्नी आणि क्षमा माझा पुत्र या प्रकारचा बांधव मेळ आहे.

अनित्यानिशरीराणिविभवोनैवशाश्वतः॥नित्यं
सन्निहितोमृत्युःकर्तव्योधर्मसंग्रहः॥१२॥

हे प्राण्या तूं या संसारीं येऊन अज्ञानानें आत्म्याचे अध्यासें करून ज्या शरिरातें अजरामर मानितोस तीं शरिरें आणि ऐश्वर्यादि सर्व संपत्ति हें चंचळ असें निश्चयें करून समज आणि मृत्यु निरंतर समीपच राहात असतो त्याचें भय मनांत बाळगून इहलोकीं कीर्तिकारक आणि परलोकीं सूख देणारा असा जो धर्म त्याचाच तूं संग्रह कर. ॥१२॥

आमंत्रणोत्सवाविप्रागावोनवतृणोत्सवः॥पत्यु
त्साहयुतानार्यअहंकृष्णरणोत्सवः॥१३॥

अर्जुन कृष्णाप्रत बोलतो हे कृष्णा ब्राह्मण आमंत्रणा विषयीं ह्मणजे परान्न भोजना विषयीं उत्साह पावतात गाई नवीन तृणा विषयीं आनंदयुक्त होतात स्त्रिया भर्त्याचे ठायीं आनंदयुक्त असतात त्याच प्रकारें करून हे कृष्णा मी युद्धा विषयीं उत्साहयुक्त आहें. ॥१३॥

मातृवत्परदारांश्चपरद्रव्याणिलोष्ठवत् आत्मव
त्सर्वभूतानियःपश्यतिसपश्यति॥१४॥

परस्त्रियांतें जो मातेसारख्या पाहातो, परद्रव्यातें मृत्तिके प्रमाणें अ

वलोकितो, सकळ प्राणिमात्रातें जो आत्मतुल्य पाहातो तोच पाहातो आणि जो अन्यथा दृष्टीनें पाहातो तो ज्ञानांध होय. ॥१४॥

धर्मेतत्परता मुखेमधुरता दानेसमुत्साहता मित्रे वंचनता गुरौविनयता चित्तेतिगंभीरता॥ आचारे शुचिता गुणेरसिकता शास्त्रेषुविज्ञानता रूपेसुंदरता शिवेभजनतात्वय्यस्तिभोराघव ॥१५॥

हे राघवा धर्माविषयीं आसक्ती, सुखाचे ठायीं मधुरता ह्मणजे प्रियभाषण, दानाविषयीं उत्सुकता, मित्राचे ठायीं अप्रतरणां, गुरूविषयीं नम्रता, चित्ताचे ठायीं गंभीरता ह्मणजे अक्षोभ्यता, आचाराविषयीं निर्मळपणा, गुणाचे ठायीं रसिकता ह्मणजे गुणाचा रस जाणणें, शास्त्राचे ठायीं विज्ञानता ह्मणजे शास्त्रोक्त अर्थाचा अनुभव येणे, रूपाविषयीं सुंदरत्व आणि शिवाचें भजन याप्रकारें करून हे गुण तुझ्या ठायीं सकल वास करितात जरहे सकळ गुण मानवामध्यें वास करतील तर तो तुझी साम्यता पावेल. ॥१५॥

काष्ठंकल्पतरुःसुमेरुरचलश्चिंतामणिःप्रस्तरः सूर्यःस्तीव्रकरःशशीक्षयकरःक्षारोहिवारांनिधिः॥ कामोनष्टतनुर्बलिर्दितिसुतो नित्यंपशुःकामगोनैतांस्तेतुलयामिभोरघुपतेकस्योपमादीयते ॥१६॥

कल्पवृक्ष इछित मनोरथ पूर्ण करणारा परंतु तो काष्ठरूप आहे, मेरू सुवर्णमय श्रेष्ठ खरा परंतु तो अचल ह्मणजे स्थीर होय, चिंतामणी सर्व रत्नांमध्ये श्रेष्ठ जरि तरी तो पाषाणरूप, सर्व प्रकाशक जरि सूर्य आहे तथापि त्याचें किरण बहूत तीव्र आहेत, चंद्र शांतिकर शीतल आहे परंतु त्याच्या कळा प्रतिमासीं क्षय पावतात, समुद्र अनंतपार खरा परंतु तो क्षार आहे, कामस्वरूपानें सुंदर खरा परंतु तो नष्टदेह, त्याला शरीर

नाहीं, बळी दाता थोर जरि आहे तथापि तो दैत्य होय पशु ह्मणजे नं
दी श्रेष्ठ बळवान् परंतु तो स्वेछाचारी आहे हे पूर्वोक्त सर्व एकेक दो
षानें युक्त यास्तव यांतें तुझा सहवर्तमान तुलित नाहीं तूं तुलना
रहित तेव्हां हे रघुपते तुला उपमा कोणाची द्यावी कोणीच योग्यते
स पोंचत नाहीं. ॥१६॥

विद्यामित्रंप्रवासेचभार्यामित्रंगृहेषुच व्याधिस्थ
स्यौषधंमित्रंधर्मोमित्रंमृतस्यच ॥१७॥

प्रवासीं विद्या मित्र ती मित्रापरि आपलें हीत करते, गृहामध्यें
स्त्री मित्र होय, जो व्याधिस्थ त्याला औषध मित्र जाणावें, जो मृ
त्यू पावला त्याला परलोकीं हित करणार मित्र धर्मच होय.॥१७

विनयंराजपुत्रेभ्यःपंडितेभ्यःसुभाषितं अनृ
तंद्यूतकारेभ्यःस्त्रीभ्यःशिक्षेतकैतवं ॥१८॥

नम्रता कोणाप्रत कशी धरावी ती राजपुत्रा पासून शिकावी कां
कीं त्याला बालपणा पासून अभ्यास ठेवलेला असतो, सुभाषित
भाषण पंडितापासूनच शिकावें, जे द्यूत करणारे त्यां पासून अनृ
त भाषण कसें बोलावें तें शिकावें, कपट कसें करावें तें कुलटा स्त्रि
यां पासून शिकावें. ॥१८॥

अनालोक्यव्ययंकर्ताअनाथकलहप्रियः आतु
रःसर्वक्षेत्रेषुनरःशीघ्रंविनश्यति ॥१९॥

आपुल्या आदायातें न पाहातां प्राप्ती पेक्षां अधिक व्यय करणा
रा आणि अनाथा सह वर्तमान कलह करावयास जो उत्सुक स
र्वज्ञातीच्या स्त्रियांचे ठायीं जो सदैव भोगाविषयीं आतुर तो मा
नव लवकरच नाश पावतो. ॥१९॥

नाहारंचिंतयेत्प्राज्ञोधर्ममेकंहिचिंतयेत् आहा

रोहिमनुष्याणांजन्मनासहजायते ॥२०॥

बुद्धिमंतानें आपणास भोजन कसें प्राप्त होईल याची चिंता न करावी मला ईश्वरानें कृपाकरून मनुष्यदेही उत्पन्न केला यास्तव त्या ईश्वरातें संतुष्ट करणारा जो धर्म याचें संपादन मला कसें घडेल याचें चिंतन निरंतर करावें मनुष्याचा जो आहार तो त्याचा जन्मासह वर्तमानच उत्पन्न होतो यास्तव त्याची चिंता वाहाणें हें केवळ अज्ञानच होय. ॥२०॥

धनधान्यप्रयोगेषुविद्यासंग्रहणेतथा आहारे व्यवहारेचत्यक्तलज्जःसुखीभवेत् ॥२१॥

धन आणि धान्य संपादन करण्याचा उपाया विषयीं, तसाच विद्यासंग्रहा विषयीं, भोजन करण्या विषयीं, तसाच व्यवहारीं जो लज्जा सोडील तो सुखी होईल. ॥२१॥

जलबिंदुनिपातेनक्रमशःपूर्यतेघटः सहेतुःसर्वविद्यानांधर्मस्यचधनस्यच ॥२२॥

एक एक बिंदुपातें करून अनुक्रमानें घट पूर्ण होतो, सकल विद्या आणि धर्म तसेंच धनही पूर्ण होण्यास तोच हेतु, जसा उदकाचा बिंदुबिंदुनें घट भरतो याप्रकारें क्षणोक्षणीं विद्याभ्यास केल्याने ती पूर्ण होत्ये अल्प अल्प धर्म आचरिला असतां तोहि वृद्धि पावतो तसेंच धन थोडें थोडें संपादिलें असतां पुष्कळ संग्रह होतें कोणतेंही काहीं एकेच काळीं वृद्धिंगत होत नाहीं. ॥२२॥

वयसःपरिणामेपियःखलःखलएवसः सुपक्कमपिमाधुर्यंनोपयातींद्रवारुणं ॥२३॥

वयाचा परिणाम झाला असतां ह्मणजे अंतकाळ प्राप्त झाला असतां हि जो खल तो खलच असतो त्याचें खलत्व जात नाहीं येवि

षयीं दृष्टांत जरी कालेंकरून कवंडळ उत्तम पक्क झालें तथापि मा
धुर्यातें पावत नाहीं जो ज्याचा स्वभाव तो बहु कालेंकरून ही अ
न्यथा होत नाहीं. ॥ २३ ॥

॥ इतिवृद्धचाणाख्येद्वादशोध्यायः॥१२

मुहूर्तमपिजीवेतनरःशुक्लेनकर्मणा नकल्पम
पिकष्टेनलोकद्वयविरोधिना ॥१॥

मनुष्य शुद्धकर्मे करून मुहूर्तमात्र जरि वांचला तरि त्याचें तितकें
तेंच जीवन श्रेष्ठ होय लोकद्वयाचा नाश करणारें जें नीच कर्म त्याणें
कल्पपर्यंत जरी जीवन पावला तरी तें त्याचें जीवन व्यर्थ जाणावें. ॥१

गतेशोकोनकर्तव्योभविष्यंनैवचिंतयेत् वर्तमा
नेनकालेनप्रवर्ततेविचक्षणाः ॥२॥

कोणतीहि वस्तू नाश पावली असतां तीचा शोक न करावा पुढें प्रा
प्त होणार त्या वस्तूचें चिंतनही नकरावें ज्ञातेपुरुष ज्या काळीं जें प्राप्त
होतें त्याणेच करून संतोषानें राहाताहेत. ॥२॥

स्वभावेनहितुष्यंतिदेवाःसत्पुरुषाःपिता ज्ञातयः
स्नानपानाभ्यांवाक्यदानेनपंडिताः ॥३॥

देव, साधू, पिता, हे तिघे पुरुषाच्या स्वभावें करून संतोष पावता
त, आपुले ज्ञातीचे जन स्नानपानादिकें करून तुष्ट होतात, पंडित
जन सद्वाक्यें करून तुष्ट होतात. ॥३॥

आयुःकर्मचवित्तंचविद्यानिधनमेवच पंचैतानि
चसृज्यंतेगर्भस्थस्यैवदेहिनः ॥४॥

जीव मातेच्या गर्भी असतांच त्याचें आयुष्य कितीक तें आणि तो

कर्मकोणतें करील त्याला द्रव्य किती प्राप्त होईल तें आणि त्याची विद्या तसेंच मरण हीं ब्रह्मदेव त्याचा ललाटीं लेखन करून ठेवितो तदनुसार त्याला प्राप्त हे पांच विषय होतात. ॥४॥

अहोबतविचित्राणिचरितानिमहात्मनां लक्ष्मींतृणा
यमन्यंतेतद्भारेणनमंतिच॥५॥

अहो काय आश्चर्य सांगावें यहा साधूंचीं चरित्रें विचित्र आहेत कशीं ह्मणाल तर ज्या लक्ष्मीतें ब्रह्मादिक इच्छितात तीतें साधू तृणापरि मानितात प्राप्त झाली असतां तीचा भारानें नम्र होतात. ॥५॥

यस्यस्नेहोभयंतस्यस्नेहोदुःखस्यभाजनं स्नेहमू
लानिदुःखानितानित्यक्त्वावसेत्सुखं॥६॥

कुटुंबाचे मनुष्यांवर जो स्नेह ठेवितो त्या पासून तो भय आणि दुःख पावतो सर्वदुःखांस मूळ स्नेहच जाणावा तीं दुःखें ज्याणीं सोडिलीं ते सुखानें राहातात. ॥६॥

अनागतविधाताचप्रत्युत्पन्नमतिस्तथा द्वावेते
सुखमेधेतेयद्भविष्यो विनश्यति॥७॥

जो दुःखादिक प्राप्त नझालें त्याचे पूर्वीच भय होईल असें समजून त्याचा प्रतिकार करतो तो, आणि भय उत्पन्न होतांच तत्काळ त्याचा नाश्या विषयीं जो आपले बुद्धिबळें करून उद्योग करितो तो, हे दोघे सुखानें राहातात आणि जो आपले प्रारब्धावरच भरवसा ठेउन उद्योग काहींच करित नाहीं तो नाशाप्रत पावतो. ॥७॥

राज्ञिधर्मिणिधर्मिष्ठापापेपापाःसमेसमाः राजा
नमनुवर्त्तंतेयथाराजातथाप्रजाः॥८॥

राजा धर्म युक्त असतां प्रजाहि धर्माचरण करितात, पापी असल्यास प्रजाहि पापी होतात राजा सम ह्मणजे धर्माधर्म पक्षपात शून्य अ

सतां प्रजाहि तशाच होतात तस्मात् जसा राजा होईल त्याच प्रकारें प्रजा होतात. ॥ ८ ॥

जीवंतंमृतवन्मन्येदेहिनंधर्मवर्जितं मृतोधर्मेण संयुक्तोदीर्घजीवीनसंशयः॥९॥

कोण एक ज्ञाता ह्मणतो कीं प्राणी धर्म रहित जो कधींहि धर्म करीत नाहीं तो जीवंत असतां त्यातें मृतापरि मानितों आणि जो सदैव धर्म युक्त तो मृत्यु पावला असतांहि चिरायु होय या विषयीं संशय नाहीं असे मी मानितों याचें कारण त्याची धर्मकीर्ती जावत्काल पर्यंत असत्ये तावत्काल तो जीवंतच होय. ॥९॥

धर्मार्थकाममोक्षाणांयस्यकोपिनविद्यते अजागलस्तनस्येवतस्यजन्मनिरर्थकम् ॥१०॥

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांतून कोणताहि ज्याला घडला नाही तो जन्मास येऊन काय कामाचा त्याचें जीवित्व शेळीचे कंठस्तना सारिखें निरर्थक होय. ॥१०॥

दह्यमानाःस्रुतीव्रेणनीचाःपरयशोग्निना अशक्तास्तत्पदंगंतुंततोनिंदांप्रकुर्वते ॥११॥

नीच लोक दुसऱ्याचा दुःसह यशरूप अग्नि करून निरंतर संतापयुक्त होतात ते त्याचा योग्यपद प्रत जाउं इच्छितात परंतु पावावया कारणें असमर्थ असतां निंदामात्र करतात. ॥११॥

बंधायविषयासंगंमुक्तौनिर्विषयंमनः मनएव मनुष्याणांकारणंबंधमोक्षयोः ॥१२॥

विषया सक्त जें मन तेंच संसार बंधनास कारण होय आणि तेंच मन निर्विषय झालें असतां मुक्ति देतें तस्मात् मनुष्यास बंध मोक्ष प्राप्ती विषयीं कारण मनच जाणावें. ॥१२॥

देहाभिमानेगलितेज्ञानेनपरमात्मनि यत्रयत्र
मनोयातितत्रतत्रसमाधयः॥१३॥

ज्ञानें करून आत्मस्वरूपीं देहाभिमान लयाप्रत पावला असतां जीवाचें मन जेथें जेथें जातें तेथें तेथें त्याला समाधीच आहेत. १३

इप्सितंमनसःसर्वंकस्यसंपद्यतेसुखं दैवायत्तंय
तःसर्वंतस्मात्संतोषमाश्रयेत्॥१४॥

मनास जें प्रियसुख तें सर्वत्र सर्वांसच प्राप्त होत नाहीं कांकीं सर्व सुख प्राप्त होणें हें दैवाधीन आहे ज्याचा दैवीं असेल त्यालाच तें प्राप्त होईल इतरांस नाहीं तस्मात् संतोषातेंच धारण करावा ह्मणजे निरंतर सुख आहे.॥१४॥

यथाधेनुसहस्त्रेषुवत्सोगच्छतिमातरं यथायच्च
कृतंकर्मकर्त्तारमनुगच्छति॥१५॥

जसा सहस्त्रशः धेनु एकत्र असतां त्यांतून वत्स आपल्याच मातेप्रति जातो तसें ज्याणें जें कर्म केलें तें प्राप्त त्यासच होतें. ॥१५॥

अनवस्थितकर्मस्यनजनेनवनेसुखं जनोदह
तिसंसर्गात्वनंसंगविवर्जनात्॥१६॥

ज्याचें कर्म अनवस्थित ह्मणजे जसें असावयाचें तसें नाहीं त्याला लोकांमध्यें किंवा वनांतही सुख नाहीं कारण कीं जन संसर्ग करून ह्मणजे संबंधें करून दग्ध करितो आणि वन जनसंबंध राहित्यें करून जाळितें तस्मात् अनवस्थिताला कोठेंच सुखाचा लेश नाहीं. १६

यथाखाताखनित्रेणभूतलेवारिविंदति तथागु
रुगतांविद्यांशुश्रूषुरधिगच्छति॥१७॥

खनन करणारा पुरुष खननें करून जसा भूमितलगत उदकातें पावतो तसा सेवा करणारा शिष्य सेवनें करून गुरुगत विद्येतें पावतो.१७

कर्मायत्तंफलंपुंसांबुद्धिःकर्मानुसारिणि तथापि
सुधियोचार्याःसुविचार्यैवकुर्वंति ॥१८॥

पुरुषास जें फल प्राप्त होणार तें कर्माधीन कर्मानुरूपच होतें आणि बुद्धीहि प्राक्कर्मे करून पुढेंहि तदनुरूप कर्माप्रतच अनुसरल्ये पूर्व कर्म विरुद्ध बुद्धि कधींच होत नाहीं या करितां जे बुद्धिमंत श्रेष्ठ पुरुष ते जें कर्म करणें तें उत्तम विचारें करूनच करीत असतात.॥१८॥

संतोषस्त्रिषुकर्तव्योदारेषुभोजनेधने॥ त्रिषुचैव
नकर्तव्योध्ययनेतपदानयोः ॥१९॥

विद्वत्पुरुषानें स्त्री,भोजन आणि धन या तीन विषयांचे ठायीं सार्व काल संतोष करावा परंतु अध्ययन,तप आणि दान या तिहीं विषयीं ज्ञात्यानें संतोष म्हणजे पुरे अशी बुद्धि कधींहि नकरावी.॥१९॥

एकाक्षरप्रदातारंयोगुरुंनाभिवंदति श्वानयोनि
शतंभुक्त्वाचांडालेष्वभिजायते ॥२०॥

एका अक्षरातेंहि उपदेश करणारा जो गुरु त्यातें हा अल्पोपदेष्टा गुरू नव्हे असें मानून जो नमस्कार करीत नाहीं तो शतशः श्वानयोनीतें भोगून नंतर चांडाल योनी मध्यें उत्पन्न होतो.॥२०॥

युगांतेचलतेमेरुःकल्पांतेसप्तसागराः साधवः
प्रतिपन्नार्थान्नचलंतिकदाचन ॥१९॥

मेरु पर्वत अचल खरा परंतु तोहि युगाचे अंतीं चळतो.तसेच स मुद्रहि कल्पांतीं चलन पावतात परंतु साधू स्वीकृत अर्था पासून कालत्रयींहि चलन पावत नाहींत. ॥१९॥

॥ इतिवृद्धचाणाक्यत्रयोदशोध्यायः॥१३॥

पृथिव्यांत्रीणिरत्नानिआपअन्नंसुभाषितं मूढैः
पाषाणखंडेषुरत्नसंख्याविधीयते ॥१॥
पृथ्वीचे ठायीं अन्न, उदक आणि सुभाषित अशीं तीन रत्नें आहेत तीं
सोडून मूर्ख लोक पाषाण शकलाचे ठायीं हींच रत्नें अशी गणनाकरितात.

आत्मापराधवृक्षस्यफलान्येतानिदेहिनां दारिद्र्य
रोगदुःखानिबंधनंव्यसनानिच ॥२॥
आपला अपराध हाच कोणेक वृक्ष याचीं फळें दारिद्र्य रोग दुःखें बं
धन आणि संकटें हीं याच देहीं मनुष्यास प्राप्त होतात आणि त्याचें
अवशिष्ट फल भोगण्या करितां देहांतर ही घेणें लागतें. ॥२॥

पुनर्वित्तंपुनर्मित्रंपुनर्भार्यापुनर्मही एतत्सर्वंपु
नर्लभ्यंनशरीरंपुनःपुनः ॥३॥
द्रव्य, मित्र, आणि स्त्री तशीच मही ह्मणजे राज्य हीं सर्व नाशाप्रत पा
वलीं असतां पुरुषास सर्व पुनः पुनः प्राप्त होतात परंतु सर्व पुरुषार्था
चे साधनाचें जें कारण शरीर तें नाश पावलें असतां पुनः प्राप्त होईल
हा निश्चय नाहीं याकरितां फार प्रयत्नानें त्याचें रक्षण करावें. ॥३॥

बहूनांचैवसत्वानांसमवायोरिपुंजयः वर्षधारा
धरोमेघस्तृणैरपिनिवार्यते ॥४॥
बहूत जनाचा ऐक्यपणा झाला असतां तो शत्रूतें जिंकण्या विषयीं
समर्थ होतो जसा निरंतर पर्जन्यधारांतें धारण करणारा जो मेघ
तो तृणाहीं करून निवारण केला जातो. ॥४॥

जलेतैलंखलेगुह्यंपात्रेदानमनागपि प्राज्ञेशा
स्त्रंस्वयंयातिविस्तारंवस्तुशक्तितः ॥५॥
उदकाचे ठायीं तेल खल पुरुषाचे ठायीं गुह्य भाषण सत्पात्रीं अ
ल्पहि दान बुद्धिमंताचे ठायीं शास्त्र हीं सर्व पूर्वोक्त स्थळीं अर्पिलीं

असतां आधारभूत वस्तूचा स्वभावें करून आपणच विस्तारास पा वतात. ॥५॥

धर्माख्याने श्मशाने च रोगिणां या मतिर्भवेत् सा
सर्वदैव तिष्ठेच्चेत्को न मुच्येत बंधनात् ॥६॥

अन्य जनास धर्म तत्वोपदेश समयीं आणि श्मशानीं तसेंच रोग्यांस त्या समयीं जी सद्बुद्धि प्राप्त होत्ये ती सार्वकाळ तशीच जर राहील तर बंधनांतून कोण मुक्त न होतील. ॥६॥

उत्पन्न पश्चात्तापस्य बुद्धिर्भवति यादृशी तादृशी
यदि पूर्वं स्यात् कस्य न स्यान्महोदयः ॥७॥

कोणतेंहि अनुचित कर्म करणाऱ्या पुरुषास त्या अयोग्य कर्में करून प श्चात्ताप झाल्या नंतर जशी बुद्धि निर्मळ होत्ये तशी जर मती पूर्वींच होईल तर कोणाचें कल्याण होणार नाहीं होईलच. ॥७॥

दाने तपसि शौर्ये वा विज्ञाने विनये नये विस्मयो
नहि कर्तव्यो बहुरत्ना वसुंधरा ॥८॥

कोणीं लोकोत्तर दान केलें असतां त्याचा दानाविषयीं किंवा कोणीं म हत्तप केलें असतां त्या तपाविषयीं अथवा कोणाच्या मोठ्या पराक्रमा विषयीं किंवा कोणाच्याही मोठ्या ज्ञानाविषयीं तसाच कोणी बहूत न म्र पाहिल्यास त्याचा नम्रते विषयीं आणि कोणी उत्तम नीतिमान् पा हिला तर त्याचा नीति विषयीं कोणीहि आश्चर्य करूं नये कांकीं पृथ्वी अमोल्य रत्ना सारिख्या वस्तूं हीं युक्त आहे तेव्हां आश्चर्य करावयाचें कारण नाहीं. ॥८॥

दूरस्थोपि न दूरस्थो यो यस्य मनसि स्थितः यो यस्य
हृदये नास्ति समीपस्थोऽपि दूरतः ॥९॥

जो स्नेहें करून ज्याचें मनामध्यें निरंतर चिंतन करितो तो पुरुष चिंत

न करणाऱ्या पासून दूर असतांहि समीपच आहे असें समजावें आणि जो ज्याचें कधींहि स्नेहाने मनांत स्मरण हि करित नाहीं तो त्याचा जवळ असून तो दूरच आहे असें जाणावें. ॥९॥

यस्माच्च प्रियमिच्छेत तस्य ब्रूयात्सदा प्रियं व्याधो
मृगवधो गंतुं गीतं गायति सुस्वरं ॥१०॥

जो ज्या पासून आपलें प्रिय होण्याची इच्छा करितो त्याणें त्यास निरंतर प्रिय वाक्य बोलून मोहित करावा आणि आपलें प्रिय करावें दृष्टांत आपलें प्रिय इच्छिणारा व्याध ह्मणजे पारधी मृगातें वधावया कारणें पूर्वी त्याला प्रिय मोहक सुस्वर गायन करितो आणि आपले जें प्रिय तें संपादन करितो तसें. ॥१०॥

अत्यासन्ना विनाशाय दूरस्थान फलप्रदाः सेव्यंतां
मध्यभागेन राजा वन्हिर्गुरुः स्त्रियः ॥११॥

राजा अग्नी गुरु स्त्रिया यांची सेवा अति सांनिध्यानें केली असतां हे राजादिक नाश करितात आणि यां पासून अति दूर राहिलें तर हे फलप्रद होत नाहींत यास्तव यांची सेवा करणें ती मध्यवर्त्तित्वें करून ह्मणजे अदूरासान्निध्यें करून करावी ह्मणजे नाशन करितां फल देतात. ॥११॥

अग्निरापः स्त्रियो मूर्खः सर्पो राजकुलानिच नित्यं
यत्नेन सेव्यानि सद्यः प्राणहराणि षट् ॥१२॥

अग्नि उदक स्त्रिया मूर्ख सर्प राजे या साहांचें सेवन यत्नानें निरंतर करावें प्रमादानें सेविलें असतां तत्काळ प्राणहारक होतात यास्तव यां जवळ कधींहि प्रमादपणें राहूं नये. ॥१२॥

स जीवति गुणा यस्य यस्य धर्मः स जीवति गुणध
र्मविहीनस्य जीवितं निष्प्रयोजनं ॥१३॥

जो सकळ गुण संपन्न तो अल्पायु जरि झाला तरि तो चिरायुष्य सम

जावा कांकीं त्याचा गुणाची कीर्ति बहुकाळ लोकांत राहात्ये तेव्हां तो कीर्तिरूपें जीवंतच आहे असा जाणावा आणि जो निरंतर धर्म करणारा तो मृत्यु पावला असतांहि तो धर्म कीर्तिरूपें जीवंतच होय आणि जो गुणांहीं करून तसाच धर्मेंकरून हीन ह्मणजे ज्याला एकहि उत्तम गुण नाहीं आणि कोणता हि सद्धर्म नाहीं त्याचें जीवित व्यर्थ तो असून काहींच उपयोग नाहीं तो जीवंत असतांच मृतप्राय जाणावा. ॥१३॥

यदीछसिवशीकर्तुंजगदेकेनकर्मणा पुरापंचदशास्येभ्योगांचरंतींनिवारय॥१४॥

हे पुरुषा तूं जर एकाच कर्मेंकरून सकळ जगातें वश करूं इच्छितोस तर पूर्वीं दशेंद्रियें आणि शब्दादि पंचविषय यांचा मुखापासून त्यांचापुढें जाणारें जें गो ह्मणजे मन यातें प्रथम निवारण कर ह्मणजे तुला सर्व जग वश होईल. ॥१४॥

प्रस्तावसदृशंवाक्यंस्वभावसदृशंप्रियं आत्मशक्तिसमंकोपंयोजानातिसपंडितः॥१५॥

ज्या काळीं जी कथा सभेंत निघेल त्या कथेला उचित भाषण करावयास जो जाणतो आणि ब्राह्मणादि स्वभावांस जें ज्यास प्रिय तें त्यास करावयास जाणतो तसाच आत्म शक्त्यनुरूप समयानुसार क्रोध करावयास जाणतो तोच ज्ञाता ह्मणावा. ॥१५॥

एकएवपदार्थस्तुत्रिधाभवतिवीक्षितः कुणपंकामिनीमांसंयोगिभिःकामिभिश्वभिः॥१६॥

देहरूप एकच पदार्थ तिघांहीं स्वमति स्वभावानुरूप तिहीं प्रकारें भिन्न पाहिजेला जातो तो कसा तें सांगतो एक योग्यांहीं दुर्गंध्यादि साहृश्यास्तव शवरूप पाहिंजे तोच विषयि जनांहीं कामिनीरूपें अति सुंदरत्वें देखिजेतो तोच पदार्थ श्वानांहीं मांसपिंड रूपें अवलोकिजेतो तस्मा

त एक वस्तू अनेक भेद रूपें अनुभवास येण्या विषयीं पाहाणाऱ्या चीं बुद्धीच कारण होय.॥१६॥

स्र सिद्धमौषधंधर्मंगृहछिद्रंचमैथुनं कुभुक्तंकु श्रुतंचैवमतिमान्नप्रकाशयेत्॥१७॥

आपणास सिद्ध झालेलें औषध व धर्म आपल्या गृहांतिल कोणता हि कमीपणा आणि मैथुन आपण जर कदन्न भक्षिलें असेल तर तें तसेंच जें केवळ निंद्य श्रवण केलें असेल तें बुद्धिमंतानें जनांत प्रसिद्ध करूंनये. ॥१७॥

तावन्मौनेननीयंतेकोकिलैश्चैववासराः यावत्सर्व जनानंददायिनीवाक्प्रवर्त्तते॥१८॥

जावत्कालपर्यंत सर्व जनातें आनंद करणारी वाणी प्राप्त होई ताव त्कालपर्यंत कोकील पक्षी मौनें करूनच दिवस घालवितात या प्रका रें कोणेक कार्याचा विचार केला असतां तें कार्य जावत्काल सिद्ध हो ई तावत्काल लोकांत कथन करूंनये सिद्ध व्हावयाचा पूर्वी प्रसिद्ध केलें असतां जर तें कार्य सिद्ध न झालें तर तो पुरूष जनांत उपहा सास्पद होतो. ॥१८॥

धर्मंधनंचधान्यंचगुरोर्वचनमौषधं स्रगृही तंचकर्तव्यमन्यथायेनजीवति॥१९॥

धर्म, धन, धान्य, गुरुवचन आणि औषध या पांच वस्तूंचें गृहण करणें तें उत्तम प्रकारें जसें होईल तसें करावें जो अन्यथा ह्मणजे उत्तम प्रकारें गृहण करणार नाहीं तो कल्याण पावणार नाहीं.॥१९

त्यजदुर्जनसंसर्गंभजसाधुसमागमं कुरुपुण्य महोरात्रंस्मरनित्यमनित्यतः॥२०॥

कोणेक सत्पुरुष विषयासक्त जनातें पाहून दयेनें व्यापला होत्सा

ता त्यातें उपदेश करतो कीं हे पुरुषा तूं दुर्जन संसर्गातें सोड आणि साधु समागमातें भज तसेंच अहोरात्र पुण्यातेंच आचरीं आणि नाशवंत देहें करून नित्य आत्मरूप वस्तूतें स्मर ह्मणजे तापत्रया पासून मुक्त होशील. ॥ २० ॥

॥ इतिवृद्धचाणाख्येचतुर्दशोध्यायः ॥ १४ ॥

---

यस्यचित्तंद्रवीभूतंकृपयासर्वजंतुषु तस्यज्ञाने
नमोक्षेणकिंजटाभस्मलेपने ॥ १ ॥

ज्याचें चित्त कृपें करून सर्व प्राणिमात्राचे ठायीं द्रवयुक्त आहे त्याला ज्ञानें करून किंवा मोक्षें करून अथवा जटा धारणें करून तसेंच भस्म लेपनें करून काय होणार आत्मवस्तू प्राप्ती विषयीं सर्वभूतमात्रीं दया असणें हेंच थोर साधन आहे. ॥ १ ॥

एकमेवाक्षरंयस्तुगुरुःशिष्यंप्रबोधयेत् पृथि
व्यांनास्तितद्द्रव्यंयद्दत्वाचानृणीभवेत् ॥ २ ॥

जो गुरू शिष्यातें एकच अक्षर उपदेशितो त्या गुरूला दक्षिणा देऊन त्याचा ऋणांतून शिष्य मुक्त होईल असें योग्य द्रव्य पृथ्वीचे ठायीं कोणतेंच दिसत नाहीं. ॥ २ ॥

खलानांकंटकानांचद्विविधैवप्रतिक्रिया उपान
मुखभंगोवादूरतोवाविसर्जनं ॥ ३ ॥

खलजन आणि कंटक यांची प्रतिक्रिया ह्मणजे नाश करण्याचीयुक्ती दोन प्रकारचीच आहे उपानह धारण करणें किंवा त्याच्या मुखाचा भंग करणें अथवा त्याचा दूर त्याग करणें या शिवाय चवथी युक्ति नाहीं. ॥ ३ ॥

कुचैलिनंदंतमलोपधारिणंबह्वाशिनंनिष्ठुरभा
षिणंच सूर्योदयेचास्तमितेशयानंविमुंचतिश्री
र्यदिचक्रपाणिनं ॥ ४॥

कुत्सित ह्मणजे मलीन वस्त्र धारण करणारा तसाच दंतांवर मल धार
ण करणारा आणि बहूत भोजन करणारा तसाच निष्ठूर भाषण करणारा
आणि सूर्याचा उदयास्त समयीं जो निद्रा करितो तो जरी चक्रपाणी ह्म
णजे विष्णु असला तथापि त्यातें लक्ष्मी सोडित्ये. ॥ ४॥

त्यजंति मित्राणिधनैर्विहीनंदाराश्चभृत्याश्चसुहृ
ज्जनाश्च तेचार्थवंतंपुनराश्रयंतेह्यर्थोहिलोकेपु
रुषस्यबंधुः ॥५॥

जो द्रव्यहीन झाला त्यास मित्रें आणि स्त्रिया सेवक तसेच सुहृज्जन हे
टाकितात तो पुनः धनवान् झाला असतां त्यास ज्याणीं पूर्वी सोडिला
तेच आश्रय करितात तस्मात् या लोकीं अर्थच बंधू होय आणि ज्याज
वळ द्रव्य नाहीं तो जरी बंधू असला तथापि परकीच स्वजनांत होतो. ५

अन्यायोपार्जितंद्रव्यंदशवर्षाणितिष्ठति प्राप्तेए
कादशेवर्षेसमूलंचविनश्यति ॥ ६ ॥

अन्यायें करून ह्मणजे अधर्में करून संपादन केलेले जें द्रव्य ते त्याजवळ
दाहावर्षें पर्यंत राहातें अकरावें वर्ष प्राप्त झालें ह्मणजे त्याचें पूर्वीचें ध
र्मार्जित जें द्रव्य असतें त्यासहवर्तमान नाश पावतें या करितां द्रव्य मि
ळवणे तें यथान्यायें करून मिळवावे. ॥ ६ ॥

अयुक्तंस्वामिनोयुक्तंयुक्तंनीचस्यदूषणं अमृतं
राहवोमृत्युर्विषंशंकरभूषणं ॥ ७ ॥

अयोग्यहि जरि कर्म केलें तथापि तें थोरांस योग्यच होतें कांकीं त्यां
तें दूषण ठेवण्या विषयीं कोणीहि समर्थ नाहीं नीचानें उचितकर्म के

लें असतांहि त्याला तें दूषणच होतें कारण कीं त्याची भीति कोणीहि ध रीत नाहींत त्याला शब्द ठेवण्या विषयीं सर्व शक्तिमंत होतात पहा अ मृतपान उत्तम परंतु राहूला नीचपणामुळें तें मारक झालें आणि विषपा न हें अनुचित परंतु तें महत्वास्तव शंकरास भूषणच झालें . ॥ ७ ॥

तद्भोजनंयद्द्विजभुक्तशेषंतत्सौहृदंयत्क्रियतेपरस्मि न् साप्राज्ञतायानकरोतिपापंदंभंविनायःक्रियते सधर्मः ॥ ८ ॥

ब्राह्मण भोजन करून शेष राहिलें जें अन्न त्यातें भोजन करणें तेंच भो जन ह्मणावें ब्राह्मणास अर्पिल्या वांचून पूर्वीं जें भोजन करणें तें भोजन च नव्हे परकीयावर जो स्नेह करणें तोच स्नेह पुत्रादिकीं जो स्नेह करणें तो स्नेह नव्हे स्वकीयांवर स्नेह स्वाभाविक पशूंसहि असतो जी पातका चरण करित नाहीं तीच प्राज्ञता ह्मणावी दंभावांचून केला तोच धर्म ह्मणा वा दंभानें जरी मोटा धर्म आचरिला तरी तो अधर्मच होतो . ॥ ८ ॥

मणिर्लुठतिपादाग्रेकाचःशिरसिधार्यते क्रयविक्र यवेलायांकाचःकाचोमणिर्मणिः ॥ ९ ॥

अज्ञानास्तव परीक्षा नाहीं ह्मणून हीरकादि मणी श्रेष्ठ असतांहि पुरु षाचा पादाग्रीं लोळतो आणि काच मणी मस्तकीं धारण करितो ह्मणून काचेनें हीरकमणिस नीचत्व आणिलें आणि आपण शिरसावंद्य झाली असाभाव तिणें आपले मनांत आणूंनये ज्याकाळीं परीक्षक त्या उभयतां चा क्रय विक्रय करील त्याकाळीं काच अति तुच्छता पाउन हीरकमणी च श्रेष्ठत्वें सुवर्णाचे आश्रयें करून मस्तकीं राहील . ॥ ९ ॥

अनंतशास्त्रंबहुलाश्चविद्याअल्पश्चकालोबहु विघ्नताच यत्सारभूतंतदुपासनीयंहंसोयथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥ १० ॥

हे पुरुषा तूं सकल शास्त्राभ्यास करीन ह्मणशील नर शास्त्राचा अंत नाहीं विद्याही बहूत आहेत आणि आयुष्याचा काळ थोडा त्यामध्यें विघ्नें बहूत आहेत तस्मात् जें सार ह्मणजे खरें तेच वस्तूतें सेवावें याविषयीं दृष्टांत दुग्ध आणि उदक हीं एकत्र झालीं असतां हंस जसा उदकांतून भिन्न करून दुग्धच ग्रहण करितो या प्रकारें ज्ञात्यानें सर्व अवलोकन करून सार असेल तेंच ग्रहण करावें. ॥१०॥

दूरागतंपथिश्रांतंवृथाचगृहमागतं अनर्चयित्वा योभुंक्तेसवैचांडालउच्यते ॥११॥

दुरून आलेला मार्गामध्यें श्रमलेला कार्योद्देशा वांचून साहजिक जो अतिथि समयीं गृहाप्रत आला त्याचा वचनादिकें सत्कार न करून त्याला भोजनं दिल्या वांचून जो भोजन करितो तो चांडाळ ह्मणावा. ॥११॥

पठंतिचतुरोवेदान् धर्मशास्त्राण्यनेकशः आत्मानं नैवजानंतिदर्विपाकरसंयथा ॥१२॥

चारवेद धर्मादि सकल शास्त्रें सर्व पठन करितात परंतु आत्म्यातें कोणीच जाणत नाहींत याविषयीं दृष्टांत दर्वी ह्मणजे पळी ती सर्व पाकांतें करित्ये परंतु त्याचा रसातें जशी जाणत नाहीं त्याच प्रकारें. ॥१२॥

धन्याद्विजमयीनौका विपरीताभवार्णवे तरंत्यधोगताःसर्वेउपरिस्थाःपतंत्यधः ॥१३॥

जशी समुद्र तरून जावया कारणें काष्ठरूप नौका असत्ये त्या प्रकारेंच या भवसमुद्रातें तरून जावया कारणें ब्राह्मणरूप तारण्या विषयीं समर्थ नौका आहे ती काष्ठनौकेहून विपरीत आहे ती कशी ह्मणाल तर सांगतों काष्ठनौकेच्या अधोभागीं बसतात ते बुडतात जे ऊर्ध्वभागीं बसतात ते तरतात आणि ब्राह्मणरूप नौकेंत जे अधोभागीं बसतात ते तरतात जे उपरिस्थ होतात ते बुडतात तात्पर्य ब्राह्मणा विषयीं जे न

म्र ते तरतात आणि जे अनम्र ते बुडतात. ॥१३॥

अयममृतनिधानंनायकोप्योषधीनाममृतमय
शरीरःकांतियुक्तोपिचंद्रः भवति विगतरश्मिर्मंडलं
प्राप्यभानोःपरसदननिविष्टःकोलघुत्वंनयाति ॥१४॥

हे जनहो पहा हा चंद्र केवळ अमृताचेंच निधान आणि सकल औषधीं
चा नायक ह्मणजे त्यांचें जीवन करणारा त्याचें शरीरहि अमृतरूपच
आहे तसाच कांतियुक्तहि आहे असा श्रेष्ठ असतां तो सूर्याचे गृहाप्रत
पावोन गततेजस्क होतो तेव्हां अन्य सामान्य मनुष्य दुसऱ्याचा गृहाप्रत
गेला असतां लघुता कां न पावेल अवश्य पावेलच. ॥१४॥

अलिरयंनलिनीदलमध्यगःकमलिनीमकरंदम
दालसः विधिवशात्परदेशमुपागतःकुटजपुष्प
रसंबहुमन्यते ॥१५॥

हा भ्रमर निरंतर कमलनीचा कोमल पत्रांमध्यें राहाणारा आणि कम
ळनीचे मकरंदातें सेवून त्याचा मदानें जो आळसी ह्मणजे त्यातें सोडून
ज्याला अन्यत्र कोठेंच जावत नाहीं तो दैववशें करून परदेशाप्रत पावला
तेथें कमळाचा मकरंद प्राप्त न होई तेव्हां कूटज पुष्परसातेंच श्रेष्ठ मानून
सेवितो. ॥१५॥

पीतःक्रुद्धेनतातश्चरणतलहतोवल्लभोन्येनरोषा
दाबाल्याद्विप्रवर्यैःस्ववदनविवरेधार्यतेवैरिणीमे
गेहंमेछेदयंतिप्रतिदिवससुमाकांतपूजानिमित्ता
त्तस्मात्खिन्नासदाहंद्विजकुलनिलयंनाथयुक्तंत्यजामि १६

श्रीविष्णु लक्ष्मीप्रत विचारितो हे लक्ष्मी तूं ब्राह्मणाचे घरीं राहात नाहीस
याचें कारण काय तें सांग तेव्हां लक्ष्मी सांगत्ये हे पते एका अगस्ती ब्राह्म
णानें क्रोधेंकरून माझ्या पित्याचें प्राशन केलें आणि भृगूनें तुजला लत्ताप्रहा

र केला यामुळें व माझी वैरिणी सरस्वती ती आपले मुखीं धारण करून श्रेष्ठत्व मिरवितात तसेंच प्रतिदिवसीं माझ्या गृहातें छेदून शिवाचें पूजन करितात अशा या ब्राह्मणाचे सहज रुती वरून मी खिन्न होत्साती हे नाथ त्यांचे घरीं बहुधा वास्तव्य करावयास भीत असतें. ॥ १६ ॥

बंधनानिखलुसंतिबहूनिप्रेमरज्जुदृढबंधनमुच्यते दारुभेदनिपुणोपिषडंघ्रिर्निष्क्रियोभवतिपंकजकोशे ॥ १७ ॥

या संसारामध्यें प्राण्यास बंधनें बहुत आहेत त्यांचा युक्तीनें छेद करील तेव्हां तीं बंधनें अशीं बोलतां येत नाहीं प्रेमरूप रज्जूचें जें बंधन तेंच दृढबंधन होय त्याचा छेद करायास जीव कधींहि समर्थ होत नाहीं समर्थ नहोण्याविषयीं दृष्टांत दारु ह्मणजे काष्ठ त्याचाहि भेद करण्यास जो कुशल तो भ्रमर हि प्रेमास्तव अति सकुमार जो कमलाचा अंतर्भाग त्याचेठायीं निष्क्रिय ह्मणजे भेदना विषयीं समर्थ होत नाहीं. ॥ १७ ॥

छिन्नोपिचंदनतरुर्नजहातिगंधंवृद्धोपिवारणपतिर्नजहातिलीलां यंत्रार्पितोमधुरतांनजहातिचेक्षुः क्षीणोपिनत्यजतिशीलगुणान्कुलीनः ॥ १८ ॥

चंदनाचा वृक्ष छेदिला असतांहि सुगंधातें त्यागीत नाहीं तसा गजपति वृद्ध झाला असतांहि कधींच लीलेतें टाकीत नाहीं आणि जसा ऊंस यंत्रांत घालून पीळिला असतांहि मधुरपणातें कदापि सोडीत नाहीं तसा जो कुलीन तो द्रव्यादिकें करून क्षीण झाला तरी कधींहि आपल्या उत्तम स्वभावातें आणि श्रेष्ठ गुणातें टाकित नाहीं. ॥ १८ ॥

उर्व्यांकोपिमहीधरोलघुतरोदोर्भ्यांधृतोलीलया तेनत्वंदिविभूतलेचसततंगोवर्धनोगीयसे त्वांत्रैलोक्यधरंवहामिकुचयोरग्रेनतद्गण्यते किंवाकेशव

भाषणेनबहुनापुण्यैर्यशोलभ्यते ॥१९॥

राधाकृष्णाप्रत ह्मणत्ये हे देवा पृथ्वीचेठायीं कोणेक अत्यंत लहान पर्वत तो तूं सहज श्रमा वांचून बाहूनीं धारण केलास त्याणें करून तूं निरंतर स्वर्गी आणि मृत्युलोकीं गोवर्धन धारक यानामें जनाहीं गाइजेतोस आणि मी तर त्रैलोक्य धारक जो परमेश्वर यातें स्तनाच्या अग्रीं सतत धारण करित्यें परंतु त्या माझ्या पराक्रमाची गणना कोठेंहि कोणीचें करित नाहीं तस्मात् हे केशवा बहुभाषणें करून काय लोकांत जी कीर्ती प्राप्त होणें ती पुण्या वांचून होत नाहीं जो पुण्यवंत त्यासच प्राप्त होत्ये. ॥१९॥

॥इतिवृद्धचाणाक्ये षोडशोध्यायः॥१६॥

---

नध्यातंपदमीश्वरस्य विधिवत्संसारविच्छित्तये
स्वर्गद्वारकपाटपाटनपटुर्धर्मोपिनोपार्जितः॥
नारीपीनपयोधरोरुयुगलंस्वप्नेपिनालिंगितं मा
तुःकेवलमेवयौवनवनछेदेकुठारावयम् ॥१॥

जन्म मरणाचा नाशाकारणें ह्मणजे मोक्षप्राप्ती कारणें यथाशास्त्र ईश्वर पदध्यान केलें नाही स्वर्गद्वार कपाट पाटन ह्मणजे विघटन करणारा जो धर्म तोहि संपादन केला नाहीं स्त्रीचे पुष्ट जें स्तन युग्म आणि उरुयुग्म तें स्वप्नांतहि आलिंगिलें नाहीं तर आह्मी मातेचा तारुण्य वन छेदना विषयीं केवळ कुठारमात्र जाहालों जन्माप्रत येऊन इतर सार्थक कोणतेंच केलें नाहीं. ॥१॥

जल्पंतिसार्द्धमन्येनपश्यंत्यन्यंसविभ्रमः हृदये
चिंतयेत्यन्यंनस्त्रीणामेकतोरतिः॥२॥

स्त्रियांची प्रीति एकत्र असत नाहीं ती कशी ती सांगतों स्त्रिया एका

पुरुषा सह वर्तमान भाषण करितात आणि विलास सहीत एकाप्रति पाहात असतात तसेंच अन्यातें चिंतितात. ॥२॥

योमोहान्मन्यतेमूढोरक्तेयंमयिकामिनी सतस्याव
शगोभूत्वानृत्येत्क्रीडाशकुंतवत् ॥३॥

जो मूर्ख मोहें करून ही स्त्री माझेठायीं प्रीतियुक्त आहे असें मानितो तो तिचास्वाधीन होऊन क्रीडा पक्ष्याचे परि जशी ती नृत्य करवील तसें नृत्य करित असतो. ॥३॥

कोर्थान्प्राप्यनगर्वितोविषयिणःकस्यापदोस्तंगता
स्त्रीभिःकस्यनखंडितंभुविमनःकोनामराजप्रियः॥
कःकालस्यनगोचरत्वमगमत्कोर्थगितोगौरवं कोवा
दुर्जनदुर्गुणेषुपतितःक्षेमेणयातःपथि ॥४॥

द्रव्यातें पावोन गर्वातें ग्रहण केलें नाहीं असा कोण आहे कोणत्याविषयीं पुरुषाचा आपत्ती नाश पावल्या असा कोणीच नाहीं भूलोकीं स्त्रियाहीं कोणत्या पुरुषाचें मन खंडित ह्मणजे वेधिलें नाहीं असा कोण आहे राजाला सदैव प्रिय असा कोण आहे कोणीचनाहीं कालाचा विषयत्वाप्रत न पावला असा कोण आहे याचक गौरवाप्रत पावला असा कोण आहे कोणीच नाहीं दुर्जनाचा दुष्टगुणातें पावोन मार्गीं सुखानें गेला असा कोण आहे या पूर्वोक्त सकल गुणाहीं युक्त असतां यांचा दोषांहि लिप्त नहोणारा असा ज्ञान्या वांचून इतर कोणीच नाहीं. ॥४॥

ननिर्मिताकेननदृष्टपूर्वानश्रूयतेहेममयीकुरंगी
तथापितृष्णारघुनंदनस्यविनाशकालेविपरीतबुद्धिः५

पूर्वीं सुवर्णाची मृगी कोणीही उत्पन्न केली नाहीं आणि कोणी अवलोकिलीहि नाहीं तशीच कोणी श्रवणहि केली नाहीं तसें असतांहि रामचंद्रास त्या मृगी विषयीं इच्छा जाह्लाली तस्मात् विनाशकालीं थोरासहि

विपरीतबुद्धि होते. ॥५॥

गुणैरुत्तमतांयांतिनोच्चैरासनसंस्थिताः प्रासाद
शिखरस्थोपिकाकःकिंगरुडायते ॥६॥

पुरुष गुणाहीं श्रेष्ठतेतें पावतो उच्चासनीं बसला ह्मणोन श्रेष्ठ होतो अ
सें नाहीं काकपक्षी देवालयाचे शिखराप्रत उच्चस्थानीं जरी बसला तरि
तो गरुडापरी श्रेष्ठ होईल कीं काय. ॥६॥

गुणाःसर्वत्रपूज्यंतेनमहत्योपिसंपदः पूर्णेंदुःकिं
तथावंद्योनिष्कलंकोयथाकृशः॥७॥

गुण जसे सर्वत्र पूजा पावतात तशा संपत्ति मोठ्या असतांहि त्या को
ठेंच पूजा पावत नाहींत निष्कलंक द्वितीयेचा चंद्र जसा वंद्य तसा पूर्ण
मेचा चंद्र थोर ह्मणून वंद्य होतो कीं काय.॥७॥

परप्रोक्तगुणोयस्तुनिर्गुणोपिगुणीभवेत् इंद्रोपि
लघुतांयातिस्वयंप्रख्यापितैर्गुणैः॥८॥

ज्याचे गुणाचें अन्यजन वर्णन करितात तो पुरुष निर्गुण असतांहि गु
णवान् होतो आणि जो आपल्या गुणातें आपणाच वर्णितो तो गुणसंप
न्न इंद्र असतांहि अति लघुत्वा प्रत पावतो. ॥८॥

विवेकिनमनुप्राप्तागुणायांतिमनोज्ञतां सुतरांर
त्नमाभातिचामीकरनियोजितं॥९॥

गुण स्वभावें करूनच जर श्रेष्ठ ते विवेकी पुरुषाप्रत तर ते विशेषच म
नोज्ञतेप्रत पावतात ह्मणजे फारच शोभतात दृष्टांत रत्न स्वयेंच शो
भतें आणि तें जर सुवर्णाचे ठायीं योजिलें तर अत्यंतच शोभतें जसें
तसे ते गुण शोभतात. ॥९॥

गुणैःसर्वज्ञतुल्योपिसीदत्येकोनिराश्रयः अनर्घ्य
मपिमाणिक्यंहेमाश्रयमपेक्षते ॥१०॥

गुणाहीं सर्वज्ञतुल्य ह्मणजे ईश्वरा सारिखा जरि आहे तथापीं तो आ श्रयहीन एकच जर आहे तर तो हि दुःखातें पावतो माणिक अमोलिक असतां हि तें सुवर्णाचे आश्रयातें इछितें जसें तेंहि आश्रया वांचून शो भत नाहीं याच प्रकारें गुणही निराश्रय शोभत नाहीं. ॥१०॥

अति क्लेशेन येह्यर्थो धर्मस्यातिक्रमेणतु शत्रूणां
प्रणिपातेन ते अर्था मा भवंतु मे ॥११॥

अति क्लेशोंकरून जे अर्थ साध्य तसेच धर्माचा अतिक्रमें करून ह्मणजे उल्लंघनें करून जे साध्य आणि शत्रूला नमस्कार करून जे प्राप्त होणार ते अर्थ मला प्राप्त नसोत अशा अर्थांचें काहींच प्रयोजन नाहीं. ॥११॥

किं तया क्रियते लक्ष्म्या याव धूरिव केवला यातु वेश्येव सामान्या पथिकैरपि भुज्यते ॥१२॥

जी लक्ष्मी ह्मणजे संपत्ति उपभोगादिका वांचून कन्येचें जसें केवळ पाल नमात्र करावें याप्रकारें जीचे उपभोगादिक न करितां संरक्षण मात्र कर तात त्या लक्ष्मीकरून काय प्रयोजन जी संपत्ति सामान्य वेश्येचे परि मा र्गस्थही उपभोगितात ती लक्ष्मी श्रेष्ठ जाणावी. ॥१२॥

धान्येषु जीवितव्येषु स्त्रीषु चाहारकर्मसु अतृप्ताः
प्राणिनः सर्वे याता यास्यंति यांति च ॥१३॥

धान्याविषयीं आणि जीवनाविषयीं तसेंच स्त्रियांचेठायीं आणि आहा राविषयीं सकळ प्राणी अतृप्त होत्साते कितिएक पूर्वीं गेले कितिएक जातील आणि कितिएक जात आहेत तस्मात् या विषयांचा कितिही उप भोग केला असतां तृप्ति व्हावयाची नाहीं यास्तव त्याचा त्याग करून ईश्वर भजनींच सदैव रत असावें. ॥१३॥

क्षीयंते सर्वदानानि यज्ञहोमबलिक्रियाः नक्षीयते
पात्रदानमभयं सर्वदेहिनां ॥१४॥

सकल दानें आणि यज्ञादि सकळ कर्मेंहि नाश पावतात परंतु सत्पा त्रीं जें दान अर्पिलें तें आणि सर्वभूतीं अभय देणें हीं दोनमात्र कधीं हि क्षय पावत नाहींत.॥१४॥

तृणंलघुतृणात्तूलस्तूलादपिचयाचकः वायुनाकिंननीतोसौमामयंयाचयिष्यति॥१५॥

तृण लघु म्हणजे हलकें त्याहून तूल म्हणजे कापूस केवळ हलका होय त्यापेक्षां हि याचक तर फारच हलका होय इतका हलका आहे तर त्यास वायु कां उडवून नेत नाहीं असें म्हणाल तर हा याचक केवळ लघु मज प्रति हि याचना करील या भीतिनें वायु त्याप्रत अवलोकनहि करितनाहीं१५

वरंप्राणपरित्यागोमामानपरिखंडनं॥ प्राणत्यागः क्षणंचैवमानभंगोदिनेदिने॥१६॥

मान भंगें करून जीवन करणें यापेक्षां प्राणत्याग करणें हेंच श्रेष्ठ प्राणत्याग क्षणमात्रच दुःखदायक होतो आणि मानभंग प्रति दिवसीं दुःख देतो.॥१६॥

प्रियवाक्यप्रदानेनसर्वेतुष्यंतिजंतवः तस्मात्तदेववक्तव्यंवचनेकिंदरिद्रता॥१७॥

प्रियभाषणें करून सकळ प्राणी संतोषाप्रत पावतात तस्मात् सर्व जनास प्रिय जें तेंच बोलावें अप्रिय भाषणें इतरांस असंतोषित करूंनये वचना विषयीं काय दरिद्रता आहे.॥१७॥

संसारकुटवृक्षस्यद्वेफलेअमृतोपमे सुभाषितंचसुस्वादुसंगतिःसज्जनेजने॥१८॥

संसार हाच एक कडु या प्रकारचा कुड्याचा वृक्ष होय परंतु याचीं दोन फळें अमृता सारिखीं अति मधुर आहेत तीं कोणतीं तें ऐक स्वादु म्हणजे गोड सुभाषितवचन आणि सज्जनाची संगती.॥१८॥

जन्मजन्मन्यदभ्यस्तं दानमध्ययनंतपः तेनैवाभ्या
सयोगेनदेहमभ्यसतेपुनः ॥१९॥

जन्म जन्माचे ठायीं जें दान किंवा अध्ययन किंवा तप अभ्यासिलें अ सेल त्या अभ्यासाचे योगें करून पुनर्जन्म जन्माचे ठायीं ईश्वरातेंच अभ्यासितो ह्मणजे वारंवार सेवितो. ॥१९॥

पुस्तकेषुचयाविद्यापरहस्तेषुयद्धनं उत्पन्नेषुच
कार्येषुनसाविद्यानतद्धनम् ॥२०॥

ज्याची विद्या पुस्तकाचे ठायींच आहे ह्मणजे ज्याला पुस्तका वांचून काहींच येत नाहीं आणि ज्याचें धन पर हस्तगत आहे त्या पुरुषा ला त्या विद्येचें किंवा त्या द्रव्याचें काही कार्य प्राप्त झालें असतां जी विद्या किंवा जें धन उपयोगीं पडत नाहीं तर ती विद्या आणि धन त्याचें नव्हे. ॥२०॥

इतिवृद्धचाणाख्ये सप्तदशाऽध्यायः॥१७॥

---

पुस्तकेप्रत्ययाधीतंनाधीतंगुरुसन्निधौ सभा
मध्येनशोभंतेजारगर्भइवस्त्रियः॥१॥

पुस्तकीं पाहून आपल्याच प्रत्ययानें जें अध्ययन केलें गुरूचा सान्निध्य कधींहि न केलें तें अध्ययन जारापासून प्राप्त झाला आहे गर्भ ज्यांस त्या स्त्रिया जशा सभेमध्यें शोभत नाहींत तसें त्या पुरुषाचें तें अध्ययन शोभत नाहीं. ॥१॥

कृतेप्रतिकृतंकुर्याद्धिंसनेप्रतिहिंसनं तत्रदोषो
नपततिदुष्टेदुष्टंसमाचरेत् ॥२॥

कोणीहि आपलें अनिष्ट केलें असतां त्याचें अनिष्ट करावें आणि कोणी जर आपली हिंसा केली तर त्याची हिंसा आपण करावी त्या विषयीं दोष नाहीं जो दुष्ट त्या विषयीं आपणहि दुष्ट आचरावें हाच न्याय होय. ॥२॥

यद्दूरंयद्दुराराध्यंयच्चदूरेव्यवस्थितं तत्सर्वंतपसा
ध्यंतपोहिदुरतिक्रमं ॥३॥

जे वस्तु समीपवर्ती आणि जे दुराराध्य ह्मणजे जीचें आराधन करितां येत नाहीं ते सर्व तपेंकरून साध्य होतें तस्मात् तप दुरतिक्रम ह्मणजे त्याचें उल्लंघन करावयास कोणीच समर्थ नाहीं. ॥३॥

लोभश्चेदगुणनकिंपिशुनतायद्यस्तिकिंपातकैः स
त्यंचेत्तपसाचकिंशुचिमनोयद्यस्तितीर्थेनकिं॥ सौज
न्यंयदिकिंगुणैःस्वमहिमायद्यस्तिकिंमंडनैः सद्विद्या
यदिकिंधनैरपयशोयद्यस्तिकिंमृत्युना ॥४॥

पुरुषास लोभ जर आहे तर अन्य विषय त्यागेंकरून काय उपयोग पिशुनता ह्मणजे दुसऱ्याचें न्यून लोकांत प्रसिद्ध करून त्याचा अपमान करण्याचा जर स्वभाव आहे तर त्याला इतर पातकांहीं विशेष काय व्हावयाचें आहे काहींच नाहीं कांकीं पातकांहीं जी दुर्गती प्राप्त व्हावयाची ती पिशुनपणें करूनच होते जर पुरुषास सत्यभाषण आहे तर त्याला तपें करून काय उपयोग त्याला सत्यानेंच सर्व तपाचें फळ प्राप्त होतें मन जर पवित्र आहे तर तीर्थें करून काय करावयाचें त्याला शुद्धांतःकरणें करूनच सकळ तीर्थ स्नानाचें फळ प्राप्त होतें सुजनपणा जर आहे तर अन्य गुणाहीं करून काय उपयोग काहींचनाहीं कारण कीं सर्वगुणाहीं जें फळ प्राप्त व्हावयाचें तें त्याला सौजन्यें करूनच होतें जर लोकांत पुरुषाचें उत्तम महत्व आहे तर त्याला मंडनाहीं ह्मणजे वस्त्र भूषणें करून काय काहींच नाहीं महत्वें करूनच सर्व प्राप्त होतें उत्तम विद्या जर आहे तर

धनाचा काहींच उपयोग नाहीं जें धनेंकरून प्राप्त व्हावयाचें तें विद्ये नेंच प्राप्त होतें ज्याची जनांत अपकीर्ति झाली त्याला मृत्यूनें विशे ष काय करावयाचें आहे जें मृत्यूनें प्राप्त व्हावयाचें ते शावल अपय शें करूनच प्राप्त होतें. ॥४॥

पितारत्नाकरोयस्यलक्ष्मीयस्यसहोदरी शंखो
भिक्षाटनंकुर्यात्नादत्तमुपतिष्ठति ॥५॥

रत्नाकर ह्मणजे रत्नांचें केवळ स्थान असा जो समुद्र तो ज्याचा पिता आणि लक्ष्मी ज्याची भगिनी तो शंख प्रतिगृहीं भिक्षेप्रत फिरतो न स्मात् पूर्वी दिल्या वांचून काहींच प्राप्त होत नाहीं. ॥५॥

अशक्तस्तुभवेत्साधुर्ब्रह्मचारीचनिर्धनः व्याधि
ष्ठोदेवभक्तश्चवृद्धानारीपतिव्रता ॥६॥

अशक्त ह्मणजे ज्याला कोणताहि प्रापंचांतील उद्योग करावयास सामर्थ्य नाहीं तो साधू होतो निर्धन ह्मणजे जो द्रव्यहीन तो विषय भोगाविषयीं असमर्थ होतो आणि नंतर ब्रह्मचर्य धारण करितो जो व्याधिग्रस्त झाला तो देवभक्त होतो आणि जी स्त्री पूर्वी व्यभिचारिणी असत्ये ती वृद्ध झाली असतां महा पतीव्रता होत्ये ह्मणजे वृद्धपणीं प तिव्रतेचा परी आचरण करत्ये. ॥६॥

नान्नोदकसमंदानंनतिथिर्द्वादशीसमा नगायत्र्याः
परोमंत्रोनमातुःपरदैवतं ॥७॥

अन्न आणि उदक यांचा दाना सारिखें दुसरें श्रेष्ठ दान नाहीं द्वादशी सारिखी दुसरी तिथी नाहीं गायत्री मंत्राहून दुसरा श्रेष्ठ मंत्र नाहीं आ णि मातेहून श्रेष्ठ दैवत दुसरें कोणतेंच नाहीं. ॥७॥

तक्षकस्यविषंदंतेमक्षिकायाविषंशिरः वृश्चिक
स्यविषंपुच्छंसर्वांगेदुर्जनोविषं ॥८॥

सर्पाचा दंताचेठायीं विष राहातें आणि मक्षिकेच्या शिराप्रति विष अस तें तसेंच विंचूचे पुच्छाग्रीं विष असतें आणि दुर्जनतर सर्वांगीं विषरूप च आहे तस्मात् दुर्जनासारिखें सर्वनाशक असें दुसरें विषच नाहीं.॥८

पत्युराज्ञां विना नारी उपोष्य व्रतचारिणी आयुष्यं ह
रते भर्तुः सा नारी नरकं व्रजेत् ॥ ९॥

पतीचा आज्ञे वांचून जी स्त्री उपोषण करून व्रताचरण करित्ये ती प तीचा आयुष्यातें हरण करित्ये आणि आपणाही नरकाप्रत पावत्ये.॥९

न दानैः शुध्यते नारी नोपवासशतैरपि न तीर्थसेव
या तद्वत् भर्तुः पादोदकैर्यथा ॥१०॥

स्त्री अनेक दानादिकें करून आणि शतशः उपोषणांहि करून त शीच तीर्थ सेवनें करून हि शुद्ध होत नाहीं जशी ती पतिव्रता स्त्री आपले पतीचे चरण तीर्थ प्राशनें करून शुद्ध होत्ये तशी तीर्थ व्रतें करू न होत नाहीं. ॥१०॥

पादशेषं पीतशेषं संध्याशेषं तथैव च श्वानमूत्र
समं तोयं पीत्वा चांद्रायणं चरेत् ॥११॥

पाद प्रक्षालन करून शेष राहिललें आणि प्राशन करून जें राहिलें तें तसेंच संध्या करून जें शेष राहिलेलें उदक तें श्वान मूत्रा सारिखें जाणावें तें जो प्राशन करील त्याला चांद्रायण प्रायश्चित्तें करून शु द्धि होत्ये अन्यथा तो अशुची जाणावा. ॥११॥

दानेन पाणिर्न तु कंकणेन स्नानेन शुद्धिर्न तु चंदने
न मानेन तृप्तिर्न तु भोजनेन ज्ञानेन मुक्तिर्न तु मुं
डनेन ॥१२॥

पुरुषास द्रव्य प्राप्त झालें असतां तो जर त्या द्रव्याचें दान हस्तें करू न करील तर त्याचा हस्त शोभा पावेल जरी कंकणें धारण केलीं तथा

पि त्यांही हस्त शोभणार नाहीं देहास शुद्धि स्नानेंकरूनच होय स्नान न करितां जरी उत्तम चंदन धारण केलें तथापि त्याणें शुद्धि होत नाहीं तशीच सन्मानें करून जशी तृप्ति होत्ये तशी तृप्ती भोजनें करून श्रेष्ठ जनांस होत नाहीं आणि ज्ञानें करून जशी मुक्ती प्राप्त होत्ये तशी मुंडणादि प्रायश्चित्तें करून होत नाहीं. ॥१२॥

नापिकस्यगृहेक्षौरंपाषाणेगंधलेपनं आत्मरू
पंजलेपश्यन्शक्रस्यापिश्रियंहरेत्॥१३॥

नापिकाचे घरीं क्षौर केलें असतां आणि पाषाणाचे ठायीं म्हणजे साहणेवरूनच गंध लाविलें असतां आणि आपलें स्वरूप उदकामध्यें पाहिलें असतां इंद्रासारिख्याचाहि लक्ष्मीतें हे पूर्वोक्त त्रय हरण करील मग अन्य सामान्य मनुष्याचा लक्ष्मीतें हरण करिल या विषयींचें आश्चर्य काय. ॥१३॥

सद्यःप्रज्ञाहरातुंडीसद्यःप्रज्ञाकरीवचा सद्यःश
क्तिहृतानारीसद्यःशक्तिकरंपयः॥१४॥

तुंडी म्हणजे तोंडली भक्षिली असतां तत्काळ पुरुषाचा बुद्धीतें हरण करित्ये आणि वचा म्हणजे वेखंड सेविलें असतां तें तत्काळ बुद्धितें उत्पन्न करितें स्त्री पुरुषाचे शक्तीतें तत्काल हरण करित्ये आणि दुग्ध पान केलें असतां तत्काळ शक्तितें उत्पन्न करतें. ॥१४॥

परोपकारणंयेषांजागर्तिहृदयेसतां नश्यंति
विपदस्तेषांसंपदःस्युःपदेपदे॥१५॥

ज्या साधूचा हृदयांत निरंतर परोपकार जागतो म्हणजे जे साधू सदैव परोपकार करितात त्यांच्या सकळ विपत्ति नाश पावतील आणि जिकडेस जातील तिकडे त्यांस संपत्तिच प्राप्त होतील. ॥१५॥

यदिरामायदिचरमायदितनयोविनयगुणो

पेतः तनयेतनयोत्पत्तिःसुरवरनगरे किमा
धिक्यं ॥१६॥

यालोकीं पुरुषास जर उत्तम स्त्री प्राप्त आहे आणि तशीच जर लक्ष्मी हि प्राप्त आहे आणि जर पुत्र विनयादि सकलगुण संपन्न आहे आणि पुत्राला पुत्रोत्पत्ति जर आहे तर त्याला इंद्रलोकीं आधिक्य काय आहे काहींच नाहीं त्याला सकल सुख इहलोकींच आहे.॥१६॥

आहारनिद्राभयमैथुनानि समानिचैतानि नृ
णांपशूनां ज्ञानंनराणामधिको विशेषो ज्ञाने
नहीनाःपशुभिःसमानाः ॥१७॥

आहार निद्रा भय मैथुन हीं चार मनुष्यास आणि पशूंस सारखींच आहेत मनुष्यास विषयभोगादिका विषयीं ज्ञान आहे एवढामात्र पशूंहून विशेष ज्यांला ज्ञान नाहीं ते पशूंसारिखेच जाणावे.॥१७

ज्ञानार्थिनोमधुकरायदिकर्णतालैर्दूरीकृताःक
रिवरेणमदांधबुध्या॥ तस्यैवगंडयुगमंडनहानि
रेषाभृंगाःपुनर्विकचपद्मवनेवसंति ॥१८॥

निरंतर प्रफुल्लित कमल वनीं राहून त्याचा आमोदानें सार्वकाल जे तृप्ती पावतात ते भ्रमर दानोदकाचा इछेने मदोन्मत हस्तीचा गंडस्थलाप्रत प्राप्त झाले असतां गजराजानें मदांध बुद्धी करून कर्णतालाहीं जर दूर केले तर त्याचाच गंडस्थलांचा शोभेची हानी जाणावी भ्रमर तर पुनः विकसित कमलवनीं जाऊन वास करितात या प्रकारें याचक लक्ष्मीवंताचा गृहाप्रत द्रव्याचे इछेनें गेला असतां त्याचा धिक्कार जर धनवंतानें केला तर त्याचा लक्ष्मीची हानी होईल याचक तर अन्य दात्याप्रत जाऊन द्रव्यातें पावेल.॥१८॥

राजावेश्यायमोअग्निस्तस्करोबालयाचकौ पर

दुःखंनजानंतिअष्टमोग्रामकंटकः॥१९॥

राजा वेश्या यम अग्नि तस्कर बालक याचक हे सात आणि आठवा ग्रामकंटक ह्मणजे अन्यत्र कोठेंहि न जातां स्वग्रामांतच राहून लोकांस पीडा करून आपला निर्वाह करणारा एकुन हे आठ दुसऱ्याचा दुःखातें जाणत नाहीत आपलेंच कार्य करितात. ॥१९॥

अधःपश्यसिकिंबालेपतितंतवकिंभुवि रेरेमू
र्खनजानासिगतंतारुण्यमौक्तिकं॥२०॥

कोणी एक तरुण स्त्री आपले स्तनाग्रीं पाहात मार्गी जात असतां तीतें पाहून कोणी एक पुरुष तीजप्रत बोलिला हे बाले हे सकुमारी तूं खालीं काय पाहातेस तुझी काहीं वस्तू भूमीवर पतन पावली आहे कीं काय असें तें त्याचें वचन श्रवण करून ती सांगत्ये रेरे मुर्खा तूं कसा बरें जाणत नाहींस माझें तारुण्यरूप मोक्तिक गेलें त्यातें पाहात आहें बरें. ॥२०॥

व्यालाश्रयापिविफलापिसकंटकापिवक्रापिपं
किलभवापिदुरासदापि॥गंधेनबंधुरसकेतकिस
र्वजंतोरेकोगुणःखलुनिहंतिसमस्तदोषान्॥२१॥

हे केतकी तूं सर्पाला जरी आश्रय देत आहेस आणि फलहीनहि आहेस तसेच तुला कंटकही बहुत आहेत वांकडीहि आहेस आणि कर्दमयुक्त भूमीचे ठायीं तुझी उत्पत्ति आणि तूं अप्राप्तहि होस अशा दोषाहीं युक्त असतां एका गंधगुणें करून सर्वांस बंधूचापरि प्रिय आहेस तेव्हां एकही जरी सद्गुण असला तथापि तो समस्त दोषांतें दूर करितो. ॥२१॥

॥इतिवृद्धचाणाक्ये अष्टादशोध्यायः॥१८॥

ग्रंथसंपूर्णम्

हें पुस्तक मुंबईत रावजीभास्कर रानडे व बापुसदाशिव शेट शेल्ये हेगिष्टे याणीं छापिलें हेगिष्टे यांचे छापखान्यांत शके १७७१ भाद्रपद मास